नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १६१ * * नागपूर * गुरुवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## बिहारमधील दोन प्रकल्पांना मंत्रिमंडळाची मंजुरी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. बैठकीत बिहारमधील ७६१६ कोटींच्या गुंतवणुकीच्या दोन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.
यामध्ये, बिहारमधील बक्सर-भागलपूर हाय-स्पीड कॉरिडॉरमध्ये चार-लेन ग्रीनफील्ड मोकामा-मुंगेर महामार्गाच्या बांधकामाला मंजुरी देण्यात आली. हा महामार्ग हायब्रिड ॲन्युइटी मोड अंतर्गत बांधला जाईल, ज्याची एकूण लांबी ८२.४०० किमी असेल आणि एकूण ४४४७.३८ कोटी रुपये गुंतवणूक असेल. याशिवाय, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमधील १७७ किमी लांबीचा भागलपूर-दुमका-रामपूरहाट सिंगल रेल्वे मार्ग डबल केला जाईल, ज्याचा एकूण खर्च सुमारे ३,१६९ कोटी रुपये आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# दुसरे राधाकृष्णन

भारताची राज्यघटना जनतेला समर्पित झाल्यावर देशाचे पहिले राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद होते आणि पहिले उपराष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन हे होते. १९५२ ते १९६२ दहा वर्षे हीच जोडी जोडीगोडीने होती. १९६२ साली डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांचा कार्यकाळ संपल्यावर त्यांनी पटना येथे सदाकत आश्रमात आपला मुक्काम हलविला होता. अत्यंत साधी राहणी, अतिशय विद्वान आणि त्यासोबत उच्च विद्याविभूषित असलेल्या डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांच्या कार्यकाळामध्ये सर्वपल्ली राधाकृष्णन दहा वर्ष उपराष्ट्रपती होते. १९६२ सालामध्ये ते पहिले राधाकृष्णन राष्ट्रपती झाले. काल दक्षिण भारताचे दुसरे राधाकृष्णन उपराष्ट्रपती पदावर विराजमान झालेले आहेत. एनडीएने इंडिया आघाडीला डॉक्टर राधाकृष्णन यांना समर्थन देण्याचे आवाहन केले होते. मात्र इंडिया आघाडीने आपला उमेदवार उभा केला. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश सुदर्शन यांची उमेदवारी इंडिया आघाडी जाहीर केली. दक्षिण भारताचा उमेदवार विरुद्ध दक्षिण भारताचा उमेदवार अशी ती खेळी होती. तेलुगु अस्मितेच्या बहुतांश तेलुगू भाषिक खासदार त्यांना मते देतील असा साधारण कयास होता. चंद्राबाबू नायडू यांच्याशी त्यांचे अतिशय जवळचे संबंध होते. त्यामुळे तेलंगणा आणि आंध्र प्रदेश येथील तेलुगु भाषिक खासदार त्यांनाच मते देतील हा अंदाज खोटा ठरला. काँग्रेस आणि काँग्रेस प्रणित इंडिया आघाडी हवा तयार करण्यात आघाडीवर होती परंतु भारतीय जनता पक्ष ज्या हिरीरिने आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी जीव तोडून मेहनत करतो, तो प्रकार इंडियाकडे म्हणजेच इंडिया आघाडीकडे दिसला नाही. इंडिया आघाडीपेक्षा दीडपट पेक्षा जास्त मते मिळवून दुसरे राधाकृष्णन मोठ्या फरकाने निवडून आलेले आहेत. राहुल गांधी यांची उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीवेळी चालू असलेली बिहारमधील मत अधिकार यात्रा त्यांना व त्यांच्या नेतृत्वाला लाभदायी ठरेल असे त्यांना वाटते. पण राजकारणातील बारकावे ज्या कौशल्याने भाजप प्रणित एनडीएने राबविले होते तसे इकडे होत नाही. न्यायाधीश सुदर्शन हे काँग्रेसचे उमेदवार नव्हते किंवा कोणत्याही पक्षाचे नव्हते असे सांगितले गेले. पण ते इंडिया आघाडीचे होते आणि एनडीएचे नव्हते हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ होते आणि आहे. संघाला खुश करण्यासाठी यावेळी कट्टर स्वयंसेवक असलेल्या राधाकृष्णन यांचे नाव निश्चित करण्यात आले. त्यानंतर अनेक पत्रकार त्यांच्या नावामुळे एनडीएमध्ये आता धाकधूक वाटत आहे असे बोलणे करीत होते. न्यायमूर्ती सुदर्शन यांनी संपूर्ण भारतभर आपल्याला मते देण्यासाठी प्रचार केला. त्यामध्ये त्यांनी अंतरात्म्याच्या आवाजाचेही आवाहन केले. त्यांच्या एका निकालाबद्दल गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांच्यावर ठपकाही ठेवला. त्याचा प्रतिकार करण्यासाठी इतर अनेक न्यायमूर्ती मैदानात उतरले होते. पण या विषयावर राधाकृष्णन यांनी कुठेही प्रचार केला नाही, कोणताही दौरा काढला नाही, कोणालाही मत द्या अशी विनंतीही केली नाही. त्यांच्या शांत स्वभावाप्रमाणे विचलित न होता त्यांनी संघाचा सोवळेपणा जपला, कोणालाही त्यांनी शब्दाने दुखावले नाही, मतासाठी त्यांनी कोणालाही बोलवलेही नाही, केवळ एनडीएच्या खासदारांनी त्यांना मते दिली नाहीत. तर काही इंडिया आघाडीचे खासदारही त्यांचे मतदाते झाले. एकूणच आज सामना एकतर्फी झाला. एनडीएने आता यशस्वीपणे आपला उपराष्ट्रपती बदलून दाखविलेला आहे. आता आपल्या संपूर्ण देशाचे आणि आपल्या सर्वांचे उपराष्ट्रपती राधाकृष्णन आहेत. त्यामुळे त्यांचे मनापासून अभिनंदन!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## 'नो पीयूसी नो फ्युएल' नियम

# राज्यात लवकरच लागू!

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर / मुंबई, दि. १० :**
भविष्यातील पिढीला प्रदूषणमुक्त पर्यावरण देण्यासाठी सध्याच्या पिढीने स्वतः वर पर्यावरणपूरक काही निर्बंध घालून घेणे गरजेचे आहे. त्या उद्देशाने प्रत्येक वाहनाला दिले जाणारे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र हे वैध असणे गरजेचे आहे. अवैध प्रमाणपत्र निर्मितीची साखळी पूर्णतः बंद झाली पाहिजे, यासाठी भविष्यात प्रत्येक पेट्रोल पंपावर नो पीयूसी नो फ्युएल उपक्रमाची अंमलबजावणी सक्तीने करण्यात यावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांचे निर्देश

परिवहन आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत परिवहन मंत्री बोलत होते. या बैठकीला परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सह सचिव (परिवहन) राजेंद्र होळकर यांच्या सह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यातील प्रत्येक पेट्रोल पंपावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे इंधन भरण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक वाहनाचा वाहन क्रमांक तपासला (स्कॅन करून) जाईल. जेणेकरून त्या माध्यमातून संबंधित वाहनाच्या प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची वैधता कळेल.

जर त्या वाहनाचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र वैध नसेल तर त्या वाहनाला इंधन दिले जाणार नाही. तथापि, त्याच पेट्रोल पंपावर प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र ताबडतोब काढून देण्याची व्यवस्था देखील केली जाईल. जेणेकरून वाहन चालकाची गैरसोय होणार नाही.

या प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राला युनिक आयडेंटी असणार आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची वेळोवेळी वैधता तपासणी केली जाऊ शकते, असे प्रताप सरनाईक म्हणाले.

भविष्यात वाहन विक्री करणाऱ्या शोरूम व वाहन दुरुस्ती करणारे गॅरेजमध्ये देखील प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात येईल. जेणेकरून रस्त्यावर चालणारे प्रत्येक वाहन हे वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र असलेले असेल. ज्यामुळे प्रदूषण पातळी कमी होण्यास मदत होईल.

त्याबरोबरच सध्या अवैध पद्धतीने प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र काढणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यासाठी परिवहन विभागाने मोठी धडक मोहीम राबवावी, अशा सूचनाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिल्या.

## ओबीसी उपसमितीच्या बैठकीत

# मंत्री भुजबळ भडकले

### मराठा समाजाला जास्त निधी दिल्याचा आरोप : जीआरवरही आक्षेप

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० :**
ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी बुधवारी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या जीआरवर आपला संताप व्यक्त केला. सरकारने कुणबी नोंदी संदर्भात काढलेल्या जीआरमुळे ओबीसींना फटका बसणार आहे. विशेषतः मागील २० वर्षांत ओबीसी समाजाला फार कमी निधी मिळाला. पण त्या तुलनेत मागील २-३ वर्षांतच मराठा समाजाला त्याहून कितीतरी जास्त निधी मिळाला, असे ते म्हणालेत.



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात आज ओबीसी उपसमितीची पहिली बैठक झाली. या बैठकीला समितीचे सदस्य छगन भुजबळ, पंकजा मुंडे, गुलाबराव पाटील, अतुल सावे, संजय राठोड, दत्तात्रय भरणे यांच्यासह इतर मगासा बहुजन कल्याण विभागाचे सचिव व इतर अधिकारी उपस्थित होते. त्यात भुजबळ यांनी मराठा समाजाच्या तुलनेत ओबीसींना फार कमी निधी मिळत असल्याची खंत व्यक्त केली. तसेच सरकारच्या जीआरमधील काही शब्दांवर आक्षेप नोंदवत ओबीसींना फटका बसेल असा जीआर काढल्याने अधिकाऱ्यांवरही राग व्यक्त केला.

मराठा समाजाला मागील काही वर्षांत मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला. त्या तुलनेत अनेक जाती असूनही ओबीसींना फार कमी निधी देण्यात आला. या प्रकरणी सरकार व वित्त विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणाचे समर्थन होऊच शकत नाही. जीआर निघाल्यामुळे आपण सर्वजण असहाय्य झालो आहोत. इथे प्रश्न सुटला नाही, तर आम्ही थेट कोर्टात जाऊन निर्णय घेऊ, असे भुजबळ म्हणाले.

भुजबळ यांच्या या संतापानंतर ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना तसे निवेदन उपसमितीपुढे सादर करण्याचे निर्देश दिले. काही नेत्यांचा ओबीसी समाजावर अन्याय होणार असल्याचा गैरसमज आहे. त्यावर मंत्रिमंडळाच्या उपसमितीत चर्चा झाली.

बैठकीत एकही चुकीचे प्रमाणपत्र दिले जाऊ नये यावरही उहापोह झाला. विशेषतः छगन भुजबळ राज्य सरकाच्या जीआर विरोधात कोर्टात गेले तर तो सर्वस्वी त्यांचा निर्णय असेल. तूर्त कुणाला ओबीसींवर अन्याय होत असल्याचे कुणाला वाटत असेल तर त्यांनी उपसमितीला निवेदन पाठवावे. त्यावर समिती विचार करेल, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

### छगन भुजबळ सरकारसाठी डोकेदुखी



मंत्री छगन भुजबळ हे महायुती सरकारसाठी डोकेदुखी ठरत असल्याची टीका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी केली. छगन भुजबळ महायुती सरकारसाठी डोकेदुखी ठरत आहेत. सरकारनेच त्यांना तुरुंगाबाहेर काढले होते. आता ते सरकारलाच घातक ठरत असतील तर त्यांना पुन्हा तुरुंगात टाका, असे ते म्हणालेत.
जरांगे बुधवारी याविषयी बोलताना म्हणाले, छगन भुजबळ यांच्या भूमिकेमुळे सरकार व मराठा समाजातील तणाव वाढू शकतो. भुजबळ सरकारसाठी धोक्याची घंटा ठरत आहेत. छगन भुजबळ हे देवेंद्र फडणवीस यांच्याहून मोठे नाहीत. मराठा आरक्षणाच्या जीआरनंतर मराठा समाज व सरकारमधील ताणतणाव कमी होत आहे. भुजबळांमुळे तो पुन्हा वाढू नये. विशेषतः भुजबळांमुळे आपल्याला डाग लागू नये याची काळजी फडणवीसांनी घ्यावी. अन्यथा त्यांना पुन्हा तुरुंगात जाऊ देणेच चांगले. कारण, तुम्हीच (सरकार) त्यांना बाहेर आणले. आता ते तुम्हाला घातक ठरणार असतील तर त्यांना पुन्हा तुरुंगात टाका. तेच बरे. अन्यथा संपूर्ण महायुती सरकारला भुजबळ डाग लावू शकतात, असे ते म्हणाले.

## निवडणूक आयोग हुकूमशहा

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १० :**

### राहुल गांधीची पुन्हा टीका



रायबरेली येथील प्रजापती समाज अधिवेशनात राहुल गांधी यांनी भाजप आणि आरएसएसवर निशाणा साधला.

ते म्हणाले, देशातील ९० टक्के लोकसंख्या ओबीसी, दलित आणि आदिवासींची आहे, परंतु हे भाजप-आरएसएसचे लोक त्यांची कधीही प्रगती करू इच्छित नाहीत. त्यांना दलितांनी जिथे आहेत तिथेच राहावे आणि अंबानींनी जिथे आहेत तिथेच राहावे असे वाटते. पंतप्रधान मोदी स्वतः ओबीसी आहेत, पण ते जातीय जनगणनेवर काहीही बोलत नाहीत. जेव्हा मी संसदेत त्यांना याबद्दल प्रश्न विचारला तेव्हा ते दीड तास भाषण देत राहिले, पण जातीय जनगणनेवर एकही शब्द बोलले नाहीत.

बुधवारी सकाळी ८:३० वाजता राहुल गांधी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानावरून रायबरेलीला रवाना झाले. ते दिल्ली विमानतळावरून विमानाने लखनऊला पोहोचले आणि तेथून ते रस्तेमार्गे रायबरेलीला पोहोचले. वाटेत राहुल गांधींच्या ताफ्याला निदर्शनांचा सामना करावा लागला.
पंतप्रधानांना शिवीगाळ केल्याच्या मुद्द्यावरून योगी सरकारचे मंत्री दिनेश प्रताप सिंह त्यांच्या समर्थकांसह राहुल यांच्या मार्गावर धरणे आंदोलनाला बसले. त्यांनी राहुल परत जाण्याच्या घोषणा दिल्या. निषेधामुळे राहुल यांचा ताफा सुमारे १ किलोमीटर आधी थांबवण्यात आला.

राहुल गांधी बतोही रिसॉर्ट येथे पोहोचले. कार्यकर्त्यांना संबोधित करताना ते म्हणाले, पूर्वी लोक म्हणायचे की काहीतरी निश्चितच गोंधळ आहे, पण कोणाकडेही पुरावे नव्हते. आता पुरावे आहेत. मते चोरीला जात आहेत. हे थांबवायला हवे. निषेध असूनही, निवडणूक आयोग हुकूमशाही पद्धतीने वागत आहे.
राहुल गांधी ११ सप्टेंबर रोजी रायबरेलीत असतील. लोकसभेनंतर रायबरेलीला त्यांचा हा सहावा दौरा आहे.

## शिवाजी पार्कवर उद्धव ठाकरेंचाच आवाज



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
शिवसेनेच्या दसरा मेळाव्याची ओळख असलेल्या शिवाजी पार्क मैदानावर यंदाही उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मेळावा घेण्यासाठी परवानगी मिळाली आहे. मात्र, महानगरपालिकेने ही परवानगी देताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला २५ अटी घातल्या आहेत.
शिवसेनेच्या स्थापनेपासून शिवाजी पार्क हे दसरा मेळाव्याचे मुख्य केंद्र राहिले आहे. उबाठाने शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी महापालिकेकडे अर्ज केला होता. महापालिकेने तो अर्ज स्वीकारून ठाकरे गटाला दसरा मेळावा घेण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा शिवाजी पार्कवर ठाकरेंचा 'आवाज' घुमणार आहे.

## मुंबई मनपा निवडणुकीसाठी शिंदेसेनेने कंबर कसली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिंदेसेनेने जोरदार तयारी सुरू केली आहे. शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या वतीने पक्षाची मुख्य कार्यकारी समिती तयार करण्यात आलेली आहे.

यात पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्यासह २१ शिलेदारांचा समावेश करण्यात आला आहे. आगामी महापालिका निवडणुकीतील पक्षाच्या पातळीवरील महत्त्वाचे निर्णय या समितीच्या माध्यमातून घेण्यात येणार आहेत. शिवसेनेचे प्रमुख नेते, खासदार, माजी खासदार, आमदार, माजी आमदार यांना यात संधी देण्यात आली आहे. या समितीची मुख्य

### २१ शिलेदारांचा समावेश



जबाबदारी आगामी महापालिका निवडणुकीतील रणनीती ठरवणे, उमेदवारांची निवड करणे आणि पक्षाच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करणे ही असेल. यामुळे स्थानिक कामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## हैदराबाद गॅझेट जीआरबाबत सुप्रीम कोर्टात कॅव्हेट दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर केलेल्या उपोषणानंतर सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला. सरकारने हैदराबाद गॅझेटियरचा संदर्भ देत तसा शासन निर्णय (जीआर) जारी केला.
या निर्णयाला आव्हान दिले जाण्याची शक्यता असल्याने मराठा आंदोलकांनी आता सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. यामुळे, जर कुणी या निर्णयाच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल केली, तर याचिकाकर्त्यांची बाजू ऐकून कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आंदोलकांची बाजूही ऐकून घेतली जाईल.
मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणानंतर मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासह आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचाही जीआर सरकारने काढला. मात्र, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या निर्णयावर ओबीसी समाजाने नाराजी व्यक्त केली आहे. या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्याची तयारी ओबीसी समाजाने दाखवली होती. त्यामुळेच, ॲड. राज पाटील यांच्यावतीने सुप्रीम कोर्टात हैदराबाद गॅझेटबाबत कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे.

## आम्हाला आपल्या संविधानाचा अभिमान

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :**
राष्ट्रपती आणि राज्यपालांच्या मंजुरीची डेडलाइन मागणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना सरन्यायाधीश बीआर गवई यांनी बुधवारी नेपाळ बंडाचा उल्लेख केला. ते म्हणाले, आपल्या संविधानाचा आपल्याला अभिमान असला पाहिजे, शेजारील देशांमध्ये काय चालले आहे ते पहा. आपण ते नेपाळमध्ये पाहत आहोत.
यावर न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनी जोडले की हो, बांगलादेश देखील. त्यापूर्वी, सॉलिसिटर जनरल म्हणाले,१९७० पासून, राष्ट्रपतींकडे फक्त २० विधेयके प्रलंबित राहिली आहेत, तर ९०% विधेयके एका महिन्यात मंजूर होतात. सरन्यायाधीशांनी यावरही आक्षेप घेतला आणि म्हणाले की केवळ आकडेवारीवरून निष्कर्ष काढणे योग्य नाही. जर राज्यांनी दिलेला डेटा विचारात घेतला नाही तर तुमचा डेटा देखील विचारात घेतला जाणार नाही.

### नेपाळ संघर्षावर सीजेआय गवई यांचे विधान



# नेपाळ लष्कराच्या ताब्यात

### सुशीला कार्की बनू शकतात नेपाळच्या अंतरिम पीएम

■ **वृत्तसंस्था**
**काठमांडू, दि. १० :**
नेपाळमध्ये सोशल मीडियावरील बंदी आणि भ्रष्टाचाराविरुद्ध सुरू असलेले आंदोलन बुधवारी तिसऱ्या दिवशी थांबले. हिंसक निदर्शने थांबवण्यासाठी लष्कराने मंगळवारी रात्री १० वाजता संपूर्ण देशाचा ताबा घेतला.



सैन्य आणि जनरेशन झेड निदर्शकांमध्ये अंतरिम सरकार स्थापन करण्यासाठी दिवसभर चर्चा सुरू राहिली. १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेल्यांना जनरेशन झेड म्हणतात.
स्थानिक माध्यमांमध्ये असा दावा करण्यात आला आहे की देशाच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की अंतरिम पंतप्रधान होऊ शकतात. त्यांना जनरेशन झेडचा पाठिंबा मिळाला आहे. याशिवाय काठमांडूचे महापौर बालेन शाह, रबी लामिछाने, कुलमन घिसिंग आणि हरका संपांग यांची नावेही समोर आली आहेत.
दरम्यान, दोन दिवसांच्या हिंसाचारानंतर आज अनेक खुलासे होत आहेत. सीपीएन अध्यक्ष पुष्पा कमल दहल 'प्रचंड' यांची मुलगी गंगा दहल यांच्या जळालेल्या घरातून एक मृतदेह सापडला. सध्या मृतदेहाची ओळख पटलेली नाही. देशभरातील तुरुंगांमधून ११००० हून अधिक कैदी पळून गेल्याचे नेपाळ पोलिसांचे म्हणणे आहे. पश्चिम नेपाळमधील एका तुरुंगात सुरक्षा कर्मचारी आणि कैद्यांमध्ये संघर्ष झाला. पोलिसांच्या गोळीबारात पाच कैद्यांचा मृत्यू झाला आणि चार गंभीर जखमी झाले.

## महाजनकोला राख मिश्रीत निकृष्ट कोळसा पुरवठा : विज उत्पादनात घट

■ **प्रविण बतकी, चंद्रपूर, दि. १० :**
उत्तम दर्जाच्या कोळशा उत्पादनामुळे चंद्रपूर जिल्ह्यात वेकोलीसह खासगी कोळसा खदानीच्या संख्येत वाढ होत आहे. मात्र खदानीतून काढलेला उत्कृष्ट दर्जाचा कोळसा गैरप्रकारातून पैसे कमावण्याच्या हव्यासामुळे कोळसा पुरवठा साखळीत आपला जम बसविलेल्या संबंधीत एजन्सीच्या माध्यमातून उत्कृष्ट दर्जाच्या कोळशाचे रुपांतर चारकोल राख मिश्रीत कोळशात होत असते.
मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाच्या कोळशामुळे विज उत्पादनात मोठी तुट येत असून राज्य सरकारला आर्थिक फटका बसत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा गोरखधंदा सुरु असून यात राजकीय वरदहस्त असल्याने कारवाई तर दुरच साधी चौकशी देखील होत नाही हि आश्चर्यजनक बाब आहे. राजकीय वरदहस्त कोणाचा आहे हे देखील येत्या काळात समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.
महाजनकोचे अध्यक्ष तथा प्रबंधकीय संचालक यांना निकृष्ट दर्जाच्या कोळसा पुरवठा बाबत गंभीर प्रकारच्या तक्रारी करण्यात आल्या आहे. यात म्हटले आहे की, चंद्रपूर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या महामाया कोल वाशरी उसगांव घुग्गूस कंपनीद्वारे महाजनकोला कोराडी व अन्य प्रकल्पासाठी वाश कोल पुरवठा करण्यात येणाऱ्या सामग्रीच्या गुणवत्तेबाबत गंभीर तक्रारी देण्यात आली आहे.
सदर कंपनीकडून, चारकोल वायोमास प्लांट मधून निघणारी राख इत्यादि मिश्रीत करून निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरवठा केला जात असून, यामुळे प्रकल्पाच्या कामकाजावर व पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होत आहे. यामध्ये आर्थिक आणि नैतिक भ्रष्टाचार असल्याचे देखील स्पष्टपणे दिसून येते.



महामाया कंपनीकडून पुरवठा केलेली सामग्री (वॉश कोल) मानकांनुसार नसून याचा परिणामी विद्युत निर्मितीत भरिव तुट होत आहे. असे तक्रारीत स्पट केले असताना महाजनकोने याबाबत कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही.
अनेकदा महाजनको व्यवस्थापनाने कोळसा पुरवठा एजन्सीकडून निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरविण्यात येत असल्याचे विज उत्पादनात घट होत असल्याचे चौकशी अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे. तरी देखील महाजनकोला जाग येत नाही की झोपण्याचे सोंग केले जात आहे. असा सवाल उपस्थित होत आहे.
महामाया कोल वॉशरी कंपनी उसगांव घुग्गुस कडून चारकोल मिश्रित निकृष्ट कोळसा पुरवठा केला जात आहे त्यामुळे एमएसएमसी सोबत कोल वाश करार नामे तत्कळ रद्द करण्याबाबत निवेदन विजय ठाकरे यांनी महाजनकोचे अध्यक्ष तथा प्रबंधकीय संचालक यांना तक्रारीतून केली आहे.
यासोबत ठाकरे यांनी महामाया कोल वॉशरी कंपनीला तात्काळ ब्लॅकलिस्ट करण्यासाठी 'एमएसएमसी सोबत केलेला करार रद्द करण्यात यावा. पुरवठ्यातील निकृष्टतेबाबत चौकशी समिती नियुक्त करून एसएमएमसीचे २४/७ फील्ड मध्ये असनारे अधिकारी यांचे लोकेशन तपासावे व दोषींवर कार्यवाही करावी भविष्यात अशा निकृष्ट पुरवठ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर नियम लागू करावेत. अशी मागणी विजय ठाकरे यांनी महाजेनकोकडे केली आहे.

## नेपाळनंतर फ्रान्समध्येही सरकारविरोधात निदर्शने

### १ लाख लोक रस्त्यावर

■ **वृत्तसंस्था, पॅरिस, दि. १० :**
नेपाळनंतर आता फ्रान्समध्येही सरकारविरुद्ध निदर्शने सुरू झाली आहेत. बुधवारी बजेट कपातीविरोधात आणि अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी १ लाखांहून अधिक लोक रस्त्यावर उतरले.
गृहमंत्री ब्रुनो रेशियो म्हणाले, रेनेस शहरात निदर्शकांनी बस पेटवली. नैऋत्य भागात वीज वाहिनी खराब झाल्यानंतर रेल्वे सेवा थांबवण्यात आल्या.



गृहमंत्र्यांनी निदर्शकांवर बंडाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला.

# नेपाळमधील अस्थिरतेमागे अमेरिकेचा हात!



■ **मुंबई :** नेपाळमधील राजकीय अस्थिरतेमागे अमेरिका असल्याचा अंगुलीनिर्देश वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. अमेरिका भारत व चीनला अनुकूल असणाऱ्या सरकारांना हटवून भारतीय उपखंडात आपला प्रभाव प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. यासाठी जागतिक आर्थिक महासत्तेकडून भू-राजकीय इंजिनिअरिंग अर्थात पुनर्रचनेचा खेळ खेळला जात आहे, असे त्यांनी म्हटले आहे. भारताचे शेजारी राष्ट्र असलेल्या नेपाळमध्ये तरुणांनी मोठी बंडखोरी केली आहे. त्यांच्या निदर्शनामुळे तेथील राष्ट्रपती, पंतप्रधानांसह सर्वच मोठ्या पदांवरील अधिकाऱ्यांना व नेत्यांना राजीनामा द्यावा लागला आहे. या घटनाक्रमामुळे भारतीय उपखंडात खळबळ माजली असताना भारताने त्यावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी या घटनाक्रमामागे अमेरिकेचा हात असल्याचा आरोप केला आहे.

प्रकाश आंबेडकर बुधवारी नेपाळमधील घटनाक्रमावर भाष्य करताना म्हणाले की, भारताचा शेजारी देश -प्रथम बांगलादेश व आता नेपाळ - मोठ्या प्रमाणात अस्थिरता व राजकीय संकट अनुभवत आहे. अर्थात, बांगलादेश व नेपाळमधील सरकारांविरोधातील निदर्शने ही भ्रष्टाचार, बेरोजगारी या वैध चिंतेतून निर्माण झाली होती. पण राजकीय संकटाला चालना देण्यासाठी निदर्शनांचा फायदा घेण्यात अमेरिकेची भूमिका दुर्लक्षित करता येणार नाही.

तत्पूर्वी, अन्य एका ट्विटद्वारे आंबेडकरांनी भाजप ओबीसींचा शत्रू असल्याचाही आरोप केला होता. भाजपने एका दगडात अनेक पक्षी मारले आहेत, आणि आरक्षण असूच नये असा गोंधळ घालायला त्यांनी सुरुवात केली आहे. भाजपकडून सांगितले जाते की, आमचा डीएनए हा ओबीसी आहे पण, ओबीसींनी हे समजून घेतले पाहिजे की, ओबीसींचा सर्वात मोठा शत्रू भाजपच आहे.

## मास्टरमाइंडला का पकडत नाहीत?

### बाबा सिद्दिकी हत्या प्रकरण



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येच्या तपासावरून त्यांचे पुत्र आणि आमदार झिशान सिद्दिकी यांनी मुंबई पोलिसांवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कुख्यात गुंड अनमोल बिष्णोईची चौकशी करण्यात पोलिस टाळाटाळ करत असल्याचा आरोप करत झिशान सिद्दीकी यांनी थेट पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दिकी यांची १२ ऑक्टोबर रोजी हत्या करण्यात आली होती. बाबा सिद्दिकी आपल्या मुलाच्या कार्यालयाकडे जात असताना, तीन अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला होता. या घटनेनंतर त्यांना तातडीने लिलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी निर्मल नगर पोलिसांनी हरियाणा आणि उत्तर प्रदेशमधील दोन आरोपींना ताब्यात घेतले असून, मुंबई क्राईम ब्रँच या प्रकरणाचा तपास करत आहे.

बाबा सिद्दिकी हत्याप्रकरणी पोलिसांच्या तपासासंदर्भात बोलताना झिशान सिद्दीकी यांनी, मुंबई पोलिस अनमोल बिष्णोईला मुंबईत आणून चौकशी का करत नाहीत की या हत्येमागे नेमका कोण 'मास्टरमाईंड' आहे? मुंबई पोलिस अनमोल बिष्णोईला घाबरत आहेत का?असा सवाल केला आहे. अनमोल बिष्णोईला आणण्यासाठी काय पुढाकार घेतला, असे पोलिसांना विचारले असता, आम्ही पीडितच्या मुलाला हे सांगू शकत नाही. अनमोल बिष्णोईला अलर्ट केले जाईल, असे उत्तर पोलिसांनी दिले.

## पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार

**नाशिक :** नाशिकमध्ये अत्यंत धक्कादायक तसेच संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर आपल्या पित्याकडूनच लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. मुलगी ८ आठवड्यांची गरोदर राहिल्याने ही घटना लक्षात आली. पोट साफ होत नसल्याने मुलीच्या पोटात दुखत असल्याची तक्रार मुलीकडून होत होती. त्यानुसार तिच्या आईने रुग्णालयात तपासणीसाठी नेले असता ही घटना उघडकीस आली. नाशिकच्या गंगापूर पोलिस ठाणे हद्दीत ही घटना घडली असून नराधम बापाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पीडित मुलीच्या पोटात दुखत असल्याने तिच्या आईने तिला सातपूर येथील कामगार विमा रुग्णालयात दाखल केले. तपासणी केल्यानंतर मुलगी आठ आठवड्यांची गरोदर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घटनेची माहिती गंगापूर पोलिसांना देण्यात आली. गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी आईच्या फिर्यादीनुसार अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला. जवळपास शंभर संबंधित लोकांची चौकशी करण्यात आली.

# बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेस गती देण्यासाठी
# १७ ते २२ सप्टेंबर दरम्यान विशेष मोहिम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेस गती देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने १७ ते २२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विशेष मोहिम राबवण्यात येणार आहे. या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्यात येईल, असे महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना राज्यस्तरीय समितीची बैठक महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीस ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार रणधीर सावरकर, आमदार संजय बनसोडे, आमदार सत्यजित देशमुख, आमदार दिलीप बनकर, आमदार सुमित वानखेडे, आमदार हेमंत पाटील, आमदार राजेश क्षीरसागर, आमदार विठ्ठल लंगे, आमदार उमेश यावलकर, आमदार समीर कुणावर, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले उपस्थित होते. आमदार अभिमन्यू पवार, जमाबंदी आयुक्त डॉ. सुहास दिवसे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.



### कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी उपाययोजना करणार : गोरे

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ग्रामीण भागात रस्त्यांची कामे दर्जेदार होत आहेत. बळीराजा शेत पाणंद रस्ते मोहिमेस गती देण्यासाठी शासनाने शासन निर्णय निर्गमित केला असून गाव पातळीवर याची अंमलबजावणी सुरू होत आहे. या अनुषंगाने शेत व पाणंद रस्त्याची कामे गुणवत्ता पूर्ण काम होण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. शेत पाणंद रस्ते बनविताना प्रामुख्याने माती, मुरूम व खडी याचा वापर होत असल्याने त्या माध्यमातून तयार होणारे थर आणि त्यांची मजबुती याकडे लक्ष दिले जावे असे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले.

बावनकुळे म्हणाले, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी विधानसभाक्षेत्र निहाय समिती स्थापन केली जाणार असून या समितीचे अध्यक्ष संबंधित विधानसभा क्षेत्राचे आमदार राहतील, विधानसभा क्षेत्रनिहाय समितीचे सदस्य सचिव प्रांतअधिकारी राहणार असून त्यांच्या समवेत समितीमध्ये महसूल, पोलीस, ग्रामविकास अधिक विभागाचे अधिकारी असतील.

तांत्रिक व कार्यकारी यंत्रणेच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अभ्यास गटाने याबाबत आराखडा तयार करावा, असे बावनकुळे यांनी सांगितले.

रोजगार हमी योजना मंत्री गोगावले म्हणाले, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या समन्वयाने महाराष्ट्रात राबविली जात आहे. यातून असंख्य कामे सुरु आहेत. बळीराजा शेत व पाणंद रस्ते मोहिमेत देखील चांगली कामे करण्यात येतील.

राज्यमंत्री ॲड. जयस्वाल म्हणाले, शेत व पाणंद रस्ते योजनेमुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या तंट्यांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

अतिरिक्त मुख्य सचिव खारगे यांनी योजनेसाठी अभ्यास गटाने तयार केलेल्या उपाययोजनाची माहिती दिली. बैठकीमध्ये उपस्थित सदस्य आमदार यांनी चर्चेत सहभाग घेऊन बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना अंमलबजावणी व कार्यवाहीसाठी विविध मुद्दे व सूचना मांडल्या.

शेत व पाणंद रस्ते नोंद करण्यास प्राधान्य देताना, रस्ते नोंद नकाशे ग्राम पंचायत स्तरावर प्रदर्शित करणे यासह मंजूर केलेले रस्ते खुले करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## कामगार धोरणे ठरवताना संघटनांच्या सूचनांचा समावेश



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :** कामगार संघटनांच्या सूचना व मागण्यांचा विचार करून धोरण तयार करण्यात येईल. राज्यातील कामगारांच्या आरोग्य, आर्थिक व कौटुंबिक हितांचा सर्वांगीण विचार करूनच नवे नियम करण्यात येतील असे राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिले. भारतीय मजदूर संघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस कामगार विभागाच्या प्रधान सचिव ए. आय. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. तुम्मोड तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

फुंडकर म्हणाले अनेक दशकांपासून असलेले नियम बदलत्या काळानुसार अपुरे ठरत असल्याने सुधारणा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बदल केवळ औपचारिक न राहता तो कामगारांच्या हिताचा व सर्वसमावेशक असला पाहिजे. कामगारांचा प्रतिसाद, सहभाग व सुचना घेऊनच पुढील निर्णय होणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

कामगारांच्या नियमांध्ये करण्यापूर्वी एस ओ पी तयार करण्यात येणार असून .त्यांचा अभ्यास करण्यासाठी कामगार संघटनांना देण्यात येणार आहे. कामगारांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्याचा प्रयत्न राहणार आहे. कामगारांच्या सामाजिक सुरक्षेपासून ते आर्थिक, कौटुंबिक अडचणींपर्यंत सर्वांगीण विचार करून सकारात्मक व हितकारक बदल नियमांमध्ये केले जातील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## उद्धव ठाकरे पुन्हा 'राज' घरी



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी पुन्हा एकदा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. यापूर्वी गणेश उत्सवाच्या निमित्ताने उद्धव हे राज यांच्या घरी गेले होते. त्यानंतर आज पुन्हा एकदा ते त्यांच्या घरी गेलेत. या भेटीमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेला बळ मिळाले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात गत काही महिन्यांपासून ठाकरे बंधूंच्या आघाडीची चर्चा रंगली आहे. राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानी गेले होते. त्यानंतर उद्धव ठाकरे अनेक वर्षांनंतर गणेश उत्सवाच्या निमित्ताने राज यांच्या घरी गेले होते. या भेटीत त्यांनी तिथे जेवणही केले होते. त्यानंतर आज पुन्हा एकदा उद्धव ठाकरे हे राज यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी गेलेत.

उद्धव यांची ही भेट कौटुंबिक आहे की राजकीय? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण उद्धव यांच्यासोबत खासदार संजय राऊत व आमदार अनिल परब आहेत. त्यामुळे उभयतांच्या या भेटीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसह संभाव्य राजकीय आघाडीवर चर्चा सुरू असल्याचा दावा केला जात आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे ठाकरे बंधूंची आजची भेट पूर्वनियोजित असल्याचाही दावा केला जात आहे. ठाकरे बंधूंची आजची भेट अचानक झाली नाही. ती पूर्वनियोजित आहे. दोन दिवसांपूर्वीच या बैठकीची रुपरेषा ठरली होती. या वाढत्या भेटीगाठीमुळे राज व उद्धव यांच्यातील वैचारिक दुरावा कमी होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्र काँग्रेसच्या काही प्रमुख नेत्यांनी दोन दिवसांपूर्वीच उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. यावेळी राज ठाकरे यांच्या मनसेला महाविकास आघाडीत घेण्याच्या मुद्यावर धीरगंभीर चर्चा झाली होती. त्यात काँग्रेसने अत्यंत सावध भूमिका घेतली होती.

## नवनिर्वाचित उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांचे
# मुख्यमंत्री फडणवीसांकडून अभिनंदन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार सी.पी. राधाकृष्णन भारताच्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीत विजयी झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी संदेशात म्हटले आहे की, राधाकृष्णन यांचे जीवन सेवा, समर्पण आणि राष्ट्रहिताप्रती निष्ठेचे प्रतीक आहे. शिक्षण, सामाजिक उत्थान आणि सुशासनातील योगदान प्रेरणादायी आहे. आपल्या अनुभव आणि दूरदृष्टीमुळे भारत नव्या उंची गाठेल आणि जागतिक स्तरावर सशक्त स्थान प्राप्त करेल. राज्यपाल म्हणून आपले मार्गदर्शन अमूल्य आहे.


उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राधाकृष्णन यांचे अभिनंदन करताना म्हटले आहे की, राज्यपाल श्री. सी.पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक शुभेच्छा. त्यांनी राज्यपालपदाचा गौरव वाढवला. समर्पण आणि विनम्र नेतृत्वाचा हा सन्मान आहे. विकासाची गंगा सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांचे उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीतील विजयाबद्दल अभिनंदन केले आहे. त्यांच्या अनुभवाचा देशाच्या लोकशाही आणि संविधानिक मूल्यांच्या सक्षमीकरणासाठी निश्चितच लाभ होईल, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. संसदीय परंपरा अधिक सक्षम करण्यासाठी, संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी व लोकशाही बळकट करण्यासाठी उपराष्ट्रपतींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. श्री. सी. पी. राधाकृष्णन यांच्या अनुभवाचा देशाला निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या संदेशात म्हणतात की, श्री. राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून कार्यरत राहिले आहेत. त्यामुळे उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत त्यांचा झालेला विजय ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची व आनंदाची बाब आहे. राधाकृष्णन यांचा हा विजय 'एनडीए'च्या एकजुटीचा आणि लोकांच्या केंद्र सरकार वरील विश्वासाचा, भारतीय संविधानाच्या मूल्यांचा विजय आहे. देशातील लोकशाही संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी ते निश्चितच योगदान देतील, असा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

## कांद्याचा बंफर स्टॉक बाजारात आणल्याने शेतकऱ्यांचे नुकसान

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :** राज्यात कांद्याचा गहन प्रश्न समोर उभा राहत असतानाच आणि सध्या कांद्याचे भाव उतरलेले असताना नाफेडने कांदा बाजारात आणल्यामुळे कांद्याचे भाव आणखी पडले आहेत. कांद्याला सरासरी १४०० ते १५०० रुपये भाव असताना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) यांनी बफर स्टॉकचा कांदा बाजारात आणल्यामुळे कांद्याचे भाव आणखी खाली आले आहेत आणि यामुळे शेतकरी हवालदिल झाला असल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्र्यांना दिली.




राज्य सरकारच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः केंद्रासोबत बोलणार असुन शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नसल्याचे देखील यावेळी छगन भुजबळ यांनी सांगितले..

शेतकऱ्यांच्या कांद्याला दर मिळत नसताना दुसरीकडे केंद्र सरकारने नाफेडच्या माध्यमातून आता सवलतीच्या दरात कांदा विक्री सुरू केली आहे. ग्राहकांना कांदा सहज उपलब्ध व्हावा, यासाठी दिल्ली, मुंबई आणि अहमदाबाद,चेन्नई, गुवाहाटी आणि कोलकाता या शहरांमध्ये या शहरांत २४ रुपये किलो या किफायतशीर दराने कांदा विक्री सुरू करण्यात आली आहे.

बाजारात आवक वाढल्यास दर आणखी खाली येण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे ग्राहकांना फायदा होणार असला तरी शेतकऱ्यांना मात्र मोठा फटका बसणार असल्याची माहिती छगन भुजबळ यांनी दिली. राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) केंद्रीय भांडार यांच्या माध्यमातून ज्या शहरांत कांद्याचे दर ३० रुपये किलोपेक्षा जास्त आहेत, त्या शहरांमध्ये २४ रुपये किलो दराने कांदा विकला जाणार आहे. डिसेंबरपर्यंत ही विक्री प्रक्रिया सुरू राहणार आहे.

## भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे



थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज १३० वी जयंती.

कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे.

त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले.

पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले.

त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या.

७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले.

त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली.

१९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले.

भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# नवीन युवा धोरण तयार करण्याच्या दिशेने मोठे पाऊल

## १० कोटी रुपये मंजूर; दहा वर्षांच्या गरजा आणि २०४७ पर्यंतचा दीर्घकालीन आराखडा



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :** महाराष्ट्र सरकारने नवीन युवा धोरण तयार करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासाठी १० कोटी रुपये मंजूर केले आहेत. विशेष म्हणजे यावेळी धोरण तयार करणाऱ्या समितीमध्ये विरोधी पक्षांचे आमदार आणि महिलांचाही समावेश असेल.

राज्याचे सध्याचे युवा धोरण २०१२ मध्ये बनवण्यात आले होते आणि २०२२ मध्ये संपले होते. आता नवीन धोरण बनवण्याची तयारी सुरू आहे.

गेल्या वेळी हे धोरण बनवण्यात आले तेव्हा फडणवीस विरोधी पक्षात होते आणि समितीचे सदस्य होते. यावेळी ते मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसून नवीन धोरणाचा आराखडा तयार करत आहेत.

यापूर्वी जेव्हा समिती स्थापन करण्यात आली तेव्हा महिला आणि विरोधी पक्षांना त्यात स्थान देण्यात आले नव्हते. यासाठी सरकारवर टीका झाली होती. आता सुधारित समितीमध्ये राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे अभिजीत पाटील आणि रोहित पाटील, शिवसेनेचे (ठाकरे गट) वरुण सरदेसाई, पीडब्ल्यूपीचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यासह महिला कार्यकर्ते आणि तज्ज्ञांचा समावेश आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी म्हणाले की, पुढील १० वर्षांत महाराष्ट्र ७५ वर्षांचा होईल. त्यामुळे नवीन युवा धोरण बनवताना पुढील दहा वर्षांच्या गरजा आणि २०४७ पर्यंतचा दीर्घकालीन आराखडा लक्षात ठेवावा लागेल. ते म्हणाले की, धोरण असे असावे की ग्रामीण आणि शहरी दोन्ही तरुणांना समान संधी मिळतील आणि वेगवेगळ्या विचारसरणीच्या तरुणांचा सहभाग देखील सुनिश्चित केला जाईल.

धोरण व्यावहारिक करण्यासाठी, तरुणांशी थेट बोलले जाईल. यासाठी राज्यभर सर्वेक्षण केले जाईल, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रे आयोजित केली जातील, सोशल मीडियावर मते घेतली जातील आणि सेवा क्षेत्र आणि शेतीशी संबंधित तरुणांशीही बोलले जाईल. धोरण केवळ कागदावर राहू नये म्हणून व्यावसायिक संघटनांना सहभागी करून घेतले जाईल असे सरकारने म्हटले आहे. डेटा गोळा करतील आणि विश्लेषण करतील जेणेकरून धोरण जागतिक दर्जाचे बनवता येईल.

महाराष्ट्रातील तरुणांसाठी वयोमर्यादा १५ ते ३५ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. आमदारांनी मागणी केली आहे की या मोठ्या व्याप्तीचे लहान भागांमध्ये विभाजन करावे, जेणेकरून वेगवेगळ्या वयोगटातील तरुणांच्या गरजांनुसार कार्यक्रम तयार करता येतील. शिक्षण घेणाऱ्या आणि काम करणाऱ्या तरुणांची आव्हाने वेगवेगळी आहेत, त्यामुळे त्यांच्यासाठी एकच योजना प्रभावी ठरणार नाही.

# पोलिस असल्याचे सांगून ३ तासांत तिघांचे आठ लाखांचे दागिने लुटले



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १० :
पोलिस असल्याची बतावणी करुन तीन तोतयांनी चार तासात दोन महिलांसह तिघांकडील सोन्याचे ८६.५ ग्रॅमचे दागिने लुटले. या दागिन्यांची किंमत किमान आठ लाख आहे. या तिन्ही घटना मंगळवारी ९ सप्टेंबरला सकाळी आठ ते अकरा वाजताच्या सुमारास घडल्या. यातील दोन घटना शहरात तर तिसरी घटना वरुडला घडली.
कॉंग्रेसनगरातील कमल अरुण चांदुरे (७४) या निवृत्त शिक्षिका आहेत. सकाळी पावणे नऊ वाजताच्या सुमारास त्या रुक्मिनीनगरातील डॉ. डफळे हॉस्पीटलमध्ये पतीला घेऊन आल्या होत्या. दवाखान्यातून बाहेर आल्या व दवाखान्यासमोर उभ्या होत्या. त्यावेळी एका व्यक्तीने त्यांना आवाज दिला व समोर दुचाकीवरील दोघांनी बोलवल्याचे सांगितले. त्यामुळे कमल चांदुरे त्या दोघांजवळ गेल्या असता त्यांनी चांदुरे यांना सांगितले कि, आम्ही पोलिस आहोत. आजपासून दोन दिवस अंगावर सोने घालण्यास बंदी आहे. सोने घातले तर २ हजार दंड होईल. त्यावेळी चांदुरे यांनी त्या तोतयांना म्हटले कि, आतापर्यंत असे कधीही नव्हते. त्यानंतर त्या दोघांनी चांदूरे यांना अंगावरील दागिने जबरीने काढण्यास सांगितले. त्यामुळे चांदूरे यांनी गळ्यातील २१ ग्रॅमचे मंगळसूत्र, बोटातील साडेपाच ग्रॅमची अंगठी काढायला सांगितली, असे एकूण २६.५ ग्रॅमचे दागिने तोतयाने एका कागदात बांधून ठेवले. ही पुडी बॅगमध्ये ठेवण्यास सांगून तोतये निघून गेले. याचदरम्यान तोतयांनी हातचलाखी करुन हे दागिने पळवले. त्यानंतर अवघ्या काही वेळातच चांदूरे यांनी ती पुडी उघडून पाहिली असता त्यामध्ये दगड निघाला. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच चांदुरे यांनी राजापेठ ठाणे गाठून तक्रार दिली. तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञात तीन तोतयांविरुद्ध गुन्हा दाखल केला.
दुसरी घटना शहरातील राठीनगरात सकाळी नऊ वाजताच्या सुमारास घडली. भारती मोहनलाल केवलानी (४४, रामपुरी कॅम्प) या राठीनगरातून पायी जात होत्या. त्यावेळी दुचाकीवर आलेल्या दोघांनी त्यांना थांबवून आम्ही पोलिस आहोत. तुम्ही थांबा दागिने काढून ठेवा, असे म्हटले. उर्वरित. पान ४ तोतयांनी पोलिस असल्याची बतावणी करुन तळेगाव दशासर व वरुडला याचप्रकारे दोन ज्येष्ठांचे १३७ ग्रॅम सोन्याचे सुमारे बारा लाखांचे दागिने लंपास केले होते.

## वाघाचा हल्ल्यात गाय ठार

**भिवापूर :** तालुक्यातील चिखलापार येथील शेतकरी हितेश सपाटे यांच्या शेतात आज दुपारी सुमारास १२ वाजताच्या दरम्यान वाघाने हल्ला करून जर्सी जातीची गाय ठार मारली. गाईची किंमत अंदाजे ७५ हजार रुपये असून या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
या भागात मोठ्या संख्येने वाघांचा संचार असून बारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. याबाबत वनविभाग दक्षिण उमरेड यांनी तातडीने लक्ष घालून वाघांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकरी यांनी केली आहे. तसेच पीडित शेतकऱ्याला त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी भिवापूर तालुका शेतकी सहकारी खरेदी विक्री समितीचे सभापती भास्कर भाऊराव येंगळे यांनी केली आहे.

## 'सीएम' वाघ जंगलात परतण्याची शक्यता धूसर

■ महासागर प्रतिनिधी,
चंद्रपूर, दि. १० :
चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील प्रसिद्ध छोटा मटका, म्हणजेच सीएम, वाघाला व्याघ्र प्रकल्पातील खडसंगी भागातून जेरबंद करण्यात आले. कारण त्याच्या उजव्या पायाच्या पंजातील हाडे मोडून तो जखमी झाला होता. छोटा मटका हा जखमी वाघ सध्या चंद्रपूर येथील ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर येथे उपचारासाठी दाखल आहे. उपचारांचा कालावधी आणि त्याला कधी ताडोबामध्ये परत सोडले जाईल, हे त्याच्या उपचारांवर आणि प्रकृतीवर अवलंबून असेल. परंतु सध्यातरी त्याला परत सोडण्याची शक्यता कमी असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.



एक्स-रेरिपोर्टमध्ये डाव्या पुढच्या अंगाच्या उल्नाच्या हाडाच्या खालच्या भागात फ्रॅक्चर झाल्याचे दिसून आले. वाघाच्या दातांनाही नुकसान झाले आहे. पशुवैद्य आणि वन्यजीव तज्ज्ञांच्या मतानुसार, छोटा मटकाला (टी-१२६) ताबडतोब जंगलात सोडता येणार नाही. त्याला उपचार आणि पुनर्वसनासाठी बराच काळ लागेल. छोटा मटकाने बजरंग (नोव्हेंबर २०२३) आणि ब्रह्मा (मे २०२५) यांना ठार मारले. तिसऱ्या वाघाचे नाव ङ्गरामदेगी असून, तो छोटा मटकाच्या प्रदेशात घुसल्याने मारला गेला. ब्रह्मा या वाघासोबत झालेल्या झुंजीत मे महिन्यात छोटा मटका गंभीर जखमी झाला होता. तर ब्रह्मा वाघाचा झुंजीत मृत्यू झाला होता. त्यानंतर अलीकडेच गाईच्या एका कळपावर हल्ला करताना छोटा मटका पुन्हा जखमी झाला होता. त्यामुळे या वाघाला जेरबंद करून उपचार करावे अशी अनेक स्वयंसेवी संस्था आणि वन्यजीव प्रेमींनी मागणी केली होती. जखमी असलेल्या छोटा मटका मुळे मानव-वन्यजीवसंघर्ष होऊ नये म्हणून त्याला जेरबंद करण्यात आल्याचा खुलासा ताडोबा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

**शिकार करणे कठीण**
छोटा मटका गंभीर जखमी झाल्याने तो उपासमारीने मरू शकतो, हे वन विभागाच्या लक्षात आल्यानंतर त्याच्यावर आधी पाळत ठेवली गेली. अशातच त्याने एका गायीची शिकार केली.


**NAGPUR MUNICIPAL CORPORATION, NAGPUR**
**(Online)TENDER NOTICE**

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites e – tenders in B – 1 form / appropriate form for the following works. These e – tenders can be purchased from Website (https://Mahatenders.gov.in). The Terms and Conditions of e – tenders are available on above website. Purchase and submission of e – tenders can be done through internet.

| Name of the work | Project Cost in Rs. |
| --- | --- |
| Supplying & Erecting Streetlighting of poles at Narbada Apartment Housing Society Gorewada in p. no. 11 Under Zone no. 10 | Rs. 8,21,144/- |

Note – 1) Tender Submission end date : 16-09-2025 ( up to 3:00 pm ) 2) Date of Opening of Tender (If Possible) : 17-09-2025 ( at 04:00 pm) 3) Rates are exclusive of G.S.T.

Advt No 463 PR
Date 10.09.2025

Executive Engineer (Electrical)
N.M.C., Nagpur


## ईद मिलादुन्नबीच्या मिरवणुकीचा झाला ८ तासांनी समारोप



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १० :
मुस्लिम बांधवांकडून ईद-ए-मिलादनिमित्त मिरवणूक (जुलूस) काढण्यात आली. सकाळी ११ वाजता सुरु झालेल्या मिरवणुकीचा समारोप रात्री ८ वाजताच्या सुमारास दुवा नंतर झाला. या मिरवणुकीतून एकतेचा संदेश देण्यात आला. हजरत मोहम्मद यांची १५०० वी जयंती ईद-ए-मिलादुन्नबीच्या जल्लोषात साजरी झाली. जयंतीनिमित्त जुलूस-ए-मोहम्मदी उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने काढण्यात आला. या जुलूसला अहले सुन्नत जमातचे सरपरस्त जनाब सय्यद जाकिमिया नक्शबंदी, आ. साजिद खान पठाण, जुलूस कमिटीचे अध्यक्ष हाजी महमूद खान उर्फ मुदाम आणि कच्छी मस्जिदचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केले.

## विद्यापीठ कर्मचारी धनंजय पाटील यांनी आचार्य पदवी मिळिवल्याबद्दल कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांच्या हस्ते सत्कार

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १० :
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भांडार विभागात अधीक्षक पदावर कार्यरत धनंजय पाटील यांना नुकतेच आचार्य पदवीने सन्मानित करण्यात आले आहे. 'सुधा मूर्ती यांच्या अनुवादित कथात्म साहित्यातील जीवनमूल्यांचा शोध' असा त्यांचा संशोधनाचा विषय होता. धनंजय पाटील यांनी आचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून कुलगुरू कार्यालयात



सन्मान केला. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, भांडार विभागातील श्री नरेंद्र घाटोळ व कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक श्री रमेश जाधव उपस्थित होते.याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी धनंजय पाटील यांनी शिक्षकेत्तर कर्मचा-याची सर्वस्वी जबाबदारी सांभाळून मिळिवलेले यश विशेष अधोरेखांकित होत असल्याचे गौरवोद्गार काढून त्यांना पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्यात.


**AUTHUM ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**

शाखा कार्यालय: ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड शाखा कार्यालय को/ओ. मायब्रँच सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड. ब्लॉक क्रमांक १०१ साला-सार पार्क पहिला मजला, घर क्रमांक ५५२, प्लॉट क्रमांक जी-१२१/१, गोरे पेठ रोड, कनेश बँकेच्या वर, धर्मपेठ, नागपूर, ४४००१०.
कॉर्पोरेट कार्यालय: - द रुबी ११ वा मजला, वायव्य विंग. प्लॉट क्रमांक २९, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-४०००२८ (महाराष्ट्र)

**खाजगी कराराद्वारे विक्रीची सूचना**

हे रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड (आरएचएफएल) च्या कर्जदारांनी ७ जून २०१९ रोजीच्या आरबीआय परिपत्रकानुसार, तणावग्रस्त मालमत्तेच्या निराकरणासाठी प्रुडेंशियल फ्रेमवर्कच्या संदर्भात मंजूर केलेल्या रिझोल्यूशन प्लॅननुसार आहे. भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या ३ मार्च २०२३ रोजीचा आदेश आणि २५ मार्च २०२३ रोजी शेअरहोल्डर्सनी पारित केलेल्या विशेष ठरावानुसार, आरएचएफएल ने त्यांचा व्यवसाय मंदीच्या विक्रीद्वारे रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड (आरसीएफएल) कडे हस्तांतरित करण्यास मान्यता दिली आणि कर्जदाराच्या कर्ज खात्याशी संबंधित सर्व अधिकार आणि दायित्वे देखील आरसीएफएल कडे हस्तांतरित करण्यात आली आहेत.
ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (एआयआयएल) कडे गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेची विक्री (रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड (आरसीएफएल) कडून कर्ज देण्याच्या व्यवसायाचे १०.०५.२०२४ च्या एनसीएलटी आदेशानुसार ऑटरवाल विलय झाल्यानंतर परिणामी कंपनी), ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय द रुबी ११ वा मजला, वायव्य विंग, प्लॉट क्रमांक २९, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८ (महाराष्ट्र) येथे आहे आणि ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड शाखा कार्यालय को/ओ मायब्रँच सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड ब्लॉक क्रमांक १०१ सालासार पार्क, पहिला मजला, घर क्रमांक ५५२, प्लॉट क्रमांक जी-१२१/१, गोरे पेठ रोड, कनेश बँकेच्या वर, धर्मपेठ, नागपूर, ४४००१० येथे शाखा कार्यालय आहे - वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटीझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सायुदे) अंतर्गत कायदा)
ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (एआयआयएल) चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीकार करणारे याद्वारे कळवत आहेत की कर्जदाराचे भावेश मगनलाल अवानी १. गिरीशकुमार मगनलाल अवानी, ३. रूपाबेन भावेशकुमार अवानी, ४. भावेश मगनलाल अवानी, ५. विशाल व्यापारी, ६. विशाल एंटरप्राइजेस यांचे कर्ज खाते क्रमांक RHLPNAG000057083 आणि RHLPNAG000057324 च्या अटी आणि शर्तीनुसार आर्थिक सुविधा/आयज घेतल्या आहेत आणि सहमती दर्शवली आहे. [illegible]
जनतेला कळविण्यात येते की अधिकृत अधिकाऱ्याने २९/०९/२०२५ रोजी कराराद्वारे खालील मालमत्ता विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे. [illegible]

| कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव | आजच्या तारखेला एकूण देयके | मान्य किंमत (रु.) | विक्रीची तारीख |
| --- | --- | --- | --- |
| १. भावेश मगनलाल अवानी २. गिरीशकुमार मगनलाल अवानी ३. रूपाबेन भावेशकुमार अवानी ४. भावेश मगनलाल अवानी ५. विशाल व्यापारी ६. विशाल एंटरप्राइज | १०-०९-२०२५ रोजी एकूण थकबाकी ८,२८,६९,९९९.१६/- (रुपये आठ कोटी अठ्ठावीस लाख एकोणसत्तर हजार नऊशे नव्व्याण्णव फक्त) | रु. ३,२२,००,०००.००/- (रुपये तीन कोटी बावीस लाख फक्त) | २९/०९/२५ |

मालमत्ता / सुरक्षा हितसंबंध तपशील: डुप्लेक्स एक क्रमांक डी-३०९ ३४५ वा फ्लायर नूक १ वी क्रमांक ११५ सीटीएस क्रमांक १०८ सीट क्रमांक ५३/२५ चालत क्रमांक ४ डब्ल्यू क्रमांक ७२ कॉर्प एनएनओ १२१ लेख रामदासपेठ नागपूर, महाराष्ट्र-४४००१०

ऑनलाइन ई-लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती:-
१) खाजगी कराराद्वारे विक्री जशी आहे जिथे आहे आणि जशी आहे तशी या तत्वावर होईल.
२) खरेदीदाराला बँकेने मालमत्तेच्या खरेदीसाठी ऑफर स्वीकारल्याच्या दिवशीच एकूण विक्री मोबदला किंमत जमा करावी लागेल.
३) बँकेला ज्ञात किंवा अज्ञात असलेल्या सर्व विद्यमान आणि भविष्यातील भारांसह मालमत्ता विकली जात आहे. अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय-पक्षाच्या दाव्यांसाठी/हक्कांसाठी/देयकेसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
४) खरेदीदाराने मालमत्तेशी संबंधित सर्व पैलूंवर त्याच्या समाधानासाठी योग्य तपासणी करावी. खरेदीदाराला नंतरच्या तारखेला अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदाराविरुद्ध या संदर्भात कोणताही दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
५) मालमत्तेच्या खरेदीसंदर्भातील सर्व मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क आणि इतर खर्च, कर, शुल्क खरेदीदाराने भरावे.
६) विक्री सरफैसी कायदा / नियमांच्या तरतुदींनुसार असेल.
७) ऑफरची वैधता १५ दिवसांची आहे आणि त्यानंतर ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला कोणतीही पूर्वसूचना न देता ठेव जप्त करण्याचा अधिकार असेल.

ठिकाण:- नागपूर
दिनांक: ११.०९.२०२५
एसडी/-
ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडसाठी


# सौर प्रकल्पातून १६०० शेतकऱ्यांना दिवसा वीज



■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. १० :
महावितरणच्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ला गती देण्यात आली, असून बाभुळगाव तालुक्यातील ४ मेगावॅट क्षमता असलेल्या किन्ही सौर प्रकल्पामुळे तालुक्यात १ हजार ६०० शेतकऱ्यांना दिवसा विजेची सोय झाली आहे. तसेच याअगोदर कार्यान्वित झालेल्या तालुक्यातील २ मेगावॅट सावर सौर प्रकल्पातून १ हजार २६० शेतकऱ्यांना दिवसाला वीज मिळत आहे. शेतीपंपाला दिवसा आणि शाश्वत वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबवण्यात येत आहे. विकेंद्रीत सौर प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यात १६ हजार मेगावॅट क्षमता असलेले सौर प्रकल्प उभारण्यात येत आहे.
किन्ही सौर प्रकल्प हा तालुक्यातील २ मेगावॅट सावर सौर प्रकल्पानंतर दुसरा सौर प्रकल्प उभारण्यात आला असून या प्रकल्पाची क्षमता ४ मेगावॅट आहे. शिवाय या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महावितरणच्या ३३ केव्ही सरुळ उपकेंद्राच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी वापरण्यात येणार आहे. मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंता प्रविण दरोली यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात एकूण १२ सौर प्रकल्प कार्यान्वित झाले, असून वीज निर्मिती क्षमता ४० मेगावॅट एवढी झालेली आहे. तसेच या प्रकल्पाच्या माध्यमातून जिल्ह्यातील ११ हजार २३७ शेतकऱ्यांना दिवसा आणि मागणीनुसार विजेची सोय झाल्यामुळे शेतकऱ्यात आनंदाचे वातवरण आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला जिल्ह्यात गती देण्यात आली असून महावितरणच्या कळंब उपविभागातील पाथ्रड येथे सौर प्रकल्प सुरू झाल्यामुळे एकूण सौर ऊर्जानिर्मितीत ४ मेगावॅटने वाढ झाली आहे.


# कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी
## त. हिंगणा, जि. नागपूर

दूरध्वनी क्र. : ९८२३५१४९९५ email : mewanadongar12016@gmail.com

जावक क्रमांक: नपवा/डे-एनयुएलएम /२४६८/२०२५-२६ दिनांक : १०/०९/२५

**जाहीर सूचना दुसरी वेळ**

नगरपरिषद वानाडोंगरी कार्यक्षेत्रा करिता DAY-NULM/D-JAY या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणी करिता वानाडोंगरी शहरातील महिला मधून समूह संसाधन व्यक्ती (CRP) ची नेमणूक करण्यात येत आहे, सदर पद हे करार पद्धतीने भरणे आहे, नेमणुकीचे पात्रता व अटी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पद | एकूण रिक्त जागा | शिक्षण | वयोमर्यादा | अनुभव |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | समूह संसाधन व्यक्ती (CRP) | १२ | १० वी उत्तीर्ण | २१ ते ४५ | किमान १८ महिने महिला बचत गट मध्ये सदस्य असावा |

१. शहरामध्ये क्षेत्रीय / वस्ती पातळीवर सहाय्य करण्यासाठी समुदाय संसाधन व्यक्तींची (CRP) निवड करणे व त्यांना मार्गदर्शक सूचनांनुसार सेवाशुल्क अदा करणे यासाठी त्या शहराच्या जवळील शहर स्तरीय संघांच्या माध्यमातून प्रक्रिया राबविण्यात येणार.
२. स्थानिक स्तरावरील NRLM / MAVIM किंवा इतर शासकीय विभाग यांनी यापूर्वी स्थापन केलेल्या गटांमधून CRP निवडता येतील.
३. शहरांमध्ये वस्ती स्तरीय संघ व शहर स्तरीय संघ स्थापन झाल्यावर सदरचे समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) हे त्याच शहरामध्ये स्थापन झालेल्या शहर स्तरीय संघांतर्गत / सनियंत्रणा मध्ये कार्य करतील.

(राहुल परिहार)
मुख्याधिकारी तथा शहर प्रकल्प अधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी


## तिवसा नगरपंचायतीच्या व्हॉल्मनची आत्महत्या



**अमरावती :** तिवसा नगरपंचायतीतून व्हॉल्मन म्हणून सेवानिवृत्त झालेल्या एका कर्मचाऱ्याने उशीरा सायंकाळी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. बाबुराव महादेवराव मकेश्वर (वय ६४, रा. तिवसा) असे आत्महत्या करणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे नाव आहे.
रजा रोखीकरण आणि वेतन निश्चिती न झाल्यामुळे गेल्या पाच वर्षांपासून ते आर्थिक विवंचनेत होते. याच विवंचनेमुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जाते. दरम्यान त्यांच्या आत्महत्येला तिवसा नगरपंचायत प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप त्यांच्या पत्नी लता मकेश्वर यांनी केला आहे. आपल्या हक्काच्या रजा रोखीकरण व वेतन निश्चितीतून होणाऱ्या मिळकतीसाठी ते गेल्या पाच वर्षांपासून तिवसा नगरपंचायतच्या पायऱ्या झिझवत होते.


**Mahindra FINANCE**

नोंदणीकृत कार्यालय: गेटवे बिल्डिंग, अपोलो बंदर, मुंबल-४०० ००१.
कॉर्पोरेट कार्यालय: बी विंग, तिसरा मजला, अगस्त्य कॉर्पोरेट पार्क, पिरामल अमिती बिल्डिंग, कामानी जंक्शन, कुर्ला पश्चिम मुंबई-४०० ०७०.

**नियम ८(६) अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ (सरफेसी कायदा) अंतर्गत बँकेला आकारण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ (नियम) च्या नियम ८(६) सह वाचलेले.
सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदार, जामीनदार आणि गहाणखतदारांना सूचना देण्यात येत आहे की, महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (सुरक्षित कर्जदार/एनबीएफसी) कडे गहाण/चार्ज केलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्याचा ताबा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने सरफेसी कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत घेतला आहे, जो येथे तपशीलवार वर्णन केलेल्या नियमांसह वाचला जातो, तो जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे, जे काही आहे आणि विना आश्रय आधारावर या तारखेला विकला जाईल, खालील ई-लिलाव वेळापत्रकानुसार बोली मागवून नियमांच्या नियम ८ आणि ९ अंतर्गत येथे तपशीलवार वर्णन केलेल्या बँकेच्या थकबाकी आणि व्याज वसूल करण्यासाठी:

पक्ष, थकबाकी आणि मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन

| कर्जदार आणि गहाणखतदार (कर्जदार) यांचे नाव | मागणी रक्कम, मागणी सूचना तारीख आणि ताबा सूचना तारीख | मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ | कागदपत्रांसह बोली स्वीकारण्याची अंतिम तारीख | ई-लिलावाची तारीख आणि वेळ | आरपी, ईएमडी आणि बीआयए | अधिकृत अधिकाऱ्याचे नाव, संपर्क क्रमांक आणि ईमेल आयडी |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १. मेसर्स मोहम्मद अली ट्रेडिंग कमिटी (कर्जदार) २. श्री. गुलामरसूल रमजान खान (सह-कर्जदार) ३. श्री. जमीर खान रसूल खान (सह-कर्जदार आणि गहाणखत) | मागणी रक्कम: ३१ जुलै २०२४ रोजी रु. २०,४१,२४०.०५/- (रुपये वीस लाख एकेचाळीस हजार दोनशे चाळीस पैसे फक्त) १३(२) मागणी सूचना तारीख: १६.०८.२०२४ ताबा देण्याची तारीख: १६.०७.२०२५. | दि. २२.०९.२०२५ ते दि.२६.०९.२०२५ रोजी सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत | १६.१०.२०२५ | ई-लिलावाची तारीख: दि. १७.१०.२०२५ ई-लिलावाची वेळ: सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० | राखीव किंमत: रु.१२,५०,०००/- (बारा लाख पन्नास हजार रुपये फक्त) सर्वात कमी रक्कम: रु.१,२५,०००/- (एक लाख पंचवीस हजार रुपये फक्त) बोली वाढवणारी रक्कम: रु.१०,०००/- (दहा हजार रुपये फक्त) | श्री. आरिफ खान +91 9822548464 ARIF.KHAN@mahindrafinance.com. अनुरोध कुमार तिवारी +91 9752002281 ANURODH.TIWARI@mahindrafinance.com. श्री वरद भरनुके +91 8097185044. varad.bharnuke@mahindrafinance.com. |

मालमत्तेचा तपशील - निवासी फ्लॅट क्रमांक ४०७ चौथ्या मजल्यावरील सर्व तुकडा आणि पार्सल, नूर हाइट्स नावाच्या अपार्टमेंटमध्ये, प्लॉट क्रमांक ४२, प्रॉपर्टी क्रमांक ५०२९, प्लॉट क्रमांक ४३. प्रॉपर्टी क्रमांक ३९६०, प्लॉट क्रमांक ४४, प्रॉपर्टी क्रमांक ३९६०/१ आउट ऑफ फील्ड सर्वेक्रमांक ३/३, ग्रामपंचायत भौरड, मौजे टपलाबाद, अकोला येथे स्थित. अकोला-४४४००१. ५१.१२ चौ. मीटर लांबीचा फ्लॅट आणि ११.६२ चौ. मीटर लांबीचा अविभाजित जमीन. खालीलप्रमाणे सीमा: पूर्वेकडे रस्ता, पश्चिमेकडे फ्लॅट क्रमांक ४०४, दक्षिणेकडे : जिना केस, उत्तरेकडे: फ्लॅट क्रमांक ४०६

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया https://www.mahindrafinance.com/sme-loans/auction-notices येथे दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या किंवा अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधा आणि ई-लिलाव मार्गदर्शनासाठी संपर्क व्यक्ती श्री. बालाजी मन्नूर. मोबाईल क्रमांक: ७९७७७०१०८०, ई-मेल-आयडी: Mannur,govindarajan@clindia.com.

दिनांक: ११.०९.२०२५
स्थळ: अकोला, महाराष्ट्र
स्वा/-अधिकृत स्वाक्षरीकर्ता,
महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड



**Mahindra FINANCE**

नोंदणीकृत कार्यालय: गेटवे बिल्डिंग, अपोलो बंदर, मुंबल-४०० ००१.
कॉर्पोरेट कार्यालय: बी विंग, तिसरा मजला, अगस्त्य कॉर्पोरेट पार्क, पिरामल अमिती बिल्डिंग, कामानी जंक्शन, कुर्ला पश्चिम मुंबई-४०० ०७०.

**नियम ८(६) अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ (सरफेसी कायदा) अंतर्गत बँकेला आकारण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ (नियम) च्या नियम ८(६) सह वाचलेले.
सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदार, जामीनदार आणि गहाणखतदारांना सूचना देण्यात येत आहे की, महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (सुरक्षित कर्जदार/एनबीएफसी) कडे गहाण/चार्ज केलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्याचा ताबा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने सरफेसी कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत घेतला आहे, जो येथे तपशीलवार वर्णन केलेल्या नियमांसह वाचला जातो, तो जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे, जे काही आहे आणि विना आश्रय आधारावर या तारखेला विकला जाईल, खालील ई-लिलाव वेळापत्रकानुसार बोली मागवून नियमांच्या नियम ८ आणि ९ अंतर्गत येथे तपशीलवार वर्णन केलेल्या बँकेच्या थकबाकी आणि व्याज वसूल करण्यासाठी:

पक्ष, थकबाकी आणि मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन

| कर्जदार आणि गहाणखतदार (कर्जदार) यांचे नाव | मागणी रक्कम, मागणी सूचना तारीख आणि ताबा सूचना तारीख | मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ | कागदपत्रांसह बोली स्वीकारण्याची अंतिम तारीख | ई-लिलावाची तारीख आणि वेळ | आरपी, ईएमडी आणि बीआयए | अधिकृत अधिकाऱ्याचे नाव, संपर्क क्रमांक आणि ईमेल आयडी |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १. मेसर्स एम सादिक हार्डवेअर (कर्जदार) २. श्री. मोहम्मद शेहजाद मोहम्मद सादिक (सह-कर्जदार आणि गहाणखत) ३. श्रीमती समीनना शाहीन मोहम्मद शेहजाद (सह-कर्जदार आणि गहाणखत) | मागणी रक्कम: १८ सप्टेंबर २०२४ रोजी रु.३५,८०,८७४.७४/- (रुपये पस्तीस लाख अंशी हजार आठशे चौहत्तर रुपये चौहत्तर पैसे फक्त); १३(२) मागणी सूचना तारीख: २४.०९.२०२४ ताबा तारीख: १७.०७.२०२५. | दि. २२.०९.२०२५ ते दि.२६.०९.२०२५ रोजी सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत | १६.१०.२०२५ | ई-लिलावाची तारीख: दि. १७.१०.२०२५ ई-लिलावाची वेळ: सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० | राखीव किंमत: रु.३२,००,०००/- (रुपये बत्तीस लाख फक्त) सर्वात कमी रक्कम ठेव: रु.३,२०,०००/- (रुपये तीन लाख वीस हजार फक्त) बोली वाढीव रक्कम: रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) | श्री. आरिफ खान +91 9822548464 ARIF.KHAN@mahindrafinance.com. अनुरोध कुमार तिवारी +91 9752002281 ANURODH.TIWARI@mahindrafinance.com. श्री वरद भरनुके +91 8097185044. varad.bharnuke@mahindrafinance.com. |

मालमत्तेची माहिती- सर्व्हेक्रमांक ५४/१ आणि ५४/२ मधील प्लॉट क्रमांक ९९, गॅट क्रमांक १२२, मालमत्ता (मालमत्ता) क्रमांक ४१३८, वॉर्ड क्रमांक सी१०, मौजे शिलोडा येथे स्थित, महानगरपालिका हद्दीतील अकोला, तालुका आणि जिल्हा अकोला. २००० चौ. फु (१८५.८७ चौ. मीटर) आकाराचा प्लॉट आणि त्यावर उभे असलेले बांधकाम ज्याची खालीलप्रमाणे सीमा: पूर्वेकडे किंवा दिशेने: ३० फूट रुंद लेआउट रोड; पश्चिमेकडे किंवा दिशेने: ५ फूट सर्व्हिस लेन; उत्तरेकडे किंवा दिशेने: प्लॉट क्रमांक ९८; दक्षिणेकडे किंवा दिशेने: प्लॉट क्रमांक १००.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया https://www.mahindrafinance.com/sme-loans/auction-notices येथे दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या किंवा अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधा आणि ई-लिलाव मार्गदर्शनासाठी संपर्क व्यक्ती श्री. बालाजी मन्नूर. मोबाईल क्रमांक: ७९७७७०१०८०, ई-मेल-आयडी: Mannur,govindarajan@clindia.com.

दिनांक: ११.०९.२०२५
स्थळ: अकोला, महाराष्ट्र
स्वा/-अधिकृत स्वाक्षरीकर्ता,
महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

# ना लीडर, ना चेहरा..
## नेपाळी जेन झेड का भडकले?

नेपाळमध्ये सोशल मीडियावरील बंदी आणि सरकारी भ्रष्टाचारावरून तरुण रस्त्यावर उतरले. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही यात भाग घेतला. सुरुवातीला त्यांची संख्या सुमारे १५ ते २० हजार होती. लवकरच ती ४०-५० हजारांवर पोहोचली. निदर्शक संसदेत प्रवेश करू लागले तेव्हा पोलिसांनी गोळीबार केला. या दरम्यान सुमारे २० लोक मृत्युमुखी पडले आणि २०० हून अधिक लोक जखमी झाले. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी पाण्याच्या तोफांचा वापरही केला. गर्दी नियंत्रित करण्यासाठी लष्करालाही पाचारण करावे लागले. या निषेधात कोणताही नेता नव्हता किंवा कोणताही मोठा चेहरा नव्हता. तरीही नेपाळच्या इतिहासात निदर्शकांनी संसदेत घुसून तोडफोड केली आणि आग लावली. काठमांडू प्रशासनाने तोडफोड करणाऱ्यांना दिसताच गोळ्या घालण्याचे आदेश दिले. नेपाळमध्ये हे आंदोलन कसे सुरु झाले? एवढी मोठी गर्दी कशी जमली? यामागे कोणी चेहरा किंवा नेता आहे का?

---------------

८ सप्टेंबर रोजी नेपाळमध्ये झालेल्या निदर्शनात सहभागी झालेले बहुतेक लोक विद्यार्थी होते. त्यापैकी काही जण शाळेच्या गणवेशात आले होते. सुरुवातीला निदर्शने शांततेत सुरू होती. अचानक निदर्शक संसदेच्या आवारात घुसू लागले. त्यांना हाकलून लावण्यासाठी पोलिसांनी गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. 'इतके लोक जखमी झाले होते की रुग्णालयातील सर्व बेड भरले होते. जखमींना जमिनीवर पडून मलमपट्टी केली जात होती. कर्मचारी खूप कमी होते आणि खूप ताणतणावात होते.

काठमांडूमध्ये विद्यार्थ्यांवर गोळीबार केल्याचा एक व्हिडिओही समोर आला आहे. यामध्ये काही तरुणांनी जखमी विद्यार्थ्याला मदत करण्यासाठी रुग्णवाहिका थांबवली. ते विद्यार्थ्याला आत घेऊन जात असताना पोलिसांनी वरून त्यांना लक्ष्य केले आणि त्यांच्यावर गोळीबार केला. ज्यामध्ये एका तरुणाचा मृत्यू झाला.

गेल्या काही दिवसांत नेपाळमधील या आंदोलनाबाबत सोशल मीडियावरील पोस्ट तपासल्या असता नेपाळमधील या आंदोलनाचे पैलू समजले. हे आंदोलन अचानक झाले नाही तर ते शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून परवानगी घेण्यात आली होती. नंतर ते हिंसक झाले.

या चळवळीचा पाया फेसबुक आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्टॉप करप्शन, जेनझेड नेपाळ आणि वेक अप नेपाळ या हॅशटॅग्जचा वापर करून घातला गेला. काठमांडूचे महापौर आणि रॅपर बालेन शाह यांच्या फेसबुक पोस्टने जास्तीत जास्त तरुणांपर्यंत हे अभियान पोहोचवण्यात भूमिका बजावली.

बालेन शाह यांनी ७ सप्टेंबर रोजी एक पोस्ट पोस्ट केली होती. ज्यामध्ये त्यांनी लिहिले होते, ८ सप्टेंबरची रॅली स्पष्टपणे जेन झेडची आहे. मी २८ वर्षांपेक्षा कमी वयाचा आहे पण आता मी त्यांच्या तुलनेत म्हातारा दिसतो. मला त्यांच्या इच्छा, हेतू आणि विचार समजून घ्यायचे आहेत. कोणत्याही पक्षाने, नेत्याने, कार्यकर्त्याने किंवा खासदाराने त्यांच्या वैयक्तिक फायद्यासाठी उद्याच्या रॅलीत सामील होऊ नये.

ही पोस्ट २१ हजारांहून अधिक वेळा शेअर करण्यात आली. ३.५ लाखांहून अधिक वापरकर्त्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिल्या. ३६ हजारांहून अधिक वापरकर्त्यांनी त्यावर कमेंट केल्या. सर्व कमेंटमध्ये, अधिकाधिक लोकांना निषेधासाठी बोलावण्याचे म्हटले होते. नेपाळमधील चळवळीची ही एकमेव सर्वाधिक व्हायरल सोशल मीडिया पोस्ट होती, ज्यावर तरुणांनी खूप प्रतिक्रिया दिल्या आणि ती व्हायरल केली.

या चळवळीबद्दल आणखी एक सोशल मीडिया पोस्ट आहे, जी नेपाळी तरुणाने खूप व्हायरल केली. या पोस्टमध्ये लिहिले आहे, ही आपल्या सर्वांची चळवळ आहे. येथे कोणालाही नेता बनवले जात नाही आणि कोणीही नेता बनण्याचा प्रयत्नही करू नये. सर्व तरुण नेते आहेत. संधीच्या शोधात कोणीही स्वतःला पुढे आणण्याचा प्रयत्न करू नये.

कोणताही अभिनेता, प्रसिद्ध व्यक्तिमत्व, नेता इथे येऊ नये. जर तुम्हाला खरोखरच पाठिंबा द्यायचा असेल तर तरुणांसोबत उभे राहा. हे कोणासाठीही प्रचाराचे व्यासपीठ नाही. हे आंदोलन आपल्या भविष्यासाठी, आपल्या आवाजासाठी, आपल्या सन्मानासाठी आणि अभिमानासाठी आहे. हिंसाचार नाही, द्वेष नाही, फक्त शांततेने आवाज उठवत आहे.

नेपाळमधील या चळवळीबाबत लोकांना एकत्र करण्यासाठी ही सोशल मीडिया पोस्ट देखील व्हायरल झाली. ही चळवळ अतिशय शांततेने सुरू झाली, ज्यामध्ये फक्त तरुणांसाठीच जागा होती. ती सोशल मीडिया बंदी, सरकारी भ्रष्टाचार आणि नेपो बेबीजच्या विरोधात होती. नेपो बेबीज म्हणजे घराणेशाही किंवा घराणेशाहीचे बळी. उदाहरणार्थ, तरुणांचा असा विश्वास आहे की करिअरमध्ये यश घराणेशाहीमुळे मिळू नये तर त्याच्या गुणवत्तेनुसार मिळावे.








निदर्शक अधिक सक्रिय झाले. हे आंदोलन इतके हिंसक होईल असे कोणीही विचार केला नव्हता. सरकारलाही याची कल्पना नव्हती. सरकार यामध्ये पूर्णपणे अपयशी ठरले. निदर्शकांनी संसदेत प्रवेश कधी केला हे पोलिस आणि स्थानिक प्रशासनालाही समजले नाही.'

'जेव्हा पोलिसांना कळले की जमाव नियंत्रणाबाहेर जात आहे, तेव्हा सैन्याला पाचारण करण्यात आले. तथापि, सुरुवातीला निदर्शक सैन्यासमोर झोपले, ज्यामुळे त्यांना पुढे जाणे कठीण झाले. जेव्हा काही निदर्शकांनी संसदेभोवती आग लावली आणि दगडफेक करून तोडफोड सुरू केली, तेव्हा त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला.'

नेपाळचे ज्येष्ठ पत्रकार नरेश ग्वावली म्हणतात, '८ सप्टेंबर रोजी झालेल्या हिंसक आंदोलनामागे दोन प्रमुख कारणे आहेत. हे आंदोलन अवघ्या दोन दिवसांत पूर्ण झाले. यामागील तात्काळ कारण म्हणजे सोशल मीडियावरील बंदी. कारण बंदीमुळे तरुण खूप संतप्त होते.'

फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅपसह अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी काही नियम आणि कायदे बनवण्यात आले आहेत, ज्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी न केल्याने ४ सप्टेंबर रोजी २६ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्यात आली. यामुळे तरुणांमध्ये संताप निर्माण झाला.

'या आंदोलनामागील दुसरे मोठे कारण म्हणजे भ्रष्टाचार. देशात स्थापन झालेल्या नवीन सरकारमध्ये अनेक जुने राजकारणी आहेत. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्या तरुणांमध्ये खूप संताप आहे. ते या विरोधात निषेध करत आहेत. या आंदोलनाचा कोणी नेता नाही, ना कोणी नेता आहे.'

'ही एक चळवळ आहे जी सोशल मीडियाद्वारे नियोजित आहे. तरुणांनी सोशल मीडियाद्वारेही याचा प्रचार केला. जेव्हा त्यावर बंदी घालण्यात आली तेव्हा त्यांनी शब्द चा वापर केला. त्यानंतर ही चळवळ इतकी मोठी झाली. ज्यामध्ये १५ ते २० हजार तरुण रस्त्यावर उतरले.'

सत्ताधारी कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळचे खासदार आणि पंतप्रधान केपी शर्मा ओली यांचे जवळचे मंगल प्रसाद गुप्ता म्हणतात, 'सोशल मीडियावरील बंदीविरोधात संसद भवन संकुलासमोर १० हजारांहून अधिक तरुण निदर्शने करत होते. त्यानंतर अचानक संसदेच्या पश्चिमेकडील प्रवेशद्वाराजवळ निदर्शकांची गर्दी जमू लागली. काही वेळाने हे लोक सभागृहाला घेरले आणि आत घुसले.'

'पोलिसांनी संपूर्ण निषेध संयमी आणि व्यावसायिक पद्धतीने नियंत्रित केला. जर सरकारने कडकपणा दाखवला नसता तर संसद भवन आणि परिसरातील प्रमुख इमारतींचे नुकसान झाले असते. या निषेधानंतर शेर बहादूर देउबा आणि केपी शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखाली एक उच्चस्तरीय बैठक झाली. सरकार काही व्यासपीठ मर्यादित आणि नियंत्रित पद्धतीने पुन्हा सुरू करण्याचा विचार करत आहे, परंतु त्यापूर्वी त्यांना नोंदणी करावी लागेल.'

'परिस्थिती सामान्य होईपर्यंत राजधानी काठमांडूसह सर्व प्रमुख भागात सैन्य आणि नेपाळ पोलिसांची तैनाती कायम राहील. अनेक तणावपूर्ण भागात कर्फ्यू सुरू आहे.' सरकारच्या निर्णयावर लोक नाराज आहेत, जेव्हा त्यांनी आवाज उठवला तेव्हा त्यांना गोळ्या घातल्या गेल्या.

नेपाळमधील सर्वात मोठ्या विरोधी पक्ष कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-माओइस्ट सेंटर (सीपीएन-एम) चे नेते शिवा सिंग ओली या निदर्शनांचे समर्थन करतात. शिवा म्हणतात, 'सध्याच्या सरकारच्या अनेक चुकीच्या निर्णयांमुळे नेपाळमधील जनता नाराज होती. सोशल मीडियावर अलिकडेच बंदी घातल्यामुळे हा राग आणखी उफाळून आला. जर सरकारला हवे असते तर ते शांततेने हे हाताळू शकले असते, परंतु तरुणांचे म्हणणे ऐकण्याऐवजी त्यांनी त्यांच्यावर लाठीमार केला. पोलिसांनी गोळीबारही केला. आमचा पक्ष या घटनेत मारल्या गेलेल्या सर्व तरुणांचा आवाज उठवेल.'

'बांगलादेश आणि श्रीलंकेत जे काही घडले, तिथेही अशीच परिस्थिती निर्माण होत आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये हेराफेरी आणि भ्रष्टाचारामुळे देशातील तरुण आधीच संतप्त होते. अशा परिस्थितीत सोशल मीडियावरील बंदीसारख्या हुकूमशाही निर्णयांमुळे परिस्थिती आणखी बिकट होत चालली आहे.'

खरे तर नेपाळमध्ये झालेल्या उद्रेकापासून भारतीय नेते, पुढारी, सत्ताधारी, विरोधक आणि एकूणच राजकारण्यांनी सावध व्हायला हवे. भारतात भ्रष्टाचार पराकोटीचा वाढला असून, भ्रष्ट नेते, पुढारी, मंत्री यांच्यावर कधीही कोणतीच कारवाई होताना दिसत नाही. प्रत्येक गोष्टीत पैसे खाण्याची त्यांना सवय पडली आहे. भ्रष्टाचार शिष्टाचार झाला आहे आणि देशातील तरुणाईमध्ये नेत्यांच्या या भ्रष्टाचाराविषयी कमालीचा संताप आहे. तो कधी, कसा आणि कोणत्या रूपात उफाळून येईल? सांगता येत नाही.

# केसीआर कुटुंबातील वाद चव्हाट्यावर!

तेलंगण राज्याच्या निर्मितीमध्ये तेलंगण राष्ट्र समितीचे सर्वेसर्वा के. चंद्रशेखर राव यांचा सिंहाचा वाटा होता. तेलंगण मधील जनतेने त्याची परतफेड म्हणून के चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखालील तेलंगण राष्ट्र समितीच्या हातात दोनदा राज्याची सत्ता सोपवली.

मात्र भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे २०२३ मध्ये झालेल्या तेलंगण विधानसभा निवडणुकीत तेलंगण राष्ट्र समितीला पराभव पत्करावा लागला आणि कॉंग्रेसने तेथील सत्ता काबीज केली.११९ सदस्यांच्या तेलंगण विधानसभेत कॉंग्रेसचे ६४ आमदार निवडून आले. तेलंगण राष्ट्र समितीला केवळ ३९ जागांवर समाधान मानावे लागले.

तेलंगणमध्ये लागोपाठ दोनदा विजय मिळवल्यानंतर तेलंगण राष्ट्र समितीचे सर्वेसर्वा के.च ंद्रशेखर राव यांची महत्वाकांक्षा वाढली आणि त्यांना आपला पक्ष अखिल भारतीय पातळीवर नेण्याची स्वप्ने पडू लागली. मग त्यांनी आपल्या पक्षाचे, तेलंगण राष्ट्र समिती हे नाव बदलून, भारत राष्ट्र समिती हे नाव ठेवले. परंतु पक्षाचे नवीन नाव त्यांच्याकरता फायदेशीर ठरले नाही. महाराष्ट्रातील मराठवाडा हा विभाग सोडला तर तेलंगण बाहेर इतरत्र पक्षाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. आपल्या पक्षाला अखिल भारतीय पक्ष बनवण्याचे राव यांचे स्वप्न अधुरेच राहिले आणि त्या अपयशात भर म्हणून तेलंगणची सत्ताही के. चंद्रशेखर राव यांच्या हातातून गेली.


अभय गोखले

तेलंगणमध्ये सत्ता काबीज केल्यानंतर कॉंग्रेसने भारत राष्ट्र समितीचे काही आमदार फोडून,के. चंद्रशेखर राव यांच्या पक्षाला आणखी कमकुवत केले. अर्थात त्याबद्दल कॉंग्रेसला दोष देण्यात काही अर्थ नव्हता, कारण के.चंद्रशेखर राव दोन टर्म राज्यात सत्तेवर असताना त्यांनी कॉंग्रेसचे आमदार फोडून या फोडाफोडीच्या राजकारणाचा श्रीगणेशा केला होता. २०२३ मध्ये राज्यात सत्तेवर आल्यानंतर, कॉंग्रेसने, भारत राष्ट्र समितीचे आमदार फोडून त्याचा बदला घेतला इतकेच.

तेलंगणमध्ये सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर राव आणि त्यांच्या पक्षाच्या अधोगतीला सुरुवात झाली आहे. त्यातच के.चंद्रशेखर राव यांच्या कुटुंबातील भांडणामुळे ते अधिकच त्रस्त झाले आहेत. के.चंद्रशेखर राव यांची कन्या के. कविता हिची नुकतीच पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे.

पक्षविरोधी कारवायांमुळे के. कविताची पक्षातून हकालपट्टी केल्याचे सांगितले जात असले तरी प्रकरण वरवर दिसते तेवढे साधे नाही. के.कविता नाराज असल्याच्या चर्चा बरेच दिवस ऐकायला मिळत होत्या. चुलत भाऊ हरिष राव आणि संतोष राव यांच्यावर त्या नाराज असल्याचे बोलले जात होते.

मध्यंतरी के. कविता यांनी आपले वडील आणि पक्षाचे सर्वेसर्वा के. चंद्रशेखर राव यांना एक पत्र लिहिले होते. ते पत्र त्यांनी आपल्या आईच्या मार्फत के.चंद्रशेखर राव यांच्याकडे पाठवले असे म्हटले जाते. मात्र ते खाजगी पत्र लीक झाले. ते कुणी लीक केले याचा शोध लागला नाही. त्या पत्रात कविता यांनी के चंद्रशेखर राव यांच्या भोवतालच्या कोटेरीवर टिका केली होती. त्यांच्या टिकेचा रोख अर्थातच हरिष राव आणि संतोष राव यांच्या दिशेने होता.

के. चंद्रशेखर राव हे तेलंगणचे मुख्यमंत्री असताना मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केलेला कलेश्वरम लिफ्ट इरिगेशन प्रकल्प सुरू करण्यात आला.त्यामध्ये झालेल्या भ्रष्टाचारात हरिष राव आणि संतोष राव यांचा हात होता, असा आरोप कविता यांनी केला. भ्रष्टाचार त्या दोघांनी केला परंतु त्यामध्ये आपले वडील के.चंद्रशेखर राव यांचे नाव उगाचच गोवण्यात आले असे कविता यांचे म्हणणे आहे.

आता तेलंगणच्या मुख्यमंत्र्यांनी कलेश्वरम लिफ्ट इरिगेशन प्रकल्पातील भ्रष्टाचाराचे प्रकरण सीबीआयकडे सोपवले आहे. त्यामुळे के.चंद्रशेखर राव यांची आता सीबीआयकडून चौकशी होऊ शकेल. के कविता यांचे हेच दुखणे आहे. आपल्या वडिलांना विनाकारण त्रास दिला जात आहे असे त्यांना वाटते.

के. कविता यांनी आपल्या वडिलांना लिहिलेले पत्र लीक झाल्यानंतर, वेगाने घडामोडी घडल्या आणि के.चंद्रशेखर राव यांनी आपल्या कन्येची पक्षातून हकालपट्टी केली.

हरिष राव हे के. चंद्रशेखर राव यांचे पुतणे आणि कविता यांचे चुलत भाऊ आहेत. ते के. चंद्रशेखर राव यांच्या अगदी निकटचे मानले जातात.के.चंद्रशेखर राव हे मुख्यमंत्री असताना हरिष राव हे त्यांच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे विभागाचे मंत्री होते. के. टी. रामाराव हे के. चंद्रशेखर राव यांचे सुपुत्र असून, कविता यांचे सख्खे भाऊ आहेत. ते पक्षाचे कार्याध्यक्ष असून, के.चंद्रशेखर राव यांचे राजकीय वारसदार आहेत.

के. टी. रामाराव यांच्यावर के कविता या नाराज नसल्या तरी त्यांनी पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे, रामाराव हे कविता यांच्यावर नाराज असल्याचे सांगितले जाते. रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या भावाला म्हणजेच के. टी. रामाराव यांना राखी बांधण्याची कविता यांची इच्छा होती, परंतु ते तेंव्हा बंगळूरुला गेल्याने त्यांना राखी बांधता आली नाही, असे म्हटले जाते. असेही बोलले गेले की कविता यांना टाळण्यासाठी के. टी.रामाराव हे जाणूनबुजून तेंव्हा बंगळूरुला गेले होते. एकंदरीत कविता यांची पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर के. चंद्रशेखर राव यांच्या कुटुंबातील वाद चव्हाट्यावर आले असून, कविता यांची पुढची चाल काय असेल, याचे उत्तर येणारा काळच आपल्याला देऊ शकेल.

■ ■ ■

# एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात ठेवणे काळाची गरज!

एकेकाळी घरोघरी एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात होती. त्यामुळे घरोघरी सुखी, समाधानी व आनंदी वातावरण पाहायला मिळायचे. एकमेकांच्या मदतीला धावून जाणे, एकमेकांना आर्थिक मदत करणे, एकमेकांच्या सुखदुःखात धावून जाणे आणि एकमेकांना मायेने व आपुलकीने बोलणे हे सारे एकत्र कुटुंब पद्धतीत आपल्याला प्रकर्षाने पाहायला मिळायचे.

त्याकाळी सख्ख्या भावांमध्ये प्रेम, माया व आपुलकी ठासून भरलेली होती. म्हणून तेव्हा भावंडांमध्ये कधीच आताच्या एवढे वाद-विवाद होत नव्हते. भाऊ भावाचा मनःपूर्वक आदर करत होता. एका भावावर संकट आले तर दुसरा भाऊ वाऱ्याच्या वेगाने धावून आपल्या भावाला आधार द्यायचा. एका भावाला दुःख झाले तर दुसऱ्या भावाला अतोनात वेदना व्हायच्या.

छोटा भाऊ मोठ्या भावाचा आदर राखायचा. मोठ्या भावाचा विचार घेऊनच छोटा भाऊ पुढील वाटचाल करायचा. एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात असल्यामुळे आई वडील व आजी आजोबा यांचे एकत्र कुटुंबात मोलाचे योगदान असायचे. आई-वडिलांमुळे व आजी आजोबांमुळे लहान मुलांवर संस्काराची पेरणी अतिशय चांगल्या पद्धतीने व्हायची.

एकत्र कुटुंब पद्धतीमुळे एकमेकांबद्दल असणारा मायेचा ओलावा आणि एकमेकांबद्दल असणारी प्रेमाची व आपुलकीची भावना ही ठळकपणे दिसायची. लहान मुले व नातवंड आजी आजोबांच्या संस्कार छायेखाली लहानाचे मोठे व्हायचे. आजी आजोबा देखील त्यांना जिवापाड जपायचे.

एकत्र कुटुंब पद्धतीमुळे शेती सुद्धा एकत्र केली जायची. त्यामुळे शेतीमध्ये शेतमाल भरमसाठ व्हायचा. शेतीमध्ये आलेली बरकत पाहून शेतकरी आनंदात न्हाऊन निघायचे.


बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर
जि. लातूर
7498715661

एकत्र कुटुंब पद्धतीमुळे प्रत्येक घरात व कुटुंबात एकमेकांबद्दल प्रेम, माया, आपुलकी व जिव्हाळा जणू काय मानवतेचा संदेश देत होता. घरोघरी माया, ममता व मानवता आनंदाने नांदत होती.

एकत्र कुटुंब पद्धतीचा फायदा असा व्हायचा की, घरातील ज्येष्ठांना म्हणजेच वृद्ध आई-वडिलांना घराबाहेर काढून वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवणारे महाभाग एकत्र कुटुंब पद्धतीत अस्तित्वात नव्हते. कारण एकत्र राहिल्यामुळे माणसांमध्ये एकमेकांबद्दल प्रेम भावना वाढीस लागते. एकमेकांबद्दल लळा लागतो आणि त्यांच्यातील असलेले नातेसंबंध अधिक घट्ट होऊन ते वेळप्रसंगी एकमेकांवर जीव ओवाळून टाकायला सुद्धा तयार होतात.

एकत्र कुटुंब पद्धतीमुळे आपल्या घरावर वाईट नजरेने बघायची कोणाची हिंमत सुद्धा होत नाही. कारण एकत्र कुटुंब पद्धती एकीचे दर्शन घडवते. पण असे एकीचे दर्शन घडवणारी एकत्र कुटुंब पद्धती हल्ली कुठेच अस्तित्वात राहिली नाही. हीच या देशाची खरी शोकांतिका आहे.

एकेकाळी एकत्र असणारे कुटुंब आता विभक्त झाले आहे. कारण काळानुसार माणसांमध्ये बदल होत गेला, माणसांची नीतिमत्ता बदलली, माणूस स्वार्थी व लोभी बनला. स्वतःसाठी आणि बायको मुलांसाठी जगणे हेच त्याचे जीवन ध्येय बनले आहे.

म्हणजे आजकालचा माणूस आपल्याच बायको मुलांत गुरफटून गेला आहे. त्याला घरातील सदस्य म्हणजेच आई वडील, बहिण भाऊ, आजी आजोबा आणि समाजबांधव यांचा काहीही संबंध राहिलेला नाही. फक्त आपणच कसे मोठे व्हावे आणि आपल्याच जवळ सर्वात जास्त पैसा व संपत्ती कशी गोळा होईल हा विचार प्रत्येक माणूस करत आहे.

----------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

■ ■ ■

## यंदाही उंच गणेश मुर्त्या समुद्र किनाऱ्यावरच!

वाचक लिहितात

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी गिरगाव चौपाटीच्या किनाऱ्यावर कितीतरी उंच गणेशमूर्त्या विसर्जनाविना उभ्या होत्या तर कितीतरी मुर्त्या किनाऱ्यावर कोसळून छिन्न विच्छिन्न अवस्थेत पडलेल्या होत्या.

ज्या श्री गणेशाला दहा दिवस मनोभावे पुजले जाते, त्याच्या चरणी नवस केले जातात, त्याच्या आगमनासाठी सुंदर सजावट केली जाते, वाजत गाजत त्याची मिरवणूक काढली जाते अशा गणेश मूर्तींची झालेली अवहेलना पाहून मनाला वेदना होतात. उंच मुर्त्यांचे दर्शन घेण्यासाठी देश विदेशातून लाखो भाविक दरवर्षी मुंबईत येत असतात. मात्र याच उंच मुर्त्या दुसऱ्या दिवशी समुद्राच्या किनारी पाहिल्यावर गणेश मूर्ती ही शोभेची आणि प्रदर्शनाची वस्तू बनू लागली आहे का असा प्रश्न पडतो.

यंदा भरती ओहोटीच्या अंदाज चुकल्याने दरवर्षी सकाळी १० वाजेपर्यंत होणारे लालबागच्या राजाचे विसर्जन यंदा १० तास लांबले तरीही लालबागच्या राजा मंडळाने बाप्पाचे नेहमीप्रमाणेच साजेसे विसर्जन केले. मग उंच मुर्त्या आणणारे या मुर्त्यांचे खोल समुद्रात विसर्जन का करत नाहीत? मंडळाकडे तेव्हढे कार्यकर्ते नाहीत, किंवा भांडवल नाही तर ही मंडळे उंच मुर्त्या तरी का आणतात?

अनंत चतुर्दशीला अनेक मंडळे बाप्पाच्या चरणाला पाणी लागले की तेथून पळ काढतात. भरती सरल्यावर या उंच मुर्त्या किनाऱ्यावर उभ्या असलेल्या पाहायला मिळतात. अशा मूर्त्यांना मग क्रेनच्या आधारे खाली पाडून त्यांना भग्न करावे लागते. ज्या गणेशाच्या नावाने १० दिवस उत्सव साजरा केला जातो त्याचा केव्हढा हा अवमान. गणेशोत्सव हा मौजेचा नव्हे तर श्रद्धेचा उत्सव आहे; मात्र हल्ली आपल्या मंडळाची मूर्ती किती उंच आहे हे दाखवण्याची स्पर्धा मंडळांमध्ये रंगताना पाहायला मिळते ज्यामध्ये श्रद्धेला सोयीस्करपणे तिलांजली दिली जाते. उंच गणेशमूर्त्या किनाऱ्यावर सोडून पळ काढणाऱ्या, त्यांचे योग्य पद्धतीने विसर्जन न करणाऱ्या मंडळांवर खरेतर कारवाई करून त्यांना पुढील वर्षी उंच मूर्ती आणण्यास प्रतिबंध घातला पाहिजे.

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.

# पावसाळ्यात डेंग्यूपासून बचावासाठी काय करावं?



पावसाळा सुरू होताच अनेक आजारांना सोबत घेऊन येतो. पावसाळ्यात अनेकांना संसर्गाच्या समस्या होतात. पावसाळ्यात तुमची रोगप्रतीकारकशक्ती वाढवणे गरजेचे असते. पावसाळ्यात डेंग्यूचे डास सर्वाधिक प्रजनन करतात.

अशा परिस्थितीत या ऋतूत डेंग्यू तापाचा धोका खूप वाढतो. जेव्हा डेंग्यूचा डास चावतो तेव्हा तुम्हाला जास्त ताप, डोकेदुखी, डोळे दुखणे आणि अगदी हाड दुखणे यासारख्या समस्या उद्भवतात.

या काळात रोगप्रतिकारक शक्ती देखील खूप कमकुवत होते, ज्यामुळे प्लेटलेट्स वेगाने कमी होऊ लागतात. डेंग्यू हा सामान्य ताप नाही, परंतु यामध्ये शरीर पूर्णपणे तुटू लागते. ज्यामध्ये औषधांसोबतच अन्नाची काळजी घेणे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे.

डेंग्यूपासून बरे होण्यासाठी चांगला आहार घेणे खूप महत्वाचे आहे. जर तुम्ही योग्य आहार घेतला तर शरीरातील कमजोरी दूर होण्यास, प्लेटलेट्स वाढविण्यास, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास तसेच रक्त वाढवण्यास खूप मदत होते. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला किंवा तुमच्या कुटुंबातील कोणाला डेंग्यू झाला असेल तर ही माहिती फक्त तुमच्यासाठी आहे. डेंग्यू झाल्यावर काय खावे आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात?

तज्ञांच्या मते, डेंग्यूच्या ४० ते ५० टक्के आजारांवर घरी उपचार करता येतात. फक्त योग्य आहाराची गरज आहे. डेंग्यूमध्ये द्रवपदार्थांचे सेवन जास्त करावे, कारण या काळात शरीरात पाण्याची कमतरता असते, जी द्रवपदार्थ घेऊन पूर्ण करता येते. तसेच, वेळोवेळी प्लेटलेट्स तपासले पाहिजेत.

जर प्लेटलेट्सची संख्या १५ हजारांपेक्षा कमी असेल तर रुग्णालयात दाखल होण्याची परिस्थिती उद्भवू शकते. डेंग्यू तापात औषधांव्यतिरिक्त द्रव पदार्थांचे जास्तीत जास्त सेवन करावे. यासाठी नारळपाणी सर्वोत्तम आहे. त्यात व्हिटॅमिन सी, बी-कॉम्प्लेक्स जीवनसत्त्वे, अँटीऑक्सिडंट्स आणि अमीनो अ‍ॅसिड आढळतात, जे शरीराला हायड्रेट करण्याचे अनेक फायदे देतात. याशिवाय, तुम्ही गाजराचा रस, पपईचा रस आणि डाळिंबाचा रस घेऊ शकता.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जेव्हा आपल्याला डेंग्यू होतो तेव्हा आपण तेलकट मसालेदार पदार्थ आणि रस्त्यावरील पदार्थ खाणे टाळले पाहिजे. चहा आणि कॉफीपासूनही दूर राहिले पाहिजे. डेंग्यूच्या काळात जास्त गोड पदार्थ खाऊ नका. कारण त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते.

जर तुम्ही मद्यपान आणि धूम्रपान करत असाल तर यापासूनही दूर राहा. डेंग्यू झाल्यास, अन्नासोबतच जीवनशैलीशी संबंधित अनेक गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. हेल्थलाइनच्या मते, डेंग्यू झाल्यास, खूप गर्दीच्या आणि प्रदूषित ठिकाणी जाणे टाळावे. नेहमी पूर्ण बाह्यांचे कपडे आणि मोजे घाला. घराच्या खिडक्या बंद ठेवा. डेंग्यूपासून बचाव करण्यासाठी वरील उपाय करायला हवे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### सोच भाई सोच

खाली हात येणे
खाली हात जाणे
हा नियतीचा प्रण ..

मग दुष्कृत्ये करून
तू कोणासाठी -
जमवतोस धन ? ..

नाती गोती मृगजळ
जसे ज्याचे कर्म
तसे ईश्वर देतो फळ ...

## ॲमेझॉनने देशभरात १५०,००० हून अधिक हंगामी रोजगार संधी निर्माण केल्या

**मुंबई, १० सप्टेंबर :** ॲमेझॉन इंडियाने आज घोषणा केली की, त्यांनी त्यांचे फुलफिलमेंट सेंटर्स (एफसी), सॉर्ट सेंटर्स आणि लास्ट माल डिलिव्हरी स्टेशन्सच्या ऑपरेशन नेटवर्कमध्ये १,५०,००० हून अधिक हंगामी रोजगार संधी निर्माण केल्या आहेत, जेथे ते आगामी सणासुदीच्या काळात लाखो ग्राहकांना सेवा देण्यासाठी सज्ज आहेत. यामध्ये मुंबई, दिल्ली, पुणे, बेंगळुरू, हैदराबाद, लखनौ, कोचीन, कोइम्बतूर, इंदौर, रायपूर, जालंधर, जोधपूर, रांची, अनंतनाग, जळगाव यांसारख्या शहरांसह भारतातील ४०० हून शहरांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार संधींचा समावेश आहे. उल्लेखनीय म्हणजे, ॲमेझॉनने त्यांच्या नेटवर्कमध्ये हजारो महिला सहयोगी, तसेच २००० हून अधिक विकलांग व्यक्तींसाठी रोजगार संधी निर्माण केल्या आहेत. आगामी सणासुदीच्या काळाच्या तयारीसाठी ॲमेझॉन इंडियाने यापैकी बहुतेक नवीन सहयोगींना आधीच सामील केले आहे.

या सणासुदीच्या काळात, आम्ही भारतातील प्रत्येक सेवायोग्य पिन कोडमधील ग्राहकांना जलद आणि विश्वासार्ह डिलिव्हरी प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत. यासाठी, आम्ही ग्राहकांच्या वाढत्या मागण्यांची कार्यक्षमतेने पूर्तता करण्यास मदत करण्यासाठी १.५ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांसह आमचे फुलफिलमेंट आणि लॉजिस्टिक्स नेटवर्क मजबूत केले आहे. यापैकी बरेच कर्मचारी सणासुदीच्या काळानंतर देखील ॲमेझॉनसोबत आपला प्रवास सुरू ठेवतील, जेथे मोठ्या प्रमाणात कर्मचारी वर्षानुवर्षे आमच्यासोबत पुन्हा काम करण्यास परतत आहेत,'' असे ॲमेझॉनचे भारत आणि ऑस्ट्रेलियामधील कार्यसंचालनांचे उपाध्यक्ष अभिनव सिंग म्हणाले. ते पुढे म्हणाले, आमच्या संपूर्ण कार्यसंचालनांमध्ये आम्ही सर्व सहयोगींच्या सुरक्षिततेला आणि स्वास्थ्याला प्राधान्य देतो - मग ते आमच्या इमारतींमध्ये काम करत असोत किंवा ग्राहकांना पॅकेजेस वितरित करत असोत. आम्ही सुरक्षित, समान व सक्षम करणाऱ्या कामकाज वातावरणाला चालना देण्याप्रती कटिबद्ध आहोत, ज्यामध्ये सामाजिक सुरक्षा फायद्यांचा समावेश आहे आणि आमच्या सर्व टीमच्या आर्थिक प्रगतीला पाठिंबा दिला जातो.''

मला या सणासुदीच्या काळासाठी ॲमेझॉनमध्ये सामील होण्याचा आनंद होत आहे. कंपनीने सुरक्षितता उपायांवर लक्ष केंद्रित केले असल्याने मला कार्यसंचालन नेटवर्कमध्ये काम करताना आत्मविश्वास मिळाला आहे. साजरीकरणादरम्यान भारतातील कुटुंबांना आनंद देण्याचे, तसेच आदरणीय कामाच्या स्थळाचा भाग असण्याचे समाधान मिळत आहे,'' असे नुकतेच ॲमेझॉनमध्ये सामील झालेल्या आणि बेंगळुरूमधील ॲमेझॉनच्या एफसीमध्ये काम करत असलेल्या मनिषा सिंग म्हणाल्या.

## अदाणी इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयएसएसओ नॅशनल गेम्स बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

**अहमदाबाद, १० सप्टेंबर :** अदाणी इंटरनॅशनल स्कूल, शांतिग्राम येथे आयएसएसओ नॅशनल गेम्स चेस स्पर्धा २०२५ यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत रणनीती, बुध्दीमत्ता आणि खेळाडूवृत्तीचा उत्सव साजरा करण्यात आला. या स्पर्धेत भारतातील १० हून अधिक राज्यांतील ८० पेक्षा जास्त शाळांचे ३७० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. पालक, प्रशिक्षक आणि समर्थकांसह ६५० हून अधिक लोकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण कॅम्पस उत्साही आणि स्पर्धात्मक वातावरणाने भरून गेला होता.

या स्पर्धेत अंडर ११, अंडर १४, अंडर १७ आणि अंडर १९ असे चार गट ठेवण्यात आले होते, ज्यामुळे प्रत्येक वयोगटातील खेळाडूंना आपली बुद्धिबळातील कौशल्ये दाखवण्याची संधी मिळाली. दोन दिवस चाललेल्या या रोमांचक सामन्यांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी अचूक रणनीती, कौशल्य आणि तणावातही शांत राहून खेळण्याची क्षमता दाखवली. उद्घाटन समारंभाला अदाणी इंटरनॅशनल स्कूलच्या प्रमोटर श्रीमती नम्रता अदाणी उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहन दिले. तसेच तरुण खेळाडूंना श्री. भावेश पटेल (माजी सचिव गुजरात स्टेट चेस असोसिएशन आणि उपाध्यक्ष ऑल इंडिया चेस फेडरेशन) आणि ग्रँडमास्टर अंकित राजपारा यांनीही आपल्या स्पर्धात्मक प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसोबत शेअर करून त्यांना प्रेरणा दिली.

भारतीय बुद्धिबळ सध्या जागतिक स्तरावर नव्या उंचीवर पोहोचत आहे. आर. प्रज्ञानंदा, डी. गुकेश यांसारखे तरुण खेळाडू जगातील सर्वोत्तम खेळाडूंना आव्हान देत आहेत आणि भारताला आघाडीच्या बुद्धिबळ राष्ट्रांमध्ये मजबूत स्थान मिळवून देत आहेत. या यशामागे भारतातील शालेय स्तरावरील समृद्ध स्पर्धात्मक वातावरण आहे. अदाणी इंटरनॅशनल स्कूलसारख्या स्पर्धांमुळे तरुण खेळाडूंना लहान वयातच उच्च दर्जाच्या स्पर्धांचा अनुभव घेण्याची संधी मिळते. अशा व्यासपीठांमुळे देशातील नव्या प्रतिभेला प्रोत्साहन मिळून ती पुढे जागतिक स्तरावरील मोठ्या स्पर्धांपर्यंत पोहोचते. ज्यामुळे पुढील पिढीतील बुद्धिबळ चॅम्पियन्स देशातील शाळा आणि कॅम्पस मधूनच घडतील.

या कार्यक्रमाने अदाणी इंटरनॅशनल स्कूलच्या सर्वांगीण शिक्षणाच्या बांधिलकीची पुन्हा एकदा जाणीव करून दिली. येथे क्रीडा कौशल्याबरोबरच बौद्धिक विकासालाही तितकेच महत्त्व दिले जाते. शाळेतील समृद्ध क्रीडा संस्कृती, विशेष क्लब्स, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि नियमित स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता, चिकाटी, मेहनत आणि नैतिक मूल्ये विकसित होत आहेत.

समारोप समारंभात चारही गटांमध्ये विजेत्यांना पदके प्रदान करण्यात आली. यावेळी ओव्हरऑल चॅम्पियन आणि रनर-अप शाळांची घोषणा हा मुख्य आकर्षणाचा क्षण ठरला.

मुंबईतील छत्रभुज नरसी स्कूलला ओव्हरऑल चॅम्पियनचा मान मिळाला, तर हैदराबादमधील इंडस इंटरनॅशनल स्कूल रनर-अप ठरले. या दोन्ही शाळांनी सातत्य, एकाग्रता आणि उत्तम खेळाडूवृत्तीचे दर्शन घडवले.

## जीपिकॉन २०२५ मध्ये ५०० हून अधिक डॉक्टरांनी एकत्र येऊन, जनरल मेडिसिन आणि गॅस्ट्रोएन्टेरॉलॉजीतील नवीन प्रगतीवर चर्चा केली



**गोंदिया, १० सप्टेंबर :** गॅस्ट्रोएन्टेरॉलॉजी आणि मेडिसिन क्षेत्रातील नवीन प्रगती आणि ताजी माहिती जाणून घेण्यासाठी २३ ऑगस्ट २०२५ रोजी नागपूरच्या जामठा येथील व्हीसीए क्लबमध्ये जनरल प्रॅक्टिशनर्स कॉन्फरन्स जीपिकॉन २०२५ यशस्वीरित्या पार पडली.

या परिषदेचा उद्देश जनरल मेडिसिन आणि गॅस्ट्रोएन्टेरॉलॉजी क्षेत्रातील ताज्या प्रगतीबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. अशा प्रकारच्या परिषदांमुळे फॅमिली फिजिशियनना आपले ज्ञान अद्ययावत करण्यास आणि त्यांच्या दैनंदिन वैद्यकीय सेवेत अधिक सुधारणा करण्यास मदत होते. यंदा या कार्यक्रमाला ५०० हून अधिक डॉक्टर आणि फॅमिली फिजिशियननी उत्साहाने सहभाग नोंदवला.

या प्रसंगी बोलताना मिडास हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. श्रीकांत मुकेवार म्हणाले, जीपिकॉन २०२५ हे केवळ वैद्यकीय ज्ञान वाटण्यासाठीचे व्यासपीठ नसून तज्ज्ञ डॉक्टर आणि फॅमिली फिजिशियन यांच्यातील एक दुवा आहे. ज्यामुळे आरोग्यसेवेतील नवनवीन प्रगती थेट तळागाळातील रुग्णांपर्यंत पोहोचू शकते.

डॉ. सौरभ मुकेवार, संचालक, मिडास हॉस्पिटल, वर्धा रोड, नागपूर यांनी सांगितले, सतत शिकत राहणे हे उत्तम आरोग्यसेवेचे गमक आहे. या परिषदेच्या माध्यमातून आम्ही डॉक्टरांना मेडिसिन आणि गॅस्ट्रोएन्टेरॉलॉजीतील ताज्या माहितीने सक्षम करण्याचा प्रयत्न करत आहोत.

प्रमुख पाहुणे श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभिमान व्यक्त करताना सांगितले नागपूरमध्ये मिडास हॉस्पिटलसारखी अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध असणे ही अभिमानाची गोष्ट आहे. मिडास हॉस्पिटलने आंतरराष्ट्रीय दर्जाचे उपचार नागपूरमध्ये उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट ध्येय ठेवले आहे. या परिषदेचा उद्देश म्हणजे आरोग्यसेवेत नवीन तंत्रज्ञान वापरण्यास प्रोत्साहन देणे आणि रुग्णांना उत्तम सेवा व उपचार देण्यासाठी जागरूकता निर्माण करणे.

## माउंटन ड्यू ची नवीन ४०० मिली पेट पॅक २० रूपयांत



**मुंबई, १० सप्टेंबर :** पेप्सिको इंडियाचा धाडसी आणि निर्भय पेय ब्रँड माउंटन ड्यूएँ ने फक्त २० रूपयांत आपला नवीन ४०० मिली पेट पॅक आणण्याची घोषणा केली आहे. या अविस्मरणीय अनावरणासह माउंटन ड्यूएँ ने डर के आगे जीत है या आपल्या प्रतिष्ठित तत्वज्ञानाशी प्रामाणिक राहून अधिक मूल्य आणि सुलभता प्रदान करण्यासाठी किमतीचे मूल्य वाढवले आहे. ब्रँडच्या चाहत्यांना प्रत्येक सिपमध्ये धैर्य आणि रोमांच स्वीकारण्यास प्रेरित केले जात आहे.

या उत्पादनाच्या निमित्ताने माउंटन ड्यूएने प्रसिद्ध चित्रपट निर्माते अली अब्बास जफर दिग्दर्शित सेलिब्रिटी ब्रँड ॲम्बेसेडर हृतिक रोशनसह एक जबरदस्त टीव्ही जाहिरात मोहीम आणली आहे. या सळसळत्या जाहिरातीत हृतिक एक रोमांचक साहस करताना दिसतो. तो एका भीतीदायक नैसर्गिक आपत्तीचा सामना करतो. सस्पेन्स निर्माण करतानाच तो भीतीचा सामना करतो आणि पुढे जातो - पुन्हा एकदा डर के आगे जीत है हे सिद्ध करतो. ही जाहिरात हृतिकच्या निर्भय व्यक्तिरेखेवर, माउंटन ड्यू च्या धैर्य आणि विजयाचे तत्वज्ञानावर आणि ब्रँडच्या धाडसी नवीन २० रूपयांत ४०० मिलीच्या ऑफरवर प्रकाश टाकते.

या मोहिमेबद्दल बोलताना हृतिक रोशन म्हणाले की भीती ही अशी गोष्ट आहे जी आपण सर्वजण अनुभवतो. परंतु आपले धैर्य आपली ताकद ठरते. नवीन माउंटन ड्यू जाहिरात धैर्य स्वीकारण्याची आणि विश्वासाची झेप घेण्याची शक्ती पुन्हा स्पष्ट करते. मला अशा ब्रँडशी जोडले जाण्याचा अभिमान आहे जो 'डर के आगे जीत है' या तत्वज्ञानाने लाखो लोकांना प्रेरणा देतो. आता, नवीन २० रूपयांत ४०० मिली पॅकसह माउंटन ड्यू हा अनुभव आणखी सुलभ बनवतो.

या नवीन उत्पादनाबाबत बोलताना पेप्सिको इंडियाच्या माउंटन ड्यू श्रेणी प्रमुख आकांक्षा दलाल म्हणाल्या, माउंटन ड्यूबाबत आमचे तत्वज्ञान नेहमीच लोकांना आव्हानांचा सामना करण्यासाठी प्रेरित करण्याचे. आमच्या २० रूपयांत ४०० मिलीच्या पेट पॅकचे अनावरण आमच्या धाडसी ओळखीशी खरे राहून ड्यू अनुभव अधिक सुलभ बनवण्याच्या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल आहे. ग्राहकांकडून आलेल्या माहितीवर आधारित राहून हा नवीन उपक्रम तडजोड न करता जास्त मूल्य देतो आणि हृतिक रोशनसोबतची आमची नवीन जाहिरात माउंटन ड्यूची व्याख्या करणाऱ्या धैर्य आणि विजयाचे सार उत्तम प्रकारे टिपते.

## सिद्धांत चतुर्वेदी आणि मॅक्स फॅशनचे दमदार पदार्पण



**मुंबई, १० सप्टेंबर :** मॅक्स फॅशन या भारतातील एका आघाडीच्या मल्टिनॅशनल फॅशन ब्रँडने एक ऐतिहासिक पाऊल टाकत त्यांचा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून पहिल्यांदाच पुरुषाची निवड करत अभिनेता आणि सांस्कृतिक ट्रेंडसेटर सिद्धांत चतुर्वेदी यांच्या नावाची घोषणा केली आहे. अभिनेते आणि सांस्कृतिक ट्रेंडसेटर सिद्धांत चतुर्वेदी या नव्या हाऊ न्यू इज युवर न्यू? या मोहिमेचे नेतृत्व करणार आहेत. सहजसुंदर स्टाइल आणि नव्या पिढीशी जोडले जाण्याची क्षमता या वैशिष्ट्यांसासेबतच वैयक्तिक स्टाइल आणि सांस्कृतिक संदर्भांना महत्त्व देण्यातील त्यांची समतोल वृत्ती यामुळे मॅक्सची ओळख असलेल्या उत्साह आणि स्टाईलला सिद्धांत अगदी साजेसे आहेत.

हे सहकार्य निव्वळ एखाद्या सीझनच्या कॅंपेनपुरते मर्यादित नाही. यातून एक उद्दिष्ट अधोरेखित होते. ट्रेंड्स ज्या वेगाने बदलतात, वैयक्तिक स्टाईलध्ये ज्या वेगाने बदल होतात ती गती कायम राखत दर आठवड्याला नव्या स्टाईल्स सादर करून मॅक्स लाखो लोकांपर्यंत फॅशनची प्रेरणा सातत्याने पोहोचवत आहे.

सिद्धांत सर्वसामान्य लोकांमध्ये प्रसिद्ध आहेत आणि जेन झीसोबत त्यांचे घट्ट नाते आहे. पण त्याचसोबत ते संगीत, चळवळ आणि स्टाईल या साऱ्याचा मेळ साधत जगणाऱ्या तरुण भारतीयांना जवळचे वाटतात. कल्की कोचलीन, अलाया एफ आणि आता सिद्धांत चतुर्वेदी यांच्यासोबत या ब्रँडने एक असं त्रिकुट तयार केलंय जे आधुनिक भारतातील सखोल व्यक्तिमत्त्व जपणाऱ्या, स्क्रोलिंग करणाऱ्या पिढीशी संवाद साधेल. कल्की यांच्यामुळे एका सखोल आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची छाप पडते. तर, अलाया यांच्यामुळे जेन झीची निडर वृत्ती दिसून येते. आता सिद्धांत यांच्यामुळे या समीकरणाला एक नवी आणि तारुण्याने सळसळणारी बाजू मिळणार आहे. कॉफी ते रेड कार्पेट, पारंपरिक ते नवे ट्रेंड या साऱ्याला सारख्याच आत्मविश्वासाने सामोरे जाणाऱ्या नव्या पिढीचे प्रतिबिंब या तिघांच्या रुपाने पहायला मिळते.

सिद्धांतसोबतची आमची भागीदारी फार नैसर्गिक आणि सहज आहे, असे मॅक्स फॅशनचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुमीत चंदना म्हणाले. आत्मविश्वास असलेल्या, सर्जनशील आणि भविष्याकडे कूच करणाऱ्या भारताचे ते प्रतिनिधी आहेत. हीच वैशिष्ट्ये आमच्या ग्राहकांमध्येही आहेत. हाऊ न्यू इज युवर न्यू? च्या माध्यमातून दर आठवड्याला नवी स्टाईल सादर करत आम्ही आमच्या ग्राहकांना त्यांना हवा असा लुक मिळवण्याचे स्वातंत्र्य देत आहोत. मॅक्सने एका कालातीत आणि मूळ सत्याला समोर आणले आहे- सर्वात दमदार कथांमध्ये व्यक्तिमत्त्व हुकूम देऊन मांडली जात नाहीत, उत्क्रांत होत असलेल्या परिस्थितीचे प्रतिबिंब म्हणून ती समोर येतात.

## ग्रो म्युच्युअल फंड्सतर्फे मल्टी असेट अलोकेशन फंड

**अकोला, १० सप्टेंबर :** ग्रो म्युच्युअल फंडाने ग्रो मल्टी असेट अलोकेशन लाँच केल्याची घोषणा केली आहे. ही ओपन एंडेड योजना इक्विटी, डेट, गोल्ड व सिल्व्हरमध्ये गुंतवणूक करते. न्यू फंड ऑफर (एनएफओ) १० सप्टेंबर २०२५ पासून खुली होणार आहे. ही योजना गुंतवणूकदारांना विविधपूर्ण अलोकेशन फ्रेमवर्क देते, ज्यात वेगवेगळ्या असेट क्लासचा मेळ घालण्यात आला आहे. यामुळे पोर्टफोलिओची अस्थिरता कमी होते आणि बाजारपेठेतील वातावरणाशी सुसंगत गुंतवणूक होते.

मल्टी असेट्समधील गुंतवणूक वेगवेगळे असेट क्लास वेगवेगळ्या परिस्थितीत कशाप्रकारे कामगिरी करतात यावर अवलंबून असते. इक्विटीजना आर्थिक विकासाचे टप्पे आणि कॉर्पोरेट मिळकतीच्या विस्तारातून लाभ होतो. डेट आउटकमवर व्याजदराचे ट्रेंड्स आणि महागाई चक्राचा परिणाम होतो. सोने आणि चांदी प्रामुख्याने अस्थिरता, जागतिक जोखमीच्या घटना आणि चलनी अस्थिरतेला प्रतिसाद देतात. चालना देणारे असे सर्व घटक परस्परांशी फारसे सुसंगत नसल्यामुळे कोणताच एक असेट क्लास जास्त काळासाठी आघाडीवर राहात नाही.

डेटा असे दर्शवतो, की आघाडीचे स्थान बदलत राहाते काही वर्षांत इक्विटी सर्वात चांगली कामगिरी करतील, काही वेळेस डेट आणि कमॉडिटीजची कामगिरी चांगली होईल. या सर्व असेट्सचा मेळ घालणाऱ्या पोर्टफोलिओने बाजारपेठेतील सर्व टप्प्यांसाठी सज्ज राहाणं आवश्यक आहे.

स्रोत: एनएसई, एमएफआय, ब्लूमबर्ग, १५ जुलै २०२५. यापूर्वी नोंदवण्यात आलेली कामगिरी भविष्यात टिकून राहील असे नाही आणि भविष्यातील परताव्याची खात्री देऊ शकत नाही. वर नमूद कर्यात आलेली कामगिरी कोणत्याही म्युच्युअल फंडाच्या स्वतंत्र योजनेची कामगिरी सूचित करत नाही. गुंतवणूक करण्यापूर्वी तुमच्या आर्थिक सल्लागाराचा सल्ला घ्यावा.

डेटा असे सुचवतो, की मल्टी असेट* पोर्टफोलिओजनी ऐतिहासिकदृष्ट्या व्यापक इक्विटी बाजारांना कमी अस्थिरतेसह तुलनात्मक परतावा दिला आहे.

फंडाद्वारे मॅक्रोइकॉनॉमिक ट्रेंड्स आणि गुंतवणूकदारांच्या भावना असे दोन्ही घटक लक्षात घेऊन असेट अलोकेशन फ्रेमचा वापर केला जातो. वातावरणानुसार ते विकासाकडे (उदा. ओव्हरवेट इक्विटी) झुकते किंवा जास्त सावध होते किंवा डेट अथवा सोन्याकडे जास्त एक्सपोजर देत बचावात्मक स्थान घेते.

या योजनेमध्ये एकूण इक्विटी एक्सपोजर ६५ टक्क्यांपेक्षा जास्त कायम राखले जाते व पर्यायाने इक्विटी टॅक्सेशनसाठी पात्र ठरते तसेच डेट, गोल्ड, सिल्व्हर अशा इतर असेट क्लासेससाठी वाटप केले जाते.

## कलर्सवरील बिंदी मालिका हे दाखवते की, शिक्षणामुळे कसे सगळे काही बदलते! : सांची भोईर



**मुंबई, १० सप्टेंबर :** इंद्रायणीच्या रूपात मराठी घराघरांत पोहोचलेली आणि लाडकी ठरलेली बाल कलाकार सांची भोईर आता कलर्सवरील बिंदी या मालिकेतून हिंदी टेलिव्हिजनवर पदार्पण करत आहे. आपल्या कारकिर्दीच्या अगदी प्रारंभीच या जबरदस्त अभिनेत्रीने जटिल व्यक्तिरेखा कौशल्याने साकार करून आपले कसब दाखवले आहे. आणि आता, बिंदी या माय-लेकीच्या हृदयस्पर्शी नात्याचे चित्रण करणाऱ्या मालिकेत ती मुख्य भूमिका करत आहे. तुरुंगातील आपल्या आईसाठी लढा देणाऱ्या एका लहान मुलीची ही कहाणी आहे. बघा एका मुलीची लढाऊ वृत्ती आणि आपल्या आईचे प्रेम बिंदी मालिकेत: सुरू होत आहे १७ सप्टेंबरपासून दररोज रात्री ८.३० वाजता फक्त कलर्स वाहिनीवर तुरुंगाच्या भिंतींमध्ये जन्म आणि संगोपन झालेल्या बिंदीचे विश्व काजलभोवती एकवटले आहे. काजलच्या प्रेमामुळे तिचे तुरुंगातील वास्तव्य देखील सुखद झाले आहे. मनाच्या काळोखात प्रकाश किरण जपणारी बिंदी एक चुणचुणीत, कनवाळू स्वभावाची पोर आहे. तिची स्वप्नं खूप साधी आहेत: एक सामान्य कुटुंब, आपल्या आईचा सहवास, आणि स्वातंत्र्य आणि शिकण्याची संधी. पण जेव्हा एक दिवस अचानक कायदा तिला तुरुंगाच्या बाहेर ढकलतो, तेव्हा तिचा आनंद हिरावतो. तुरुंगाच्या बाहेर ती मथुरेत आपला मामा सौरव याच्या देखभालीत राहते. तुरुंगापेक्षाही खराब असलेल्या या जगात बिंदी सैरभैर होते. जीवनात प्रतिकूल असलेल्या गोष्टी सुधारण्याचा निर्धार करून ती शिक्षणाचा ध्यास घेते आणि आपल्या आईला तुरुंगातून सोडवण्यासाठी कायदा शिकण्याचे ठरवते, पण अनेक दुष्ट लोक तिच्या वाईटावर टपलेले आहेत.

हिंदी टेलिव्हिजनवर पदार्पण करण्याबाबत सांची म्हणते, बिंदी या मालिकेबद्दल मी खूप उत्सुक आहे, कारण हिंदी मालिका बघणाऱ्या प्रेक्षकांना मला माझी प्रतिभा दाखवायची आहे. पण त्याचवेळी मी जरा भांबावलेही आहे, कारण मुख्य भूमिका साकारणे ही मोठी जबाबदारी आहे आणि एक अभिनेत्री म्हणून दररोज मी काही ना काही नवीन शिकत आहे. ही भूमिका करत असताना मला सतत स्वतःला हे स्मरण द्यावे लागते की, बाहेर खेळायला जाणे, शाळेत जाणे किंवा मित्र-मैत्रिणींसोबत खेळणे या गोष्टी आपल्याला कितीही सामान्य वाटत असल्या, तरी बिंदीला त्या कधीच मिळालेल्या नाहीत. तिच्या आईशी तिचे जे नाते आहे, ते मला फार आवडले कारण माझ्यासाठी माझी आई ही माझी सगळ्यात चांगली मैत्रीण आणि माझा आधार आहे. बिंदी मालिका हे दाखवून देते की, शिक्षणामुळे कसे सगळे बदलू शकते. मला आशा आहे की, लोक जेव्हा बिंदी बघतील, तेव्हा त्यांना तिची हिंमत दिसेल आणि त्यांनाही हे पटेल की, पुस्तके आणि ज्ञान आपली स्वप्ने खरी करू शकतात.


## आज का अंदाज

गुरूवार ११ सप्टेंबर २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ६७१ | ३३६ | ११४ | २८९ | ३५५ | २४८ | ७९९ | २२४ |
| ४९१ | ४४७ | २७७ | ३७९ | ६७० | ३५६ | १२२ | ३५० |
| १२१ | ५०० | ३३० | ४७८ | ४९० | ७७० | ३५७ | ४५९ |
| २० | ५० | ४३ | ९३ | ३२ | ४० | ५१ | ८१ |
| २४ | ५४ | ६१ | ९१ | ३० | ४२ | ५७ | ८७ |
| २८ | ५८ | ६७ | ९७ | ३६ | ४६ | ५९ | ८९ |

**११ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४६ | ७६ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ |
| ०८ | १८ | ४३ | ७३ |
| १९० | ३३५ | १६७ | १३३ |
| २९९ | ५७९ | ३५६ | ३६८ |
| ३८९ | २९० | ४०० | ५५७ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ८ ९ ७ ६

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून नवरात्री ऑफरची घोषणा



**मुंबई, १० सप्टेंबर :** सणासुदीच्या काळामध्ये अधिक उत्साहाची भर करत टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने ग्राहकांसाठी दुप्पट फायद्याची घोषणा केली. कार व एसयूव्हींवर नुकतेच जाहीर करण्यात आलेल्या जीएसटी दरामधील कपातीचे संपूर्ण फायदे दिल्यानंतर टीकेएम प्रश्चिम प्रांतामधील ग्राहकांसाठी विशेष मोहिम 'बाय नाऊ अँड पे इन २०२६'सह नवरात्रीच्या आनंदामध्ये अधिक उत्साहाची भर करत आहे. जीएसटी दर कपात आणि टोयोटाची फेस्टिव्ह ऑफर असे दुहेरी फायदे या काळाला ग्राहकांना त्यांची आवडती टोयोटा वेईकल खरेदी करण्यासाठी परिपूर्ण करतात, जसे अर्बन क्रूझर हायरायडर, टोयोटा ग्लान्झा किंवा टोयोटा टायसर.

जीएसटी दर कपात २२ सप्टेंबर २०२५ पासून लागू होणार असताना 'बाय नाऊ अँड पे इन २०२६' ऑफर ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत वैध आहे, जी फक्त पश्चिम भारतातील (महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश व गोवा) अधिकृत टोयोटा डिलरशिप्समध्ये उपलब्ध आहे.

ऑफरची वैशिष्ट्ये व फायदे (जवळपास १,००,००० रूपयांपर्यंत):

३-महिने ईएमआय हॉलिडे - पहिल्या तीन महिन्यांसाठी प्रति महिना फक्त रूपये भरा: नियमित ईएमआय जानेवारी २०२६ पासून सुरू होतील.

५ कॉम्प्लीमेण्टरी सर्विस सेशन्स - परिपूर्ण समाधानाची खात्री देतात.

५-वर्ष एक्स्टेण्डेड वॉरंटी - टोयोटाच्या टिकाऊपणा व विश्वसनीयतेप्रती कटिबद्धतेला अधिक दृढ करते.

कॉर्पोरेट अँड एक्स्चेंज बोनस - कॉर्पोरेट ग्राहकांसाठी आणि एक्स्चेंजचा अवलंब करणाऱ्या ग्राहकांसाठी अतिरिक्त बचत.

संरक्षण कर्मचाऱ्यांसाठी विशेष फायदे - विशेष विशेषाधिकारासह देशाच्या संरक्षकांचा सन्मान.

## राशीभविष्य

**मेष :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातम्यांनी होईल. नोकरीत वरिष्ठ अधिकाजयांच्या जवळीकतेचा फायदा मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस असेल. महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.

**वृषभ :** जंगम आणि स्थावर मालमत्ता वादाचे कारण बनू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या नशिबाचा तारा चमकेल. जुन्या प्रकरणात निर्णय तुमच्या बाजूने येण्याचे संकेत आहेत. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मिथुन :** आर्थिक बाबींचा आढावा घेतल्यानंतर धोरणात्मक निर्णय घ्या. तुमच्या बचतीचा योग्य वापर करा. कामानिमित्त परदेशात जाण्याचा योग येईल. पहिल्यांदाच विमान प्रवास करण्याचीही संधी मिळेल.

**कर्क :** आज कौटुंबिक जबाबदाजयांचा भार वाढू शकतो. नातेवाईकांशी समन्वय ठेवा. लग्न वगैरे होण्याची शक्यता आहे. तुमच्या काहीही बोलण्यापूर्वी विचार करा. काम पूर्ण होईपर्यंत त्यावर चर्चा करू नका.

**सिंह :** आज सुरू असलेल्या कामात प्रगती होण्याची शक्यता आहे. समाजात तुम्हाला आदर मिळेल. व्यवसायात नवीन करार फायदेशीर ठरेल. विरोधकाच्या कारवायांवर विशेष लक्ष द्या.

**कन्या :** चांगले वर्तन ठेवा. कौटुंबिक समस्या सोडवण्यावर लक्ष केंद्रित करा. तुमचा संयम ढळू देऊ नका. जमीन, इमारत, वाहन विक्रीसाठी हा काळ सामान्यत: चांगला असेल.

**तुळ :** आज तुम्हाला तुमच्या मागील प्रयत्नांचे फळ मिळेल. स्वत:वर विश्वास ठेवा. कामाच्या ठिकाणी नियोजनबद्ध पद्धतीने काम करणे शुभ राहील. स्पर्धेचा निकाल अनुकूल राहील.

**वृश्चिक :** आज तुम्हाला व्यवसायात काही अडथळे येऊ शकतात. कोणत्याही महत्त्वाच्या कामाची जबाबदारी दुसजया कोणावरही देऊ नका. ते काम स्वत: करा. राजकारणात पाठिंबा मिळेल.


**धनु :** नोकरीत कनिष्ठ आणि वरिष्ठ अधिकाजयांशी समन्वय राखण्याचा प्रयत्न करा. कामाच्या ठिकाणी व्यस्त असताना वादविवाद टाळा. व्यवसायात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागेल.

**मकर :** आज तुम्हाला व्यवसायात तुमच्या जोडीदाराचा पाठिंबा आणि साथ मिळेल. रोजीरोटीच्या क्षेत्रात काम करणाजया लोकांना नोकरीत त्यांच्या सहकाजयांशी अधिक समन्वय निर्माण करावा लागेल.

**कुंभ :** विश्वासघातापासून सावध रहा. कामाच्या ठिकाणी सुरू असलेले अडथळे कमी होतील. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. लांबच्या प्रवासाला जाण्याची शक्यता आहे.

**मीन :** व्यवसाय क्षेत्रात काम करणाजया लोकांना व्यवसायात नफा मिळण्याचे संकेत मिळतील. तुमच्या नोकरीत वरिष्ठ अधिकाजयांशी जवळीक असल्याने तुम्हाला फायदा होईल.

## शब्दकोडे क्रमांक २२१४



**आडवे शब्द :-**
१) आदर्श दांपत्य
७) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१०) खिडकी
११) बोकड एडका
१२) नमस्काराचा एक प्रकार
१३) रेशीमाचे जाडसर कापड
१५) हिंमत, धैर्य
१७) वेळ
१८) चिंतन
२०) पिता, निर्माता
२१) यज्ञ
२२) लोणी
२५) च्या बरोबर
२६) छिद्र, दोष, न्यून
२७) परमेश्वर
२९) नंतर
३१) काळी मैना
३४) आवाज
३६) शिक्षक
३७) पत्र
३९) दात
४०) संस्थेचे धोरण ठरविणारा व चालविणारा
४१) जतन, काळजी
४२) सोन्याचा पर्वत
४४) प्रतिष्ठा, अब्रू
४६) बशीचा जोडीदार
४७) विविध
४८) बाई
५०) हात
५१) टणक
५४) नारायणराव पेशव्यांचे अखेरचे उद्गार
५७) श्वसनेंद्रिय
५८) माल साठविण्याची जागा
५९) प्रहर
६१) पृष्ठभागावरील छोटा तुकडा
६३) चेतक घोड्याचा मालक असलेला राजा ** *** सिंग
६५) नाचणी धान्याचे एक नाव
६६) संन्यासाचे निवासस्थान
६७) कट्टर, मताशी ठाम असलेला
६८) कमळ
७०) उपासना, प्रार्थना, पूजा
७१) अभिप्राय, हेतू, अर्थ
७३) वांती
७५) राजा
७६) समशेर
७७) अंग राखणे, चोळणे

**उभे शब्द :-**
१) कपाळ
२) सुंदर, शहाणा
३) पोपट
४) पुरून ठेवले द्रव्य
५) चालविणारा
६) पादत्राण
७) पळून जाणे
८) ** दाम दंड भेद
९) नेत्र
१२) सारखा
१४) सखी, मैत्रीण
१६) मध
१७) ठाणवई
१८) ** माऊ-मांजर
१९) मान खाली घालणे विनम्र होणे
२०) गरळ, विष
२३) छाती
२४) सरसकट
२५) संपूर्ण
२८) बाण
३०) मगज
३२) नमस्कार
३३) ढग
३५) पाहिला ऋतू
३६) धनी
३८) घोडे बांधण्याची जागा
३९) रचना करणारा
४२) लाकडाचा वा दगडाचा पातळ तुकडा
४३) अक्षरापुढची उभी रेघ
४४) आत्म्याचा दुसऱ्या शरीरात प्रवेश
४५) अनुमती
४६) वैताग, बडबड
४८) चौक
४९) पुष्पगुच्छ
५०) केस
५२) हरभरा(हिं)
५३) त्वेष, आवेश
५५) माया, प्रेम
५६) बातमी
६०) वंदनाचा एक शब्द
६२) सिंह
६३) पोपट
६४) वाचेच्या चार अवस्थेतील पहिली, श्रेष्ठ भक्ती
६५) समुद्रातील तांबड्या रंगाचा मासा
६७) तंबू, नाटक यामधील कापडी भिंत
६९) आयुष्य, पाणी
७०) करवत
७१) अजगर
७२) मृत्युराजा
७४) व्यापारी फायदा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | व | को | ट | ना | श | य | ण | ■ | पा | र | ■ | प | ट | ल |
| ग | र | ■ | प | र | ■ | म | ■ | का | ल | ह | र | ण | ■ | हा |
| द | व | णा | ■ | द | ख | ल | पा | त्र | ■ | स्व | ■ | जी | व | न |
| ना | र | ■ | आ | ■ | र्ष | ■ | व | ज | न | ■ | मा | ■ | र | ■ |
| श | ■ | आ | रा | स | ■ | मा | सा | ■ | क | मा | ल | कि | मा | न |
| य | था | स | म | य | ■ | प | ळ | प | ळ | ■ | व | ■ | ई | र |
| ण | ■ | मं | ■ | सु | म | न | ■ | चा | त | श | णी | ■ | ■ | डी |
| ■ | क | त | ■ | मा | न | ■ | अं | त | ■ | जी | ■ | क | म | चा |
| सा | न | ■ | क | र | ■ | म | ■ | ■ | सा | व | धा | न | ■ | धो |
| मा | ■ | क | ड | ■ | को | ला | ह | ल | ■ | लो | ■ | क | पा | ट |
| न | व | रा | बा | य | को | ■ | त्या | ■ | क | ष | रा | ■ | ■ | पे |
| सु | ■ | म | ■ | म | ■ | धा | र | त | ■ | न | ज | र | दे | णे |
| मा | हु | त | ■ | स | पा | ट | ■ | ल | क्ष | ■ | स | ■ | वा | ■ |
| न | ■ | ■ | म | द | न | ■ | क | वा | य | त | ■ | घा | ल | क |
| ■ | मा | न | ध | न | ■ | वा | प | र | ■ | म | ह | श | य | |

# जनसुरक्षा विधेयकावर महाविकास आघाडी आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी,
चंद्रपूर, दि. १० :

राज्य शासनाने प्रस्तावित केलेले महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ हे अत्यंत अन्यायकारक, लोकशाही विरोधी व मूलभूत नागरिक स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे. या विधेयकाच्या अंमलबजावणीमुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वैयक्तिक गोपनीयता आणि संविधानाने हमी दिलेली नागरी हक्के गंभीरपणे बाधित होण्याची भीती आहे. हे विधेयक लोकशाही मूल्यांना धरून नाही. त्यामुळे जनतेच्या भावना व लोकशाही मूल्यांचा विचार करता महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ तत्काळ रद्द करण्यात यावे या मागणीला घेऊन संविधान चौक राजुरा येथील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, कम्युनिस्ट पक्ष तथा महाविकास आघाडीच्या वतीने निषेध तथा धरणे आंदोलन करण्यात आले.




यावेळी जनसमुदायाला संबोधित करताना उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, या विधेयकाच्या अंमलबजावणीनंतर नागरी हक्क धोक्यात येणार आहेत. विशेषतः चंद्रपूर-गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल, मागास व संवेदनशील जिल्ह्यांमध्ये पोलीस नियंत्रणाच्या नावाखाली सामान्य नागरिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व विरोधी मतधारक यांना अन्यायकारक कारवायांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे हा कायदा राबविण्याऐवजी तातडीने रद्द करण्यात यावा अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाषभाऊ धोटे, राजुरा विधानसभा काँग्रेसचे समन्वयक माजी नगराध्यक्ष अरुणभाऊ धोटे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रंजन लांडे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख बबन उरकुडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष आशिफ सय्यद, माजी नगराध्यक्ष स्वामी येरोलवार, सभापती विकास देवाळकर, ॲड. अरूण धोटे, माजी उपनगराध्यक्ष सुनील देशपांडे, सेवादल अध्यक्ष दिनकर कर्णेवार, नर्सिंग मादर, माजी नगरसेवक प्रभाकर येरणे, हरजित सिंग संधु, गजानन भटारकर, विलास तुमाने, रवि त्रिशूलवार, नंदकिशोर वाढई, ॲड. रामभाऊ देवईकर, शंकर गोनेलवार, जंगू एडमे, बापू धोटे, कोमल फुसाटे, संतोष गटलेवार, अब्दुल जमीर, संतोष इंदूरवार, एजाज अहमद, इरशाद शेख, रामेश्वर ढवस, ॲड. चंद्रशेखर चांदेकर, पंढरी चन्ने, रामनंदेश्वर गिरडकर, अजय बतकमवार, प्रणय लांडे, रमेश झाडे, धनराज चिंचोलकर, सुरज माथनकर, उमेश गोरे, अनंता एकडे, राजु पिंपळशेंडे, राजकूमार पाटील, संदीप नन्नवरे, श्याम गरडे, मतीन कुरेशी, अशोक राव, निरंजन मंडल, अनंता ताजने, रविंद्र आत्राम, कुणाल मोकळे, दिपक मडावी, साहील शेख, आकाश मावलीकर, मधुकर झाडे, मिथलेश रामटेके, सय्यद साबिर, संघपाल देठे, रोशन लांडे, आशाताई उरकुडे, नंदाताई मुसने, दिपाताई करमनकर, कविता उपरे, पुणम गिरसावळे, इंदूबाई निकोडे, सुशिला संदुरकर यासह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, कम्युनिस्ट पक्ष तथा महाविकास आघाडी च्या सर्व घटक पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवरात्रोत्सवात माँ भद्रकाली मातेची अखंड ज्योत येणार

■ महासागर प्रतिनिधी
दिग्रस, दि. १० : यंदाच्या नवरात्रोत्सवात आई जगदंबेच्या ५१ जागृत शक्तिपीठांपैकी एक हरियाणा राज्यातील कुरुक्षेत्र येथील माँ भद्रकाली मातेची अखंड ज्योत प्रज्वलित करून ती दिग्रस नगरीत आणण्याचा निर्धार येथील श्री आदी शक्ती नवयुवक संघटनेचे अभय इंगळे यांनी केला. येथील श्री आदी शक्ती नवयुवक संघटनेचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष या २५ व्या ज्योत यात्रेचा शुभारंभ शनिवार दि. १३ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता होणार आहे. गणेशोत्सवानंतर दिग्रसकरांना दुर्गोत्सवाचे वेध लागतात. नेत्रदीपक सजावट, जल्लोष, उत्साह व भक्तांचे कडकडीत उपवासाने नवरात्रोत्सवाला आगळे वेगळे महत्व प्राप्त होते. यात आणखी भर म्हणजे आई जगदंबेच्या शक्तीपीठावरून अखंड ज्योत प्रज्वलित करून आणण्याचा संकल्प होय. विशाल हिंदु जनजागरण करण्याच्या उद्देशाने गेल्या २४ वर्षांपूर्वी सन २००१ ला येथील जागृत श्री महंकाली मातेच्या मंदिरात अभय इंगळे, संतोष कलोसे व शेखर गवळे यांच्या पुढाकारात श्री आदि शक्ती नवयुवक संघटनेची स्थापना झाली. तब्बल ४० युवकांनी आई जगदंबेच्या ५१ शक्तीपीठावरून अखंड ज्योत प्रज्वलित करून ती ज्योत सायकल चालवित आणण्याचा संकल्प यावेळी केला होता. गेल्या २४ वर्षात या तरुणांनी आई जगदंबेच्या विविध शक्तीपीठावरून ज्योत प्रज्वलित करून काही वर्षे सायकल चालवित दिग्रसला आणून त्यांचा संकल्प त्यांनी पुर्ण केला. देशातील आई जगदंबेच्या विविध ५१ शक्तीपीठाद्वारे अखंड प्रज्वलित ज्योतीच्या माध्यमातून जगदंबेचा साक्षात्कार होतानाचा



## जगदंबेच्या ज्योत यात्रेचा शनिवारी शुभारंभ

भाविकांचा आजवरचा अनुभव आहे. अशा पवित्र ठिकाणांवरुन ज्योत प्रज्वलित करून ती जगदंबेच्या घटस्थापनेच्या दिवशी दिग्रस नगरीत आणण्यात येते. त्या ज्योतीची विधिपूर्वक स्थापना करून त्याचे पावित्र्य जपत नवरात्रोत्सवाला प्रारंभ होतो.

पाच देवींच्या घटस्थापना सोमवार दि. २२ सप्टेंबरला घटस्थापनेच्या दिवशी सकाळी ठिक ९.३० वाजता श्री भद्रकाली मातेची ज्योत आल्यानंतर शहरात या ज्योतीची येथील वाल्मीक नगरातील श्री नवशक्ती दुर्गोत्सव मंडळाची श्री दुर्गादेवी, श्री महंकाली देवी, श्री वाघामाय, श्री मरीमाय व श्री महाकाली अशा पाच देवींच्या विधिपूर्वक घटस्थापना करण्यात येणार आहे व मोठ्या श्रद्धेने व जल्लोषात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येणार असल्याची माहिती ज्योत यात्रेचे प्रमुख अभय इंगळे यांनी दिली.

# संविधानविरोधी काम करणाऱ्यां विरोधात युकाँचे स्वाक्षरी अभियान

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १० :

वोट चोरी आणि संविधानविरोधी काम करणाऱ्या सत्ताधाऱ्यांविरोधात आज, मंगळवारी युवक काँग्रेसने स्वाक्षरी अभियान राबविले. येथील डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयासमोर राबविण्यात आलेल्या या आंदोलनात अनेक विद्यार्थ्यांनी हिरीरीने सहभाग नोंदविला. अमरावती विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. सत्ताधाऱ्यांच्या संविधानविरोधी कारभाराविरुद्ध युवक काँग्रेसतर्फे देशव्यापी वोट चोर गद्दी छोड अभियान राबविले जात आहे. सदर आंदोलन हे त्याचाच एक भाग होता. या अभियानात शेकडो विद्यार्थी व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपला रोष व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी करून लोकशाहीची पायाभरणी मजबूत करण्यासाठी आणि जनादेशाचा अपमान करणाऱ्या सत्ताधाऱ्यांविरुद्ध ठाम भूमिका घेतली आहे. जनतेच्या मतांचा अनादर करून सत्तेत बसलेल्या सरकारविरुद्ध युवकांचा संघर्ष सुरू असून, या स्वाक्षरी अभियानाद्वारे लोकशाहीची खरी ताकद दाखवण्यात येत आहे. आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रवक्ते व अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचे प्रभारी कपिल ढोके, युवक काँग्रेसचे शहरजिल्हा अध्यक्ष निलेश गुहे, उपाध्यक्ष अनिकेत ढेंगळे, नितिन अमरावती विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख यांनी स्पष्ट केले.

## रुजू न झालेल्या जि. प. अधिकाऱ्यांना शो कॉज

**अमरावती:** बदली झाल्यानंतर विहित मुदतीत रुजू न झालेल्या विविध जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांना कारणे दाखवा (शो कॉज) नोटीस बजावण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे यात अमरावतीचा उल्लेख टाळण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील बीडीओ युवराज मेत्रे यांची अमरावती येथे सामान्य प्रशासन विभागाचे डेप्युटी सीईओ म्हणून बदली करण्यात आली होती. परंतु ते अद्याप रुजू झाले नाहीत. त्यामुळे राज्यातील ज्या अधिकाऱ्यांना 'शो कॉज' बजावण्याचे आदेश देण्यात आले आहे, त्यामध्ये त्यांच्याही नावाचा उल्लेख असणे आवश्यक होते. परंतु तसे झाले नाही. त्यामुळेच सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.

राज्य शासनाने काही काळापूर्वी एका जिल्हा परिषदेतून दुसऱ्या जिल्हा परिषदेत अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या. संबंधितांनी त्वरेने जुनी आस्थापना सोडून नव्या ठिकाणी रुजू होण्याचेही त्यांच्या बदली आदेशात म्हटले होते. परंतु अडीच ते तीन महिन्यांच्या कालावधी लोटल्यानंतरही काही अधिकारी नव्या ठिकाणी रुजू झाले नाहीत. यापैकी ९ अधिकाऱ्यांना त्या-त्या जिल्हा परिषदेच्या सीईओंनी शो कॉज नोटीस बजावण्याचे आदेश राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या अवर सचिव डॉ. उर्मिला जोशी यांनी दिले आहेत. परंतु यामध्ये अमरावतीचा उल्लेख मात्र नाही. संबंधित अधिकाऱ्यांना 'शो कॉज' नोटीस बजावून त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई का केली जाऊ नये, असेही सदर पत्रात म्हटले आहे. त्यामुळे संबंधितांकडून खुलासा मागवावा तसेच आवश्यकता वाटल्यास शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा, असा उल्लेखही डॉ. उर्मिला जोशी यांच्या पत्रात आहे.

# स्वयम डिजिटल अभ्यासक्रमावर कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी
संग्रामपूर, दि. १० :

स्वयम या भारत सरकारच्या डिजिटल शिक्षण उपक्रमावर आधारित एक दिवसीय कार्यशाळा तालुक्यातील वरवट बकाल येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात ४ सप्टेंबर रोजी पार पडली. विद्यार्थ्यांना स्वयम प्लॅटफॉर्म वरील विविध अभ्यासक्रम, एबीसी आयडी अर्थात ॲकेडमिक बँक ऑफ क्रेडिट आयडी तयार करण्याची प्रक्रिया आणि क्रेडिट ट्रान्सफर प्रणाली यासंबंधी माहिती देणे, हा या कार्यशाळेचा उद्देश होता.



अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम येरणकर हे होते. तर आयक्युऐसी समन्वयक डॉ. संजय टाले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुभाष पवार यांनी केले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या स्वयम या ई-लर्निंग व्यासपीठाची सखोल ओळख करून देण्यात आली. देशातील नामांकित आयआयटी आयआयएससी मधील मोफत अभ्यासक्रम तसेच विद्यार्थ्यांनी आपली एबीसी आयडी कशी तयार करावी, याबद्दल प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. एखाद्या विद्यार्थ्याने स्वयम वरील नोंदणीकृत अभ्यासक्रम पूर्ण केल्यास त्या अभ्यासक्रमाचे क्रेडिट्स त्यांना मिळू शकतात. हे क्रेडिट्स एबीसी आयडी मध्ये जमा होतात आणि युजीसीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ते त्यांच्या पदवी अभ्यासक्रमात गणले जाऊ शकतात.

# ईदची मिरवणूक:ऑपरेशन सिंदूरचे बॅनर



■ महासागर प्रतिनिधी , मूर्तिजापूर , दि. १० :

प्रेमाचा आणि सलोख्याचा संदेश देणारी ईद-ए-मिलादुन्नबीच सणानिमित्त उत्साह, उल्हास आणि जल्लोषाचे वातावरण मुस्लिम बांधवामध्ये दिसून आले. ईद ५ सप्टेंबर रोजी असतांना मुस्लिम बांधवांनी गणेशोत्सवाची धामधूम पाहता गणेशोत्सवा दरम्यान कुठलाही व्यत्यय येऊ नये व असामाजिक तत्त्वांना वाव मिळू नये याकरिता एकतेचे उदाहरण प्रस्थापित करत ईद-ए मिलादुन्नबी उत्सव अत्यंत जल्लोषात आणि शांततामय वातावरणात साजरा केला. येथील ईदगाह मैदानावर शाही इमाम बाबर हुसेन खतीब यांच्या मार्गदर्शनात प्रार्थना करून संपूर्ण देशात सुख, समृद्धी व शांतता नांदावी यासाठी प्रार्थना करण्यात आली. शहरातील जुने घरकुल, नवे घरकुल, पठाणपुरा, पोळा चौक, मोमीनपुरा, खडकपुरा, रोशनपुरा, रेहमतनगर, मोहम्मदीया प्लॉट येथून विविध मार्गाने निघालेल्या सर्व मिरवणूक टांगा चौकातून मुख्य मार्गावरून मार्गक्रमण करीत मोरारजी चौक, भगतसिंग चौक मार्गे ईदगाह


BHONDEKAR EDUCATION SOCIETY S

## POOJA NURSING COLLEGE, BHANDARA

Kisan Chowk, Bank Colony, Sahakar Nagar, Bhandara. 441904
(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik & Maharashtra Nursing Council)
Contact No.: 7391045392 / 7823006818 / 9850974842
Email: poojanursinginstitute@gmail.com, website: www.poojanursing.com

POST BASIC B.Sc. NURSING : 2 YRS. DEGREE COURSE &
M.Sc. NURSING : 2 YRS. P.G. COURSE

### ADMISSION NOTICE 2025-26

**Post Basic B.Sc. Nursing Eligibility**
1. GNM Passed
2. Registration with concerned State Council is essential (with renewal upto March 2027)
3. Age below 50 yrs.
4. Candidate should be medically fit

**M.Sc. Nursing Eligibility**
1. Passed B.Sc. (N) / P.B.B.Sc./B.Sc. Nursing Marks 55% & above 5% relaxation of marks for Reserved category (Maharashtra State)
2. Clinical Experience / Teaching exp. for one year & above after Registration.
3. Registration with concerned state council is essential (with renewal upto March 2027)
4. Candidate should be medically fit.

M.SC. NURSING SEAT METRIX FOR ADMISSION 2025-26

| M.Sc Nursing Speciality | SUBJECT WISE SEATS | NRI/ Institutional Quota | GENERAL | EWS | SEBC | SC | ST | DT A | NT B | NTC | N T D | OBC Including SBC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | NRI/IQ 15% | OPEN QUOTA 50% | | RESERVATION QUOTA 35% | | | | | | | |
| Medical Surgical Nursing (CVNT) | 7 | 1 | 3 | 1 | - | 1 | - | - | - | - | - | 1 |
| Paediatric Nursing | 7 | 1 | 3 | 1 | 1 | - | - | - | - | - | - | 1 |
| Community Health Nursing | 7 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | - | - | - | - | - | - |
| OBGY Nursing | 7 | 1 | 2 | - | 1 | - | 1 | - | - | 1 | - | 1 |
| Psychatric Nursing | 7 | 1 | 3 | 1 | 1 | - | - | 1 | - | - | - | - |
| Total | 35 | 5 | 14 | 4 | 4 | 2 | 1 | 1 | - | 1 | - | 3 |
| | | | 18 | | 12 | | | | | | | |
| POST BASIC B.SC NURSING SEAT MATRIX FOR ADMISSION 2025-2026 | | | | | | | | | | | | |
| Post Basic B.Sc Nursing | 60 | 9 | 24 | 6 | 6 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 6 |
| | | 9 | 30 | | 21 | | | | | | | |

**Shedule for Admission Process:**

| Round - 1 | |
|---|---|
| 1. Issue and submission of duly filled application form : | 25/09/2025 upto 5.00 pm |
| 2. Display of Merit List on notice board & website : | 29/09/2025 upto 5.00 pm |
| 3. Verification and Admission process : | 30/09/2025 upto 2.00 pm |
| 4. Display vacant seats notice board & website : | 30/09/2025 upto 2.30 pm |
| **Round - 2** | |
| 1. Issue and submission of duly filled application form : | 30/09/2025 upto 3.00 pm |
| 2. Display of Merit List / Provisional selection : | 30/09/2025 upto 3.30 pm |
| 3. Verification and Admission : | 30/09/2025 upto 4.00 pm |
| 4. Cut off date of admission as per the competent authorities. | |

* Admission will be strictly done on the basis of inter-se merit.
* All admission will be subject to approval from competent authorities.
* For more information and details kindly visit our website regularly.

**Note :** Course commencement date will be inform later telephonically as per INC Delhi and MUHS, Nashik instructions.

Principal
**Pooja Nursing College, Bhandara**

Secretary
**Bhondekar Education Society s, Bhandara**



## Change Of Name

MY OLD NAME WAS **SUBHASHCHANDRA PURUSOTTAM DHARMIK**. NOW MY NEW NAME IS **SUBHASH PURUSHOTTAM DHARMIK.**
**ADD :** AT. POST. ARJUNI TAH. TIRORA GONDIA

MY OLD NAME WAS **HARSHADRAO JANGDE** . NOW MY NEW NAME IS **HARSHAD JANGDE.**
**ADD :** PLOT NO. 93, NEW NARSALA ROAD NEAR SAHARE BABA HOUSE INDRA NAGAR NAGPUR

MY OLD NAME WAS **MOHD AFZAL ANSARI**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD AFZAL MAKKI.**
**ADD :** 34/A TAMBO HOTEL BUILDING ANSAR NAGAR MOMINPURA NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **MOIZ HUSAIN ALI ASGER**. NOW MY NEW NAME IS **MOIZ HUSAIN RAMPURAWALA.**
**ADD :** FLAT NO 202 GITAMANI COMPLEX BENGALI PANJA ITWARI NAGPUR 440002

MY OLD NAME WAS **FATEMA**. NOW MY NEW NAME IS **FATEMA RAMPURAWALA.**
**ADD :** FLAT NO 202 GITAMANI COMPLEX BENGALI PANJA ITWARI NAGPUR 440002

MY OLD NAME WAS **NAZMA BEGAM ALIAS ASIYA TABBASUM 2. ASIYA TABBASUM MD RAFIK SHEIKH** . NOW MY NEW NAME IS **ASIYA TABBASUM MOHAMMAD RAFIK SHEIKH.**
**ADD :** NEAR JAYBHIM CHOWK PARISAR OPP URDU SCHOOL KANNAMWAR WARD BALLARPUR CHANDRAPUR 442901

MY OLD PASSPORT NO. **J3367534**. MY OLD NAME WAS **MOHAMMAD SHADAB KHIZAR**. NOW MY NEW NAME IS **MOHD SHADAB KHIZAR KHAN.**
**ADD :** PLOT NO. 107 BADA TAJBAGH NAGPUR 440024

I AKASH KUNDNANI CHANGING MY DAUGHTERS NAME IN HER PASSPORT NO **V9757879**. HER OLD NAME WAS **ANAYA AKASH KUDNANI** AND NOW NEW NAME IS **ANAYA AKASH KUNDNANI.**
**ADD:** NEAR KOTHARI GAS GODOWN GANESH NAGAR GONDIA 441601

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ZAIMAM MOHAMMAD SAJID SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ZAIMAM MOHD SAJID SHEIKH.**
PREVIOUS PASSPORT NO : **P3437006**
**ADD :** HOUSE NO.1001, NEAR BADMINTON HALL SHATRANJIPURA, NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **MD.SALIM MD.SHARIF SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **SALIM SHARIF SHEKH.**
**ADD :** WARD NO.13,NEAR MURLIDHAR MANDIR, SAONER, DISTRICT. NAGPUR 441107 MS

MY OLD NAME WAS **MOHAMMAD AADIL MOHAMMAD FIROZ**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ADIL MOHAMMAD FIROZ SHEIKH.**
**ADD :** PLOT NO.165-178, KOLHE LAYOUT, NEAR SABIR MASJID, BHILGAON ROAD, WANJRA, NAGPUR 440026 MS

MY OLD NAME WAS **MARIYAM RIYAZ**. NOW MY NEW NAME IS **MARIYAM RIYAZ ALI.**
**ADD :** MIRROR HOME ,KASAR PURA LANE ,NEAR BOHRA MASJID,ITWARI,NAGPUR-440002

MY PASSPORT NO. **A0601622**. MY OLD NAME WAS **SAEED HASAN KHAN**. NOW MY NEW NAME IS **SAYEED HASAN NOOR HASAN.**
**ADD :** P.NO. 295, WANJRA BASTI, NEAR BABA DIWAN SHAH MASJID, BHILGAON ROAD, NAGPUR MS 440026

I **HAJRA BEGUM SAYEED HASAN** DECLARED THAT MY HUSBAND PASSPORT NO. **A0601622** IS MY INCORRECT NAME WAS **HAJIRA**. NOW CORRECT NAME IS **HAJRA BEGUM SAYEED HASAN.**
**ADD:** P.NO. 295, WANJRA BASTI, NEAR BABA DIWAN SHAH MASJID, BHILGAON ROAD, NAGPUR MS 440026


## मोफत रोग निदान शिबिरामध्ये रुग्णांची आरोग्य तपासणी

**धामणगाव रेल्वे:** तालुक्यातील स्व. डॉ.ओमप्रकाश चांडक यांच्या ११ व्या स्मृति प्रित्यर्थ निःशुल्क रोगनिदान शिबिर चांडक परिवार व माहेश्वरी नवयुग मंडळाच्या संयुक्त सहकार्याने माहेश्वरी भवन येथे घेण्यात आले. शिबिरात विविध आजाराच्या रुग्णांची तपासणी करुन त्यांना औषध वितरणही केले.

डॉ. ओमप्रकाश चांडक यांच्या पद चिन्हावर चालून त्यांचा मुलगा डॉ. प्रीतम चांडक तालुक्यातील रुग्णांची सेवा करीत आहे. असे प्रतिपादन माजी आ.प्रा.वीरेंद्र जगताप यांनी केले. यावेळी माहेश्वरी हितकारक संघाचे अध्यक्ष अनिल पनपालिया उपस्थित होते. तत्पूर्वी, शिबिरात डॉ. अनुज सारडा, डॉ. वसंत डांगरा, डॉ. नवीन सोनी, डॉ. आदित्य बोथरा, डॉ. अमित राठी, डॉ. विक्रम राठी, डॉ. केतन दागडीया, डॉ. कीर्ती सोनी, डॉ. रोहीत मुंधडा, डॉ. योगेश कोळमकर,डॉ. प्रिती चांडक, डॉ. मोनीका चांडक, डॉ. प्रितम चांडक या डॉक्टरांनी तपासणी केली.


### सायटेशन/पब्लिक जाहीर नोटीस

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील**
एम.जे.सी. क्र. ३२/२०२५
प्रोसेस क्र. १०४८/२०२५
दि. ०८/०९/२०२५

अर्जदार : १. श्री. राजेंद्र डोमाजी बागडे, वय-५८ वर्षे, रा. वायगांव, पो. मोरगांव, तह. मौदा, जि. नागपूर
२. श्री. अशोक डोमाजी बागडे वय-६९ वर्षे, रा. वार्ड नं. ०७, प्लॉट नं. ३०१/११-ए, राशन दुकानाजवळ, कमसरी बाजार कॅन्ट एरिया, कामठी, तह. कामठी, जि. नागपूर

विरुद्ध

गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : श्री. लहानु बक्षी बागडे

सदरहू अर्जदारांनी कायदेशीर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. श्री. लहानु बक्षी बागडे हे मौजा-वायगांव, तह. मौदा, जि. नागपूर येथे वास्तव्यास होते. अर्जदारांनी मयतदार श्री. लहानु बक्षी बागडे ह्यांचा कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. श्री. लहानु बक्षी बागडे यांचा मृत्यु दि. ०१.०७.२००८ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क. स्तर मौदा, जि. नागपूर यांनी दिनांक ०३.१०.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक/जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा. जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टिफिकेट (कायदेशीर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. ३०-०८-२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर



### कोर्ट विद्यमान श्री. रमेश कोळपे तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय

प्र.क्र. /एम.आर.सी.-/८१/२०२५
मौजा रामटेक ता. रामटेक
जिल्हा नागपूर

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी मन्ना लोखा कुशवाह रा. महात्मा फुले वार्ड, रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर यांनी वडील नामे महादेव गोपाळा कच्छवा यांचा मृत्यु दिनांक १७.१०.१९५४ रोजी मौजा रामटेक येथे राहत्या घरी झाला असून मृत्युची नोंद नगर परिषद रामटेक येथे केली नाही त्याबाबत नगर परिषद रामटेक यांनी दिनांक २५.०४.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे महादेव गोपाळा कच्छवा यांचा मृत्यु दिनांक १७.१०.१९५४ बाबत नगर परिषद रामटेक येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याद्वारे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद महादेव गोपाळा कच्छवा यांचा मृत्यु दिनांक १७.१०.१९५४ बाबत नगर परिषद रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २३/०९/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजित तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांना नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०४/०९/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्थळ : रामटेक
दिनांक : ०४/०९/२०२५

(रमेश कोळपे)
तहसिलदार, रामटेक



### महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१२-२५६१९६५

क.न.र.अ./तह.नाग(शहर)/अवि-१२३०/२०२५ दिनांक : ०१/०९/२०२५

वाचा : १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार.
२. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-१ अ.दि. १७/०३/२०२५
३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. जन्म/डी-१/जन्म-मृत्यु आदेश/कावि- १०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५
४. अब्दुल इरफान सिद्दिकी, रा. १४३, गोरेवाडा, वेलकम सोसायटी, नागपूर यांचा अर्ज दिनांक २२/०७/२०२५

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार अब्दुल इरफान सिद्दिकी, रा. १४३, गोरेवाडा, वेलकम सोसायटी, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अब्दुल इरफान सिद्दिकी यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९६८ रोजी त्यांच्या राहते घरी जाफरनगर, नागपूर, येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



### महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१२-२५६१९६५

ठ.जी./प्रसु-२/तह.नग (शहर)/अवि-५०९/२०२५ दिनांक : ९/०८/२०२५

वाचा : १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार.
२. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-१ अ.दि. १७/०३/२०२५
३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. जन्म/डी-१/जन्म-मृत्यु आदेश/कावि- १०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५
४. मोहम्मद आसीन मोहम्मद हाशमी रा. अवस्थी नगर रोड, सादिकाबाद रोड, नागपूर यांचा अर्ज दिनांक १८/०७/२०२५

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार मोहम्मद आसीन मोहम्मद हाशमी, रा. अवस्थी नगर रोड, सादिकाबाद रोड, नागपूर यांनी त्यांची बहीण यांची जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू खतीजा फरहत मोहम्मद हाशीम हिचा जन्म दिनांक ०४/११/१९६५ रोजी राहते घरी दुर्गावती, नागपूर, येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



### महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

[illegible]

**-: जाहिरनामा :-**

[illegible]

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



## -Public Tender Notice-

For the year 2025-2026, quotations are being invited by the Taluka Krida Sankul samiti Kalmeshwar for the play ground following solar materials.

Supplying, installing testing commissioning solar street light pole comprising of 80 W LED with IP 65 aluminium die casting fixtures fitting, 12V min. 102 AH 12,8 V maintenance free Lithium Fe Po4 Batery, 165 W X 2solar panel( MNRE Approved ), panel stand, MS Powder Coated Battery BOX Weatherproof, mounted on 75/80 mm dia. B-Grade Gl Pole of 7 Mtr.Octagonal Height along with brackets, foundation In 1:3:6 cement concrete (20 to 25) mm stone metal duly plastered with necessary curing for complete(pole muffing or any other purpose), earthling and necessary accessories completed as per specifcation Quantity proscribed for as per estimate is four solar light and estimated cost per complete light with fitting is seven lakhs

1. The tenderer must possess a valid Gumastha (Shop Act) License.
2. A GST certificate is mandatory for the tenderer.
3. The tenderer must have a PAN card.
4. The tenderer must possess an MSME certificate.
5. Work orders related to previous solar projects must be attached as proof of experience.

All materials must be supplied with complete fittings and a two-year warranty. Quotations should be submitted to the Taluka Sports Officer Kalmeshwar within 7 days or as early as possible from the date of publication of this tender. Terms and conditions can be viewed at the Taluka Krida Sankul office Kalmeshwar The TSO reserves all rights to accept or reject any quotation.

Sd
**Taluka Sports Officer**
Kalmeshwar
Taluka-Kalmeshwar Dist-Nagpur


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# निरामय

## वेगाने फैलावतोय चिकुनगुनिया



व्याधी विचार

डॉ. संदीप नाईकवाडे

सुमारे २० वर्षांपूर्वी जगभरात कहर करणारा हा विषाणू पुन्हा एकदा परतला आहे. या विषाणूचे नाव चिकुनगुनिया आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये चिकुनगुनिया विषाणू रियुनियन, मेयोट आणि मॉरिशस सारख्या बेटांवरून मादागास्कर, सोमालिया आणि केनियासारख्या आफ्रिकन देशांमध्ये पसरला आहे. आता तो चीनमध्ये वेगाने पसरत आहे.

चीनच्या ग्वांगडोंग प्रांतात चिकुनगुणिया विषाणूचा प्रकोप वाढत असून, जुलैपासून आतापर्यंत सात हजाराहून अधिक रुग्ण आढळले आहेत. फोशान शहर सर्वाधिक प्रभावित असून, या ठिकाणी कोविड काळातील उपाययोजनांची आठवण करणारी पावले उचलली जात आहेत. फोशानमध्ये चिकुनगुनियाच्या रुग्णांना हॉस्पिटलमध्येच ठेवले जात असून त्यांच्यासाठी खास जाळी लावून डासांपासून संरक्षण केले जात आहे. रुग्णांना आठ दिवसांनंतर कवा रिपोर्ट निगेटिव्ह आल्यानंतरच डिस्चार्ज दिला जातो. चिकुनगुनिया विषाणू संक्रमित डासांच्या चाव्याने पसरणारा आजार आहे. यामुळे ताप, पुरळ आणि तीव्र सांधेदुखी होते, जी काही वेळा महिन्यांनंतरही थांबत नाही.

**जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा**

जागतिक आरोग्य संघटनेने इशारा दिला होता, की चिकुनगुनिया आशियाई देशांपासून युरोपपर्यंत कहर करू शकतो. सध्या आशिया आणि युरोपमधील अनेक देशांमध्ये त्याचे रुग्ण सतत वाढत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले होते, की सध्या ११९ देशांमधील सुमारे ५६० कोटी लोकांना चिकुनगुनिया संसर्गाचा धोका आहे. दरवर्षी केवळ चीनमध्येच नाही, तर भारतातही चिकुनगुनियाचे रुग्ण आढळतात. पावसाळ्यात डास वाढतात आणि चिकनगुनियाचा विषाणूदेखील अधिक पसरू लागतो. २००५ मध्ये चिकुनगुनियाने साथीचे रूप धारण केले आणि नंतर हा आजार हद महासागरातील लहान बेटांपासून सुरू झाला आणि पाच लाखांहून अधिक लोकांमध्ये पसरला. क्वचित प्रसंगी, चिकुनगुनिया अपंगत्व देऊ शकतो.

**ग्वांगडोंगमध्ये गंभीर स्थिती**

फोशानसह ग्वांगडोंगमधील बाराहून अधिक शहरांमध्ये चिकुनगुनियाचे रुग्ण आढळले आहेत. एकाच आठवड्यातच तीन हजारांहून अधिक नवीन रुग्ण नोंदवले गेले. याशिवाय, हाँगकाँगमध्ये पहिला रुग्ण सापडला आहे.

## कबुतरांपासून जीवघेणा आजार ?



घ्या काळजी

डॉ. प्रसन्न नेने

मुंबईत कबुतरखान्याचा विषय चांगलाच तापला. उच्च न्यायालयाने मुंबईतील कबुतरखाने बंद करण्याचे आदेश दिले. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मुंबई महापालिकेने सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना अन्न घालण्यावर बंदी घालण्यात आली. कबुतरांच्या वाढत्या संख्येमुळे झपाट्याने आजार पसरत असल्याचे मत उच्च न्यायालयाने मांडले.

गेल्या अनेक महिन्यांपासून मुंबईतील दादरमधील कबुतरखाना हटवण्याची मागणी होत आहे. हा कबुतरखाना दादर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावरच आहे. हा कबुतरखाना दादरची ओळख बनला होता; मात्र या ठिकाणी येणाऱ्या कबुतरांच्या प्रचंड संख्येमुळे या परिसरात वेगाने आजार पसरत असल्याचे उघड झाले होते. त्यामुळे स्थानिकांनी कबुतरखाना बंद करण्याची मागणी सातत्याने धरून ठेवली होती.

**कबुतरांमुळे कोणते आजार होऊ शकतात?**

कबुतरांमुळे विविध आजार होऊ शकतात. यामध्ये श्वासाचे आजार, त्वचेचे आजार आणि पचनसंस्थेशी संबंधित आजार यांचा समावेश आहे. कबुतरांच्या विष्ठेतून आणि पिसातून पसरणाऱ्या जीवाणू, विषाणू आणि बुरशीमुळे हे आजार होतात. कबुतरांची विष्ठा आणि पिसांमुळे अनेक नागरिकांना श्वसनाच्या व्याधी जडल्या होत्या. कबुतराच्या विष्ठेशी संबंधित रोगांमध्ये 'क्रिप्टोकोकोसिस', 'हिस्टोप्लाज्मोसिस' आणि 'सिटाकोसिस' यांचा समावेश होतो. विष्ठा साफ करताना तयार होणाऱ्या धुळीमध्ये श्वास घेतल्याने या आजारांची लागण होऊ शकते. कबुतरांच्या विष्ठेत अस्परजिलस बुरशी आढळून येते. यामुळे लर्जी होऊ शकते. तसेच कबुतरांमुळे अस्थमादेखील होण्याची शक्यता असते. कबुतरांमुळे 'क्रिप्टोकोकोसिस', 'हिस्टोप्लाज्मोसिस,' 'सायटाकोसिस', 'साल्मोनेलोसिस', 'एव्हीयन माइट इन्फेस्टेशन' आणि 'टॉक्सोप्लाज्मोसिस' सारखे आजारही होण्याची शक्यता आहे.

**कबुतरांमुळे होणारे आजार**

**क्रिप्टोकोकोसिस :** 'क्रिप्टोकोकोसिस' एक बुरशीजन्य आजार आहे. तो कबुतरांच्या विष्ठेतून पसरतो.

**हिस्टोप्लास्मोसिस:** 'हिस्टोप्लास्मोसिस'देखील एक बुरशीजन्य आजार आहे, तो ही कबुतरांच्या विष्ठेतून पसरतो.

**सिताकोसिस :** 'सिटाकोसिस' हा एक जीवाणूजन्य आजार आहे. तो कबुतरांच्या संपर्कात आल्याने होऊ शकतो.

**ऑर्निथोसिस:** 'ऑर्निथोसिस' हा एक जीवाणूजन्य आजार आहे. तो कबुतरांच्या विष्ठेतून आणि पिसातून पसरतो.

**लर्जी :** कबुतरांच्या संपर्कात आल्याने लर्जी होऊ शकते. त्यात श्वासोच्छ्वास आणि त्वचेच्या लर्जीचा समावेश आहे.

**फुफ्फुसाचे आजार :** कबुतरांच्या विष्ठेतील धुळीमुळे फुफ्फुसाचे आजार होऊ शकतात.

## डास चावताहेत?



विकार

ऋतूबदलाच्या काळात डास मोठ्या प्रमाणावर सक्रिय होतात. प्रजननाच्या काळात डासांच्या संख्येत प्रचंड वाढ होते. डासांमुळे डेंग्यू, मलेरियासारख्या विकारांचा धोका बळावतो. डास चावल्यानंतर शरीरावर व्रण उठतात. बऱ्याचजणांची त्वचा संवेदनशील असते. अशा लोकांना डास कवा किटकदंशानंतर बराच त्रास होतो. अंगावर पुरळ उठतं. अशा वेळी डासविरोधी क्रीम्सचा वापर करायचा नसेल तर नैसर्गिक उपाय मदतीला येऊ शकतो. केळ्याच्या सालीचा वापर करून तुम्ही डास चावल्यामुळे होणारा त्रास कमी करू शकता.

* केळ्याच्या सालीत दाह कमी करणारे गुणधर्म असतात. त्यामुळे डास चावल्यानंतर उठणाऱ्या लालसर पुरळाची तीव्रता कमी होऊ शकते. केळ्याची साल, गुलाबपाणी आणि बर्फ यांचा एकत्रित वापर करून तुम्ही बरेच लाभ मिळवू शकता. यासाठी केळ्याची साल घ्या. त्यावरचा पांढरा भाग खरवडून काढा. कुस्करून घ्या. त्यात गुलाबपाणी घाला. हे मिश्रण एकजीव करा. याची जाडसर पेस्ट तयार व्हायला हवी. ही पेस्ट पुरळ उठलेल्या भागावर लावा. यानंतर बर्फाचे तुकडे एका कापडात बांधून घ्या. हा बर्फ पेस्ट लावलेल्या भागावर लावा. साधारण पंधरा मिनिटांनी हा उपाय करत राहा. मग पेस्ट लावलेला भाग पाण्याने धुवून टाका. कोरडा करा.

* केळ्याचं साल आणि ग्लिसरीन यांच्या मिश्रणामुळेही तुम्हाला आराम मिळू शकेल. आधीप्रमाणे केळ्याच्या सालीतला पांढरा भाग काढून घ्या.

## नैराश्य दूर करण्यासाठी मांजर पाळा!



आयुर्वेद

डॉ. महेश दळे

बऱ्याच लोकांना मांजरे पाळायला आवडतात. आता मांजरांचा वापर अल्झायमर आणि डिमेंशियाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी केला जाऊ शकतो. अलीकडेच एक अभ्यास करण्यात आला. त्यात दिसून आले, की म ांजरांमधील डिमेंशिया हा आजार मानवांमध्ये होणाऱ्या अल्झायमर आजारासारखाच आहे. अशा परिस्थितीत, शास्त्रज्ञांचा विश्वास आहे, की मांजरे अल्झायमर आणि डिमेंशियाच्या उपचारात खूप उपयुक्त ठरू शकतात.

**डिमेंशिया आणि अल्झायमरशी मांजरांचा संबंध**

हे संशोधन ब्रिटनमधील एडिनबर्ग विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी केले आहे. त्यांनी असे निरीक्षण केले की डिमेंशिया असलेल्या मांजरांच्या मेंदूमध्ये एक विशेष प्रकारचे विषारी प्रथिन जमा होते, ज्याला अमायलॉइड-बीटा म्हणतात. हे प्रथिन मानवांमध्ये अल्झायमर आजाराचे मुख्य कारण मानले जाते. 'युरोपीयन जर्नल ऑफ न्यूरोसायन्स'मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात असे म्हटले आहे की मांजर आणि मानवांच्या या आजारात अनेक समानता आहेत. शास्त्रज्ञांनी असे निरीक्षण केले आहे, की वृद्ध मांजरांना डिमेंशिया होतो, तेव्हा त्यांचे वर्तन बदलते. यामुळे ते वारंवार म्याऊ करतात. त्या गोंधळलेल्या स्थितीत दिसतात. त्याच वेळी त्यांची झोपदेखील वारंवार खंडित होते. ही सर्व लक्षणे मानवांमध्ये होणाऱ्या अल्झायमर रोगासारखीच आहेत. अशा परिस्थितीत, शास्त्रज्ञांना वाटते, की मांजरांचा अभ्यास करून अल्झायमर रोग चांगल्या प्रकारे समजू शकतो.

**संशोधनात काय केले ?**

या अभ्यासासाठी, शास्त्रज्ञांनी २५ मृत मांजरांच्या मेंदूवर संशोधन केले. यापैकी काही मांजरे डिमेंशियाने ग्रस्त होत्या. त्यांनी एका शक्तिशाली सूक्ष्मदर्शकाच्या मदतीने मांजरांच्या मेंदूची तपासणी केली आणि असे आढळले, की वृद्ध आणि डिमेंशियाने ग्रस्त मांजरांच्या मेंदूमध्ये अमायलॉइड-बीटा प्रथिनांचा साठा आहे. हा साठा 'सायनॅप्स'मध्ये दिसून आला. सायनॅप्स मेंदूच्या पेशींमध्ये संदेश पाठवण्याचे काम करतात. ते निरोगी मनासाठी खूप महत्वाचे आहेत. त्यांच्यामध्ये अमायलॉइड-बीटा जमा होतो, तेव्हा ते योग्यरित्या कार्य करू शकत नाहीत. यामुळे स्मरणशक्ती आणि विचार करण्याची क्षमता कमी होते. अल्झायमर रोगातही हीच समस्या दिसून येते.

## मित्र जोडा, आजार पळवा!



कुठे चुकतो आपण?

डॉ. कुंदन गायकवाड

अनेकांच्या 'सोशल मीडिया' अकाउंटवर कमेंट्स आणि लाईक्सचा वर्षाव असतो, त्यांच्या मित्रांची, फॉलोअर्सची यादी मोठी असते. असे असले अनेकजण अडचणीच्या काळात स्वतःला एकटे पडल्याचे अनुभवतात. 'न्यूज कॉर्प'च्या 'ग्रोथ डिस्टिलरी' आणि 'मेडिबँक'च्या नव्या अभ्यासात हे भयावह वास्तव समोर आले आहे. त्यामुळे डिजिटल गर्दीमागे लपलेले एकटेपण उघड झाले आहे. या अभ्यासानुसार, मानसिक स्थिती चांगली असणाऱ्यांकडे सरासरी पाच कवा त्याहून जास्त मित्र असल्याचे स्पष्ट झाले आहे; पण मानसिकदृष्ट्या संघर्ष करत असलेल्यांकडे फक्त तीनच मित्र असतात. ही लहानशी वाटणारी दोन मित्रांची तफावत मोठा परिणाम करणारी ठरते. त्यामुळे माणूस 'मी परिस्थिती हाताळू शकतो' या भावनेप-ासून 'कोणाला त्रास नको, म्हणून मी शांत राहतो' या अवस्थेत पोहोचतो.

**सोबत असूनही दूर का वाटते?**

आजचे 'सोशल लाइफ' बिझी असले, तरे ते वरवरचे आहे. अनेकजण इव्हेंटला जातात, ग्रुप चॅटमध्ये सक्रिय असतात, त्यांचे शेकडो मित्र असतात; पण एखादे संकट आले, की अशा व्यक्ती कुणालाही फोन करणे टाळतात. अशा वेळी आपण हक्काने आपली समस्या सांगू शकू असे मित्र आपल्याकडे नसतात. आपली समस्या सांगून आपण इतरांवर ओझे होऊ नये, किंवा त्यांना आपण दुर्बल असल्याचे दिसू नये म्हणून टाळण्याचा प्रयत्न करतो. अशा तणावपूर्ण परिस्थितीमध्ये आपल्याला कुणी काही विचारलेच तर 'फक्त थोडे थकलोय' कवा 'फार बिझी असतो' असे सांगून आपण वेळ मारून नेतो.

**खरे नाते काय असते?**

खरे नाते म्हणजे ५० कवा १०० मित्र असणे नव्हे, तर एखादी अशी व्यक्ती, जी निःसंकोचपणे तुमचा फोन उचलेल, तुमच्या मदतीला येईल. त्याचप्रमाणे तुम्हीही त्याच्यासाठी कधीही, वेळ न पाहता मदतीसाठी पोहोचाल.

## मधुमेहींसाठी पेयांचे पर्याय



काय खावं?

बऱ्याच पेयांमध्ये भरपूर साखर असते. त्यामुळे मधुमेहींना काही पेयं टाळावी लागतात. त्यांना बरेचदा पाण्यावरच समाधान मानावं लागतं. पण मधुमेहींसाठी आरोग्यदायी पेयांचे काही पर्याय आहेत. त्याविषयी...


* मधुमेहग्रस्तांना भाज्यांचे रस पिता येतील. पालक, गाजर, टोमॅटो यांचे रस खूपच आरोग्यदायी असतात. यातून आवश्यक ते पोषक घटकही मिळतात. आवडीच्या भाज्यांचे रसही पिता येतील.

* मधुमेही कॉफी पिऊ शकतात. कॉफीमुळे मधुमेह होण्याची शक्यता कमी होते, असं काही अभ्यासांमधून सम ेर आलं आहे. अर्थात कॉफी मर्यादित प्रमाणात प्यायला हवी. शिवाय त्यात साखरेचं प्रमाणही कमी असावं.

* हर्बल टी हा सुद्धा एक चांगला पर्याय आहे. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे हर्बल टी मिळतात. या चहामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात रहायला मदत होते. डॉक्टरांच्या सल्लयाने योग्य तो हर्बल टी प्या.

* मधुमेहींनी आहारात दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करायला हरकत नाही. त्यांनी कमी वॅलरी आणि फॅटयुक्त दूध प्यावं. डॉक्टरांच्या सल्लयाने दुधाचं प्रमाण ठरवता येईल.

## दुर्मिळ प्रकारचा कॅन्सर



आरोग्यवेध

मध्यंतरी इराकच्या एक महिलेला अत्यंत दुर्मिळ प्रकारच्या कर्करोगाचं निदान झालं. या कर्करोगाबाबत सर्वसामान्यांना फारशी माहिती नाही. अगदी थोडं अंतर चालल्यानंतरही तिला धाप लागत असे. यानंतर तिची तपासणी करण्यात आली आणि 'म ेसोथेलिओमा' नामक कर्करोगाचं निदान झालं. इराकमधली ही महिला उपचारांसाठी भारतात आली होती. गुरूग्रामच्या रुग्णालयात या कर्करोगाचं निदान करण्यात आलं. 'मेसोथेलिओमा' हा एक प्रकारचा फुफ्फुसाचा कर्करोग आहे. हा कर्करोग फुफ्फुसाच्या संरक्षण आवरणावर पसरतो. या कर्करोगाचं निदान वेळेत होत नाही. अगदी अखेरच्या टप्प्यांमध्ये याचं निदान होतं. म्हणूनच या विकाराच्या लक्षणांकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

**लक्षणं**

कोरड्या खोकल्याची सतत येणारी उबळ, धाप लागणं, थोडंसं चालल्यानंतर श्वास घ्यायला त्रास होणं, थोडी हालचाल केल्यानंतर दमल्यासारखं वाटणं, अचानक ताप येणं कवा रात्री खूप घाम येणं, फुफ्फुसामध्ये पाणी साठणं, पोटात कवा छातीत दुखणं, सतत थकल्यासारखं वाटणं, अशी लक्षणं दिसून आल्यास रुग्णाने नियमित रक्तपासणी तसंच फुफ्फुसाची क्ष-किरण चाचणी करून घेणं गरजेचं आहे. रक्तपासणीद्वारे कर्करोगाचं निदान होऊ शकतं. त्यामुळे अशा लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नये.

या कर्करोगाच्या प्रत्येक स्तरात वेगळी लक्षणं दिसून येतात. सुरूवातीच्या टप्प्यात खोकला येणं, श्वास घ्यायला त्रास होणं, पोटात कवा छातीत दुखणं, फुफ्फुसात पाणी साठणं अशी लक्षणं दिसतात. कर्करोग अधिक पसरल्यानंतर वेदनांची तीव्रता वाढणं, भूक मंदावणं, अचानक वजन कमी होणं, त्वचा पांढरी पडणं, गिळायला त्रास होणं, पचनशक्तीवर परिणाम होणं ही लक्षणं दिसू लागतात.

**उपचार**

या आजाराचं निदान झाल्यानंतर डॉक्टर केमोथेरपीचा सल्ला देतात. कर्करोगाच्या या प्रकारावर केमोथेरपी हाच प्रभावी उपाय ठरतो. हा आजार पूर्णपणे बरा करण्यासाठी 'हायपरथेमिक इन थोरेकिक केमोथेरपी' केली जाते. या थेरपीद्वारे छोट्यातल्या छोट्या कॅन्सर पेशी नष्ट केल्या जातात. या पेशी साध्या डोळ्यांना दिसत नाहीत. पण या थेरपीद्वारे त्या नष्ट होतात. या थेरपीसाठी विशेष उपकरणाची गरज भासते. तसंच या उपरणाच्या वापरासाठी योग्य ती सोय असणं गरजेचं असतं. आजाराच्या तीव्रतेनुसार उपचारांचा निर्णय घेतला जातो. केमोथेरपी आणि शस्त्रक्रियेव्यतिरिक्त इतर उपायांनी या आजारावर नियंत्रण मिळवता येतं. या विकाराचं निदान झाल्यानंतर योग्य आहार, क्युपंक्चर, योगा, मेडिटेशन करून नियंत्रण मिळवता येतं. किरणोत्सर्ग हा सुद्धा प्रभावी उपाय ठरू शकतो. तसंच रुग्णाचं समुपदेशनही केलं जातं.

## मेंदू खाणारा अमिबा येतोय!



नवसंशोधन

डॉ. सुनील पोटे

पोहण्याच्या पाण्यात वा आंघोळीच्या पाण्यातील एका सुक्ष्म जीवामुळे आपला जीव जाऊ शकतो, हे ऐकून विचित्र वाटेल. एका अमिबामुळे मृत्यू कसा येऊ शकतो, असा प्रश्न पडेल; परंतु केरळमध्ये घडलेल्या एका चिमुरडीच्या मृत्यूने हा मेंदू पोखणारा अमिबा चर्चेत आला आहे. या घटनेने अनेकांच्या जीवाचा थरकाप उडाला आहे. केरळमधील या मुलीचा मृत्यू मेंदू खाणाऱ्या अमिबाने झाला आहे. 'निगलेरिया फाऊलेरी' असे या अमिबाचे शास्त्रीय नाव आहे.

गेल्या अनेक वर्षांमध्ये केरळमध्ये मेंदू खाणाऱ्या अमिबाने अनेक मृत्यू झाले आहेत. हा अमिबा आपण शालेय अभ्यासक्रमात शिकलो आहोत. हा सर्वसामान्य अमिबा नाही. मायक्रोस्कोपने आपण याला पाहू शकतो. हा बहुतांशी कोमट, किंवा साचलेल्या कमी अस्वच्छ पाण्यात पैदा होतो. खास करून तलाव, सरोवर, स्वीमिंग पूल कवा स्वच्छ न केलेल्या पाण्यात हा सूक्ष्म जीव वेगाने वाढत असतो.

**'ब्रेन इटग अमिबा' काय असतो ?**

'ब्रेन इटग अमिबा'ला 'निगलेरिया फाऊलेरी' म्हटले जाते. हा एक दुर्मिळ खूपच जास्त इन्फेक्शन फैलावणारा जीव आहे. हा नाकाद्वारे मेंदूत पोहचतो. येथूनच याचा खतरनाक संसर्ग सुरू होतो. सुरुवातीला हा अमिबा नाकाच्या नसांच्या वर चढतो आणि मेंदूपर्यंत पोहचतो. तेथे मेंदूच्या पेशींना नष्ट करतो. जेव्हा अस्वच्छ पाणी नाकात जाते, तेव्हा हे इन्फेक्शन सुरू होते. खासकरून स्विमींग पूल, डबके, कवा तलावाच्या घाण पाण्यात हा अमिबा असतो.

**सुरुवातीची लक्षणे काय ?**

या आजाराची समस्या ही आहे,की सुरुवातीची लक्षणे एकदम सर्वसामान्य असतात. व्हायरल ताप आल्यावर येतात तशी लक्षणे असल्याने लोक याकडे दुर्लक्ष करतात; परंतु आजार वाढत जातो, तसेतशा रुग्णाला फिट्स येतात. रुग्ण बेशुध्द पडू शकतो आणि परिस्थिती आणखी बिकट होते. यामुळे रुग्णाला तीव्र डोकेदुखी, ताप, उल्टी, मान अखडणे आदी लक्षणे दिसतात.

### महत्त्वाचे काही...

**दीर्घायुषी व्हायचंय... कमी खा!**



प्रत्येकालाच दीर्घायुषी व्हायचं आहे. दीर्घायुषी होण्यासाठी नियमित व्यायाम केला जातो, पोषक आहार घेतला जातो. यासोबतच शरीरातला दाह कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा. भरपूर जगायचं असेल तर कमी खा, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. कमी कॅलरी शरीरात गेल्यास वार्धक्यात होणाऱ्या आजारांची तीव्रता कमी करता येते आणि तुम्ही अधिक काळ जगू शकता, असं संशोधकांचं म्हणणं आहे. सेल नावाच्या जर्नलमध्ये हा शोध प्रसिद्ध झाला आहे. अमेरिका आणि चीनमधल्या शास्त्रज्ञांनी याबाबत निष्कर्ष काढले आहेत. हे निष्कर्ष काढण्यासाठी उंदरांवर संशोधन करण्यात आलं. त्यासाठी वेगवेगळ्या पेशींचा अभ्यास करण्यात आला.

### डोळ्यांचं आरोग्य

**डोळे सुजतात?**



कॉम्प्युटर व्हिजन सड्रोममुळे डोळ्यांवर परिणाम होतोच, शिवाय आपली उत्पादकताही कमी होऊ लागते. सध्याच्या काळात आपली नजर कॉम्प्युटर, लॅपटॉप कवा स्मार्टफोनच्या स्क्रीनवर अधिक काळ खिळलेली असते. याच कारणामुळे जगभरातल्या ६० दशलक्ष लोकांना कॉम्प्युटर व्हिजन सड्रोम जडला आहे. अंधुक दिसणं, डोळे थकणं, मान अवघडणं, सततची डोकेदुखी ही कॉम्प्युटर व्हिजन सड्रोमची लक्षणं आहेत. या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्या. कॉम्प्युटर व्हिजन सड्रोमचे बरेच दुष्परिणाम आहेत. त्यामुळे तातडीने उपचार घेणं गरजेचं आहे.

### जपणूक त्वचेची

**लाभ मॉईश्चरायजरचे**

तेलकट त्वचेवर मॉईश्चरायजर लावणं गरजेचं असतं का, असा प्रश्न अगदी सहज उपस्थित होतो. मात्र प्रत्येक प्रकारच्या त्वचेला मॉईश्चरायजरची गरज असते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. त्वचा कोरडी पडल्यास बरेच आजार होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी मॉईश्चरायजरचा वापर करायला हवा. मॉईश्चरायजरमुळे त्वचेतला ओलावा टिकून राहतो. त्वचेला थेट पाणी मिळतं. त्वचा मुलायम राहते. मॉईश्चरायजरमुळे त्वचेवर मऊ थर तयार होतो. त्यामुळे त्याचा वापर करायला हवा.



### आजीबाईचा बटवा

**बेदाणे भिजवलेलं पाणी प्यायल्याने...**



बेदाणे भिजवलेलं पाणी आरोग्यासाठी खूप लाभदायी आहे. सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी बेदाणे भिजवलेलं पाणी प्यायला हवं. या पाण्यात बरेच पोषक घटक आणि जीवनसत्त्वं असतात. या पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातले विषारी घटक बाहेर टाकले जातात. साधारण आठवडाभर या पाण्याचं सेवन करत राहिल्यामुळे हृदयाचं आरोग्य सुधारतं. यासोबतच यकृतही स्वच्छ होतं. तसंच त्याची कार्यक्षमताही वाढते. यासाठी दोन कप पाण्यात १५० ग्रॅम बेदाणे भिजवून ठेवा. बेदाणे भिजवण्याआधी पाणी उकळून घ्या. बेदाणे रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी पाणी गाळून घ्या.

## आठ महिन्यांत ११८३ शेतकरी आत्महत्या...
# तरीही सरकार शांत!



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :**
शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी महायुती सरकारने दिलेली आश्वासने केवळ धुळीत मिळाल्याचं आता उघड होत आहे. गेल्या आठ महिन्यांत तब्बल ११८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप विरोधकांनी केला असून, हे आकडे सरकारच्या असंवेदनशीलतेचं प्रमाण मानलं जात आहे.

काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी आकडेवारी जाहीर करत सरकारवर थेट हल्लाबोल केला. त्यांच्या मते, पश्चिम विदर्भात ७०७ आणि छत्रपती संभाजीनगर विभागात ५२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सत्तेसाठी महायुती सरकारने कर्जमाफीचं खोटं स्वप्न दाखवलं. शेतकऱ्यांना मदत न देता केवळ समित्या नेमण्यात आल्या. पण शेतकऱ्यांच्या हातात आलं काय? फक्त रिकाम्या आश्वासनांचं ओझं! अशी टीका त्यांनी केली.

अतिवृष्टीने पिकं उध्वस्त झाली, बँका कर्ज देत नाहीत, हातात काहीच राहिलं नाही म्हणून हतबल शेतकरी टोकाचं पाऊल उचलत आहेत.कृषी खात्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा होण्याऐवजी कर्मचाऱ्यांना टॅब द्यायचे की लॅपटॉप? या विषयावरून वाद सुरू आहेत, ही बाब विरोधकांनी चीड आणणारी असल्याचं म्हटलं. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी तेच जबाबदार आहे, असे ते म्हणाले.

# ओबीसींच्या मागण्यापूर्तीचा जीआर महिनाभरात

## मंत्री अतुल सावे यांचे राष्ट्रीय ओबीसी महासंघाला आश्वासन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर / मुंबई, दि. १० :**
ओबीसी समाजाच्या बारा मागण्याचे निवेदन ओबीसी मंत्रिमंडळ उपसमिती ठेऊन शासन निर्णय महिनाभरात काढू, असे आश्वासन ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले आहे.

मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यात येऊ नये या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाने नागपुरातील संविधान चौकात सहा दिवस साखळी उपोषण केले होते. हे उपोषण सोडविताना सावे यांनी बैठकीत मागण्यांवर चर्चा करण्याचे आश्वासन दिले होते. या पार्श्वभूमीवर मुंबईच्या मलबार हिलमधील सह्याद्री शासकीय विश्रामगृहावर ही बैठक झाली.

या बैठकीला आमदार परिणय फुके, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजूरकर, अशोक जीवतोडे, प्रा. शेषराव येलेकर, शरद वानखेडे प्रदेशाध्यक्ष प्रकाश भागरथ, महिला महासंघाच्या ज्योती ढाकणे, गुणेश्वर आरिकर, सुभाष घाटे, परमेश्वर राऊत, शकील पटेल, सूरज बेलोकर, अंतरवालि सराटीचे उपोषणकर्ते बाळासाहेब दाखने बाबासाहेब बटुळे, श्रीहरी निर्मळ यांच्यासह सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए. बी. धुळाज व इतर विभागाचे सचिव उपस्थित होते.



सावे यांनी मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येणार नाही, मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थीसंख्या दोनशे करणार, महाज्योतीला १ हजार कोटी रुपयांची तरतूद करणार, म्हाडा व सिडकोच्या घरकुल योजनेत ओबीसी संवर्गाकरिता आरक्षण लागू करणार. व्हीजेएनटी, एसबीसी आर्थिक विकास महामंडळार्फत असलेली थेट कर्ज योजनेची मयार्दा १५ लाख रुपये तसेच गहाण खतामध्ये फक्त शेतीची अट शिथील करणार असल्याचेही सावे यांनी सांगितले.

शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळ, अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ या धर्तीवर इतर मागास आर्थिक विकास महामंडळाला ॲड. जनार्दन पाटील ओबीसी आर्थिक विकास महामंडळ असे नाव देणार, प्रत्येक शहर व तालुकास्तरावर ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करणार, डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी समाजसेवक पुरस्कार जाहीर करणार, अनुसूचित जाती-जमातीप्रमाणे ओबीसी शेतकऱ्यांना शंभर टक्के सवलतीवर योजना, ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी रुपयांची तरतूद व महामंडळाच्या सर्व मंजूर योजना त्वरित सुरू करणार आणि तीन वर्षांपासून प्रलंबित फेलोशिप त्वरित अदा करण्याचे आश्वासनही सावे यांनी दिले.

ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी ही माहिती दिली.

**शिष्यवृत्ती, नुकसान भरपाईचा विषय कॅबिनेटमध्ये**

ओबीसी मुलांना व्यावसायिक अभ्यासक्रमात शंभर टक्के शिष्यवृत्ती आणि अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाईचा विषय कॅबिटेनटमध्ये मंजुरी घेऊन मार्गी लावू असेही सांगितले. याप्रसंगी ओबीसी महासंघाचे राज्यातील अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## समृद्धी महामार्गावर विशिष्ट प्रकारचे खिळे



■ **महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. १० :**
समृद्धी महामार्ग पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. अधूनमधून अपघातांच्या बातम्यांमुळे कायम वादग्रस्त ठरणाऱ्या या महामार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास एक धक्कादायक प्रकार घडला.

नागपूरकडून मुंबईच्या दिशेने निघालेल्या अनेक वाहनांचे टायर अचानक पंक्चर झाले. गाड्या थांबवून तपासणी केल्यानंतर असे दिसून आले की ब्रिजवर मोठ्या प्रमाणावर विशिष्ट प्रकारचे खिळे ठोकलेले आहेत. ही बाब उघड होताच प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि महामार्गावर गोंधळ उडाला.

सुरुवातीला लोकांना वाटले की चोरट्यांनी हा डाव रचला असावा. वाहनांचे टायर पंक्चर करून लुटमारी करण्यासाठीच हे खिळे ठोकले असावेत, अशी चर्चा प्रवाशांमध्ये होती. मात्र नंतर प्रत्यक्ष परिस्थिती समोर आली आणि धक्कादायक बाब उघड झाली. रस्त्याचं काम करणाऱ्या कंपनीनेच हे खिळे ठोकले होते. महामार्गावरील दुरुस्तीच्या कामासाठी हे खिळे ठोकण्यात आले होते, परंतु नागरिकांना पूर्वसूचना न देणे, तसेच आवश्यक बॅरिगेटिंग न करणे ही गंभीर बेपर्वाई असल्याचे स्पष्ट झाले.

या घटनेनंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. जर रस्त्याचं काम सुरू होतं, तर तेथील बॅरिगेटिंग का करण्यात आलं नाही? गाड्यांचे टायर पंक्चर झाल्यानंतर हे खिळे रात्रीतूनच काढून टाकण्यात आले, मग दिवसा हा प्रकार टाळता आला नसता का?

गाड्या पंक्चर झाल्यामुळे प्रवाशांना रात्रीतून नाहक मनस्ताप सहन करावा लागला. त्याहून गंभीर बाब म्हणजे या खिळ्यांमुळे एखाद्या गाडीचा ताबा सुटून मोठा अपघात घडला असता, तर जबाबदार कोण ठरणार होता? या घटनेमुळे समृद्धी महामार्गाच्या सुरक्षिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

## मराठा समाजाला बोगस सर्टिफिकेट देता कामा नये

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :**
मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाच्या संदर्भातील ८ मागण्यांपैकी ६ मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. सरकारने हैदराबाद गॅझेट नुसार शासन निर्णय जारी करत मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात आले. यावर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करत आज त्याची बैठक देखील पार पडली. ही बैठक महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



या बैठकीत मंत्री छगन भुजबळ आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. तसेच मंत्री पंकजा मुंडे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत म्हटले की, मराठा समाजाला बोगस सर्टिफिकेट दिले जाऊ नये यासाठी आम्ही ठाम भूमिका घेतलेली आहे. तर सरकारने काढलेल्या जीआरमधील मराठा शब्दावर आक्षेप घेत भुजबळ यांनी आपली भूमिका मांडली. मराठा समाजासाठी काढलेल्या जीआरमुळे ओबीसीला फटका बसतोय, असे भुजबळ यांनी स्पष्टपणे सांगितले.

पंकजा मुंडे म्हणाल्या, बैठकीत आमची विस्तृत चर्चा झाली. त्यामध्ये, ओबीसी हिताच्या बाबतीत निर्णय झाले आहेत. जागृतपणे निर्णय होत आलेले आहेत, ओबीसींमध्ये अनेक जाती आहेत, मिळणारे लाभ योजना, निधी यावर चर्चा झाली. तसेच, मराठा आरक्षणामुळे ओबीसींवर अन्याय होणार नाही, याचीही चर्चा झाल्याचे मुंडे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, पुढच्या बैठकीत कोणते निर्णय घेतले पाहिजे, निधी संदर्भात अन्याय झाला नाही पाहिजे यासंदर्भात बैठकीत चर्चा झाली. राज्यात गेली अनेक दशकं मराठा आरक्षणाचा विषय सुरू आहे, आणखी लोक ओबीसीत घेण्याचे स्वागत होत नाही.

मात्र, कुणबी नोंदणीसंदर्भात आमचे कोणतेही म्हणणे नाही. मात्र, अवैद्य नोंदी दिल्या जाऊ नये, यासंदर्भात श्वेतपत्रिका काढावी. तर, मराठा समाजाला बोगस सर्टिफिकेट दिले जाऊ नये यासाठी आम्ही ठाम भूमिका घेतलेली आहे.

छगन भुजबळ नाराज आहेत असे म्हणता येणार नाही, त्यांचे अनुभवांचे बोल आहेत. त्याला नाराजी म्हणता येणार नाही. पण अवैद्य दाखले दिले गेले तर आमच्या अधिकारावर गदा येईल, असे मुंडे यांनी म्हटले आहे.

## स्विमसूट किलरला हरवणारा
# इन्स्पेक्टर झेंडे नेटफ्लिक्सवर



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**

पुणे जिल्ह्याच्या झेंडेवाडी या लहानशा गावातून उपनिरीक्षक पदावर पोलीस दलात रूजू झालेले झेंडे यांच्या कर्तबगारीवर आधारीत इन्स्पेक्टर झेंडे हा चित्रपट ५ सप्टेंबरपासून नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे. इन्स्पेक्टर झेंडे यांची भूमिका बॉलिवूडचे प्रसिद्ध कलाकार मनोज वाजपेयी यांनी साकारली असून चिन्यम मंडलेकर यांनी हा चित्रपट दिग्दर्शीत केला आहे यासंदर्भात **महासागर वृत्तपत्र समुहातील नागपूर पोस्ट या इंग्रजी दैनिकाच्या सहयोगी संपादक ममता चांडक** यांनी मुंबई येथे मनोज वाजपेयी, चिन्यम मंडलेकर यांची मुलाखत घेतली.




स्विमसूट किलर कार्ल भोजराज याला मोठ्या शिताफीने व चतुराईने पकडणाऱ्या एका हुशार व चातुर्यपूर्ण इन्स्पेक्टर झेंडे या पात्रावर आधारित सत्य कथा इन्स्पेक्टर झेंडे ५ सप्टेंबर पासून नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे. विनोद आणि थरार याचा संगम असलेल्या या कथेत इन्स्पेक्टर झेंडेची दमदार भूमिका प्रख्यात अभिनेते मनोज वाजपेयी यांनी साकारली आहे.

सत्य घटनेवर आधारित, इन्स्पेक्टर झेंडे ही कथा चिन्मय मांडलेकर यांनी लिहिलेली व दिग्दर्शित केलेली असून, जय शेवक्रमाणी आणि ओम राऊत यांनी या चित्रपटची निर्मिती केली आहे.

इन्स्पेक्टर झेंडे (मनोज वाजपेयी) हा हुशार, चातुर्यपूर्ण पोलिस अधिकारी, 'स्विमसूट किलर' कार्ल भोजराज (जिम सर्भ) याला एकदा नव्हे तर दोन वेळा पकडतो. शेवटपर्यंत प्रेक्षकांना खेळवून ठेवणारा हा चित्रपट वर्दीतील एका कथेची खरी कहाणी उलगडतो. चित्रपटात दिग्गज कलाकार सचिन खेडेकर, भालचंद्र कदम, हरीश दुधाडे, ओंकार राऊत, भरत सवाळे, नितीन भजन, झेंडेंची विश्वासू टीम म्हणून. तर गिरिजा ओक, वैभव मांगले महत्त्वाच्या भूमिकेत दिसतात.

त्यांची मैत्री आणि विनोदी संवाद या पाठलागाला जितका थरारक बनवतात तितकाच मनोरंजकही. ही शर्यत विविध शहरांतून जात गोव्यापर्यंत पोहोचते, जिथे तीव्र बुध्दिमत्ता आणि टीमवर्कमुळे कार्लचा नाट्यमय शेवट होतो. विनोद, धैर्य आणि इतिहासाची सांगड घालणारा हा चित्रपट फक्त नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे. नॉर्दर्न लाईट्स फिल्म्सची निर्मिती आहे.

चिन्मय डी. मांडलेकर यांचे यशस्वी दिग्दर्शन असून मुख्य कलाकार मनोज वाजपेयी आहेत. अन्य कलाकारांमध्ये जिम सर्भ, भालचंद्र कदम, सचिन खेडेकर, गिरिजा ओक आणि हरीश दुधाडे यांचा समावेश आहे.

इन्सपेक्टर झेंडे यांच्यावर चित्रपट बनवावा, असे तुम्हाला का सुचले? या प्रश्नावर चिन्मय मंडलेकर सांगतात, झेंडे सर पीएसआय म्हणून दलात रूजू झालेत . पुढे पोलीस निरीक्षक झाले . मुंबईच्या आग्रीपाडा पोलीस स्टेशनचे ते इंचार्ज असताना विविध प्रकरणात त्यांनी बजावलेल्या कामगिरीमुळे ते प्रसिद्धीच्या झोतात आले . पोलीस दलातील एका प्रामाणिक आणि कर्तव्यतत्पर अधिकाऱ्याने प्रभावित केल्याने त्यांच्यावर हा चित्रपट तयार केल्याचे मंडलेकर सांगतात.

या भूमिकेसह झेंडेविषयी सांगताना मनोज वाजपेयी म्हणाले, मुंबईच्या पायधूनी पोलीस ठाण्यात ते कार्यरत असताना १९९३ मध्ये दंगे उसळले . तीनचारशेच्या जमावाने ठाण्याला घेराव घातला. त्यावेळी झेंडे यांनी त्यांच्या सहकारी पोलीस कर्मचाऱ्यांना सुखरूप बाहेर काढले . राजीव गांधी प्रधानमंत्री असताना मुंबईला आले होते. त्यावेळी आपला ताफा थांबवून त्यांनी झेंडे यांचेशी हस्तांदोलन केले होते. झेंडे पुढे एसीपी म्हणून निवृत्त झाले. या माणसाने कधीही स्वतःला कायद्याच्या वर जावू दिले नाही, त्यांचे पाय जमिनीवरच राहिले, असे मनोज आवर्जून म्हणाले.

मनोज वाजपेयी यांनी इन्सपेक्टर झेंडेची भूमिका साकारताना आपले सर्व कौशल्य पणाला लावले असून, चिन्मय मंडलेकर यांच्या दिग्दर्शानात हा एक थरारक चित्रपट तयार झाला आहे, जो फक्त नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे.

## अनाथ मुलांसाठी काम करते 'साकार' संस्था

**लोकजागर**

कधी वंशाचा दिवा हवा म्हणून, तर कधी अनैतिक संबंधांचे परिणाम लपवण्यासाठी, काही निर्दयी जन्मदात्यांनी पोटच्या गोळ्याला रस्त्यावर सोडून दिल्याच्या बातम्या वाचून मन सुन्न होते.

अशा घटनांवर आपण दुःख व्यक्त करतो, रागही येतो, पण काही काळाने त्या घटना विसरल्या जातात. मात्र, या वंचित चिमुकल्यांना उब देण्याचं कार्य १९९४ पासून छत्रपती संभाजीनगरमधील 'साकार' ही सामाजिक संस्था करत आहे.साकार ही संस्था ज्योती नगरमध्ये कार्यरत असून, रस्त्यावर टाकलेल्या किंवा अनाथ बालकांना घर आणि मायेची ऊब देते. ० ते ६ वयाच्या लहान बालकांना सांभाळण्याची जबाबदारी ही संस्था पेलते. २० बालकांना सामावून घेण्याची क्षमता असलेल्या या संस्थेत, १० बालकांचा खर्च शासन करतं, तर उर्वरित १० बालकांचा खर्च संस्था स्वतः उचलते.



१९९४ पासून आजपर्यंत साकारने ५८५ बालकांना आधार दिला आहे. त्यापैकी ४२५ बालकांचं पुनर्वसन यशस्वीपणे करण्यात आलं आहे. यात १८६ मुलं आणि २३५ मुलींचा समावेश आहे. विशेष म्हणजे, काही मुलांचं पुनर्वसन परदेशातही झालं आहे. स्पेशल चाइल्ड असणाऱ्या मुलांना परदेशात स्वीकारलं गेलं आहे, हे या संस्थेचं मोठं यश आहे.

या संस्थेत मुलांना दत्तक देण्याची प्रक्रिया अतिशय नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने केली जाते. साकारच्या अध्यक्षा, डॉ. नीलिमा पांडे म्हणतात, आम्हाला चांगले आणि वाईट असे दोन्ही अनुभव आले आहेत. पण मुलांना नवीन आयुष्य देण्याचा जो आनंद आहे, तो शब्दात मांडता येणार नाही.

साकारचं काम फक्त मुलांना सुरक्षित वातावरण देण्यापुरतं मर्यादित नाही. ती या मुलांचं संपूर्ण पुनर्वसन करत, त्यांना समाजात चांगलं आयुष्य मिळवून देण्याचा प्रयत्न करते. अशा संस्थेमुळेच वंचित बालकांचं आयुष्य एका चांगल्या दिशेला जातंय, हे नक्की.

■ ■ ■

## : शून्यातून विश्व :
## महिलांसाठीची उद्योग मैत्रीण



महिलांनी स्वावलंबी व आत्मनिर्भर व्हावे, महिलांचा उद्योजकीय विकास आणि सर्वांगिण उन्नतीसाठी उद्योगमैत्रीण हे मासिक सारिका भोईटे-पवार १४ वर्षांपासून प्रसिद्ध करतात. लघुउद्योगांच्या विविध संधी, उद्योगाच्या विविध योजना, यशस्वी उद्योजकांच्या यशोगाथा अशी माहिती मासिकामध्ये असते. हे मासिक नवीन उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी माहितीच कियॉस्क आहे.

बहुतांश बाजारात स्त्रीविषयक मासिके फॅशन, ट्रेंड, कल्चर, रेसिपीवर फोकस करणारी असतात. त्यामुळे आधुनिक स्त्रीच्या गरजेप्रमाणे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा चौफेर विचार करणारे आजच्या करिअर वुमनला आपलेसे वाटेल असे आणि प्रामुख्याने स्त्रियांना उद्योग सुरू करण्यास उद्युक्त करणारे मासिक सुरू करणे हे धाडसच होत. पण, सारिका यांचा निश्चय ठाम होता.

आजची स्त्री सजग आहे. तिचे विश्व रांगोळी आणि मेहंदी पलीकडे जाऊन पोहोचले आहे, हे प्रभावीपणे मांडण्याची भूमिका मासिकाच्या माध्यमातून नक्कीच मांडली जाऊ शकते, हे त्यांनी हेरले आणि उद्योगविषयक मार्गदर्शनपर उद्योगमैत्रीणचा श्रीगणेशा २००६ साली झाला. उद्योगमैत्रीणच्या माध्यमातून आधुनिक उद्योग, लघुउद्योग, उद्योगनिर्मिती, उद्योग मार्गदर्शन, धडाडीचे उद्योजक, गाथा कर्तृत्वाची गाथा महाराष्ट्राची असे अनेक विशेषांक प्रसिद्ध केले आणि हे विशेषांक वाचकांच्या पसंतीस पडले.

उद्योगमैत्रीणच्या मासिकाचा पसारा केवळ ठाणे, मुंबईपुरता मर्यादित न ठेवता नाशिक, सांगली, पुणे, सातारा व महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये त्याच्या वितरणावर भर दिला. विविध उद्योगांच्या संधी,यशोगाथा अशांनी भरगच्च असेला अंक अल्पावधीतच वाचकांच्या पसंतीस पडू लागला.

त्यांचे वडील मुळात उद्योजक. वडिलांच्या व्यवसायात त्यांचा सहभाग महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच झाला. कार्यालय व्यवस्थापन, उद्योगातील बारकावे, खाचखळगे, ग्राहकांचे स्नेहसंबंध आणि उद्योजकीय ठोकताळे या वडिलांच्या करड्या शिस्तीत शिकल्या.

बी. कॉमची पदवी, त्यानंतर जोडीला एमबीए इन फायनान्स, पत्रकारितेसाठी मास कम्युनिकेशन आणि जर्नालिझमचे तसेच कायद्याचे शिक्षण त्यांनी घेतले. जर्नालिझम करत असतानाच वर्तमानपत्रात स्त्री उद्योजकता, करिअरविषयक लिखाणाला सुरुवात केली. उद्योगमैत्रीण मासिकाची निर्मिती एवढ्यावरच न थांबता उद्योगमैत्रीण मार्गदर्शन आणि प्रशिक्षण संस्थेची स्थापना २००७ साली केली आणि या संस्थेमार्फत विविध प्रकारच्या व्यावसायिक मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन त्या करतात.

केवळ व्यावसायिक मार्गदर्शनच नव्हे, तर प्रशिक्षण शिबिरांमध्ये प्लास्टिक इंडस्ट्री, पेपर इंडस्ट्री, ज्वेलर्स इंडस्ट्री, सर्व्हिस सेक्टरविषयक विविध तज्ज्ञ मार्गदर्शकांमार्फत त्यांनी दोन-तीन महिन्यांचे प्रशिक्षण शिबिरेसुद्धा आयोजित केली. उद्योगमैत्रीण संस्थेमार्फत सुरू केलेल्या प्रशिक्षण केंद्रांमार्फत अनेक महिलांनी छोट्या स्तरावर आपले उद्योग सुरू केले आणि त्यांना सातत्याने मार्गदर्शन आणि पाठबळ संस्थेमार्फत देण्यात आले. त्यामुळे स्त्रियांचा उत्साह वाढू लागला. उद्योगात छोटी-छोटी उत्पादने सुरू होऊ लागली, पण उत्पादनांची विक्री कुठे करायची हा यक्षप्रश्न स्त्रीउद्योजकांना भेडसावणारा असतो, हे लक्षात घेऊन महिला उद्योजकांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी विक्री प्रदर्शनांचे आयोजनही करण्यात येते.

पहिल्या प्रदर्शनाचा अनुभव सांगताना सारिका भोईटे सांगतात, पहिलवहिलं स्त्री उद्योजकांच्या उत्पादनांचे विक्री प्रदर्शन उद्योगमैत्रीणची उद्योग-व्यापार पेठ असं होत. या प्रदर्शनात जवळजवळ ७५ स्त्रीउद्योजिका सहभागी झाल्या होत्या आणि पाच दिवसांच्या या प्रदर्शनांमध्ये स्त्रियांच्या उत्पादनांची छान विक्री झाली आणि नवउद्योजकींच्या उमेदीचं बळ वाढत गेले.

आज सारिका भोईटे-पवार ठाणे येथून स्त्रीउद्योजकांना मार्गदर्शनपर बिझनेस काऊन्सिलिंग सेंटर चालवतात. या सेंटरचा मूळ उद्देश नव्याने उद्योगात येऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांना उद्योग सुरू करण्यापासून ते मार्केटिंगपर्यंतचे दर्शन करणे. स्त्रीउद्योजकांसाठी शासनाच्या, बँकांच्या अनेक योजना आहेत. परंतु, कित्येकवेळा या योजनांची माहिती स्त्रियांना नसते. अशा सर्वांची माहिती केंद्रामार्फत दिली जाते.

केवळ मुंबईतूनच नव्हे तर नाशिक, पुणे, कोल्हापूर, सातारा अशा ठिकाणांहून स्त्रिया दूरध्वनीवरून संपर्क साधून विशिष्ट दिवशी ठाणे येथे मार्गदर्शनासाठी येतात. उद्योग-व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात नवउद्योजकांपुढे अनेक अडचणी असतात. मुळात नेमका कोणता उद्योग निवडावा इथपासून कच्चा माल कुठे मिळेल, तयार मालाची विक्री कशी करावी, यंत्रसामग्री कुठे मिळेल, शासकीय नियम वगैरे साठी एक छोटा अभ्यासक्रम त्यांनी तयार केला. स्टार्टअप्स उद्योजकांना ब्रॅण्डिंगविषयी त्या मार्गदर्शन करतात.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## मन्नेरवारलू वगळून कोलावार दुरुस्ती करा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :**
राज्यात मराठा, बंजारा आणि महादेव कोळी समाज आरक्षणाच्या मुद्द्यावर आक्रमक झालेले असतानाच, आता आदिवासी समाजानेही आवाज उठवला आहे.

अनुसूचित जमातींच्या याद्यांमधील त्रुटी दुरुस्त करून आंध्र प्रदेशच्या धर्तीवर मन्नेरवारलू जमातीचा उल्लेख रद्द करावा. त्याऐवजी कोलावार दुरुस्ती करावी, अशी मागणी आदिवासी संघटनेच्या ट्रायबल फोरमने राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व आदिवासी विकास मंत्र्यांकडे केली आहे.

राज्यातील आदिवासींचे नुकसान टाळण्यासाठी राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत आंध्र प्रदेशच्या धर्तीवर दुरुस्ती करून सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी ट्रायबल फोरम संघटनेने केली असून, तसे निवेदन मुख्यमंत्र्यांसह अधिकाऱ्यांना दिले आहे.

## प्रज्ञा ठाकूरसह ७ जणांच्या सुटकेला
# न्यायालयात आव्हान



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :**
मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सर्व ७ जणांच्या सुटकेला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. एनआयए न्यायालयाने ३१ जुलै रोजी या सर्वांना निर्दोष ठरवले होते. त्या निकालाविरोधात स्फोटातील मृतांच्या कुटुंबातील ६ सदस्यांनी न्यायालयात धाव घेतली आहे.

निसार अहमद सय्यद बिलाल आणि इतर ५ जणांनी त्यांचे वकील मतीन शेख यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सात आरोपींना निर्दोष सोडण्याचा एनआयए न्यायालयाने दिलेला आदेश चुकीचा आणि कायद्याने वाईट होता आणि म्हणूनच तो रद्द करावा, अशी मागणी याचिकेतून केली आहे. दोषपूर्ण तपास किंवा तपासातील काही त्रुटी आरोपींना निर्दोष सोडण्याचे कारण असू शकत नाहीत, असा दावा पीडितांनी केला आहे.

# फडणवीसांच्या विश्वासू नेत्याचा राजसंन्यास
## मोहित कंबोज यांचा सक्रिय राजकारणाला रामराम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू तथा भाजपचे उदयोन्मुख नेते मोहित कंबोज यांनी वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी सक्रिय राजकारणातून संन्यास घेतला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे भाजपमधील अनेकांना धक्का बसला आहे. एका इंग्रजी वृत्तपत्राच्या वृत्तानुसार, मोहित कंबोज यांनी सक्रिय राजकारण सोडले आहे. त्यांनी स्वतःच याची पुष्टी केली आहे.



मोहित कंबोज सध्या भाजपचे सदस्य आहेत. पण मागील ६ महिन्यांपासून ते जाणीवपूर्वक सक्रिय राजकारणापासून लांब आहेत. त्यांची आता त्यांच्या व्यवसायाला अधिक वेळ देण्याची इच्छा आहे, असे त्यांनी या वृत्तपत्राशी बोलताना सांगितले आहे.

मोहित कंबोज हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय आहेत. ते इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनचे अध्यक्षही आहेत. ते मूळचे उत्तर प्रदेशातील वाराणसीचे रहिवासी आहेत. पण २००२ मध्ये त्यांनी मुंबईत स्थलांतर केले. त्यानंतर व्यवसायाच्या माध्यमातून अल्पावधीतच त्यांनी तिथे जम बसवला.

त्यांनी भाजपचे सदस्यत्व स्वीकारले आणि राष्ट्रीय पातळीवर आपला प्रभाव पाडला. भाजपने २०१३ मध्ये त्यांच्याकडे मुंबई शहर भाजपचे उपाध्यक्ष दिले. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना दिंडोशी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. पण शिवसेनेचे सुनील प्रभू यांनी त्यांचा पराभव केला.

या निवडणुकीत मोहित कंबोज हे भाजपचे सर्वात श्रीमंत उमेदवार होते. त्यांनी निवडणूक आयोगाकडे दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात तब्बल ३५३.५३ कोटी रुपयांची मालमत्ता घोषित केली होती. पण आता त्यांनी अचानक सक्रिय राजकारणातून संन्यास घेतल्यामुळे भाजपासह सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ गुरूवार, दि. ११ सप्टेंबर २०२५ ■

## महामेट्रोचा डिजीटल प्रवास : ५७ % तिकीट विक्री ऑनलाइन

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :



मंगळवार ९ सप्टेंबर २०२५ रोजी, नागपूर मेट्रोच्या प्रवाशांपैकी तब्बल ४७ हजार प्रवाशांनी महाकार्ड वापरून प्रवास केला, जो आतापर्यंतचा महाकार्डद्वारे झालेला प्रवास आहे. त्यामुळे एका विक्रमा नोंद झाली आहे. जास्तीत जास्त प्रवाशांकडून तिकीट खरेदीसाठी डिजिटल पेमेन्टसचा वापर हा मेट्रो प्रवाशांचा डिजीटल कल दर्शवतो. महाकार्डच्या विक्रमी वापरासोबतच डिजिटल व्यवहारांचा टक्का ५७ % पर्यंत पोहोचला असून, ९ सप्टेंबरला एकूण १ लाख १९ हजार ७२ मेट्रो प्रवाशांपैकी सुमारे ६८ हजार ५०० प्रवाशांनी विविध डिजिटल माध्यमांचा वापर करून तिकीट काढले. यामध्ये सुमारे ९००० व्हॉट्सअ‍ॅप तिकीट वापरकर्ते आणि १४५०० यूपीआय (युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस) वापरकर्त्यांचा समावेश आहे.

## नेपाळ हिंसाचारात षडयंत्र?



### श्री श्री रविशंकर यांची शंका

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने प्राचीन सोमनाथ ज्योतिर्लिंग महारुद्र पूजा आणि गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या उपस्थितीत महा सत्संग नागपुरात आयोजित करण्यात आला आहे. बुधवार १० सप्टेंबरला सायंकाळी हा कार्यक्रम मानकापूर येथील क्रीडा संकुलावर सुरू झालेला आहे.

या कार्यक्रमासाठी श्री श्री रविशंकर नागपुरात आले असता त्यांनी विमानतळावर प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नेपाळमध्ये सुरू असलेल्या हिंसाचारावर दुःख व्यक्त केले. तसेच अनेक शंकाही उपस्थित केल्या. याशिवाय त्यांनी विविध विषयावर माहिती दिली.

विदर्भात शेतकऱ्यांचा आत्महत्या अजूनही सुरू आहेत. शेतकऱ्यांचे आत्मबल क्षीण होत आहे, यापूर्वी अनेक अडचणीतून आपण मार्ग काढला आहे. काही वर्षांपूर्वी ३७० गावागावांत पदयात्रा काढली. १० वर्षांनंतर पुन्हा पदयात्रा काढण्याची वेळ आली आहे, असे मत आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांनी व्यक्त केले. आत्महत्या सारखा निर्णय घेऊ नये, असे आवाहन श्री श्री रविशंकर यांनी केले आहे.

नेपाळच्या लोकांच्या संपर्कात आहे. युवकांमध्ये नैराश्य वाढत चालले आहे, जेव्हा कुठे आंदोलन होते, तेव्हा असामाजिक तत्त्व त्यात घुसतात, यात आंतरराष्ट्रीय षडयंत्रसुद्धा असू शकते, असे ते म्हणाले.

आजपासून ते पुढील तीन दिवस नागपूरच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान ते महारुद्र पूजन, विज्ञान भैरव यांसारख्या शिबिरांमध्ये मार्गदर्शन करणार आहेत.

श्री श्री रविशंकर सोमनाथ ज्योतिर्लिंगचे महारुद्र पूजन करणार आहेत. ते सोमनाथ ज्योतिर्लिंगासोबत घेऊन आले आहेत. एक हजार वर्षांपूर्वी सोमनाथ ज्योतिर्लिंग उद्धवस्त झाले होते, त्याची पिंड लोक दक्षिण भारतात घेऊन गेलेले होते, ते पिंड आज नागपूरला आणण्यात आलेला आहे. सर्वसामान्य नागरिकांना सोमनाथ ज्योतिर्लिंगचे दर्शन घेता येईल. आध्यात्मिक मार्गावर चाला, ईश्वरावर विश्वास ठेवा, असे ते म्हणाले.

## जनसुरक्षा विधेयकाविरोधात काँग्रेस रस्त्यावर



महात्मा गांधींच्या पुतळ्याजवळ महाविकास आघाडीची निदर्शने

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

शहर (जिल्हा) काँग्रेस तर्फे आज महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयकाविरोधात गांधी पुतळा, व्हेरायटी चौक येथे आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा आमदार विकास ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. काँग्रेसच्या मित्रपक्ष नेते व कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) व शिवसेना (उबाठा) यांचीही उपस्थिती होती.

काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयकाला लोकशाही व संविधानावर घालाद्ध ठरवत जोरदार घोषणाबाजी केली. विधेयक तात्काळ मागे घेण्याची मागणी आंदोलनातून एकमुखाने करण्यात आली. जनतेचे हक्क हिरावून घेणाऱ्या कायद्याविरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरेल, असा इशारा देण्यात आला.

या आंदोलनात आमदार अ‍ॅड. अभिजीत वंजारी, किशोर कन्हेरे, माजी नगरसेवक दुनेश्वर पेठे, प्रशांत धवड, संजय महाकाळकर प्रा. दिनेश बानाबाकोडे, माजी मंत्री, आमदार, माजी आमदार, प्रदेश पदाधिकारी, प्रदेश सेल प्रमुख, शहर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, सर्व ब्लॉक अध्यक्ष, माजी नगरसेवक, महापालिका इच्छुक उमेदवार तसेच महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, सेवादल काँग्रेस, फ्रंटल संघटना व विविध सेलचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आजचे आंदोलन ही फक्त सुरुवात असून काँग्रेस पक्ष राज्यभर या विधेयकाविरोधात तीव्र लढा उभारणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक हा लोकशाहीला गाडणारा निर्णय आहे. हे विधेयक लोकशाही विरोधी व जनतेच्या हक्कांवर गदा आणणारे असून काँग्रेस कधीही असे धोरण सहन करणार नाही. जनतेचे हक्क आणि लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरलो आहोत आणि हा लढा अधिक तीव्र करू, असे आमदार विकास ठाकरे म्हणाले.

भारतीय जनता पक्ष युती सरकारने शहरी नक्षलवादाचा बीमोड करण्याच्या नावाखाली आणलेल्या जनसुरक्षा विधेयकाविरोधात काँग्रेस पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या विधेयकाविरोधात काँग्रेस आणि त्यांच्या समविचारी पक्षाने आंदोलन केले.

जनसुरक्षा विधेयक हे हुकूमशाही पद्धतीचे असून सरकार विरोधातील आवाज दडपण्यासाठी या विधेयकाचा एका अस्त्रासारखा वापर केला जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेले कायदे कठोर आहेत, त्यामुळे वेगळ्या कायद्याची गरज नाही पण सरकार अदानीसारख्या भांडवलदारांसाठी काम करत असून त्यांच्याविरोधात कोणीही आंदोलन करू नये, आवाज उठवू नये यासाठी हा कायदा वापरला जाऊ शकतो. या कायद्यानुसार कोणालाही अटक करण्याची, तुरुंगात मध्ये टाकण्याची तसेच संपत्ती जप्त करण्याची तरतूद करण्यात आल्याचे उपस्थित नेत्यांनी सांगितले . या आंदोलनात मविआचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## सोमनाथ ज्योतिर्लिंग आज रामटेकला दर्शनासाठी

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १० :

सोमनाथ मंदिरातील प्राचीन ज्योतिर्लिंग जे हवेत तरंगत होते, त्याला मोहम्मद गजानींनी १०२६ मध्ये नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. त्या ज्योतिर्लिंगच्या अवशेषला अग्निहोत्री पुजारी यांनी ११ लहान शिवलिंगमध्ये रुपांतरित केले. व या शिवलिंगला अभिरक्षक पुजारी सीतारामन शास्त्री यांनी गुरुदेव श्री श्री रविशंकर यांना जानेवारी २०२५ ला दिले.



हे शिवलिंग दर्शनासाठी नागपूरला आणण्यात आले.या शिवलिंगला रामटेकच्या नगरीत देखील दर्शनासाठी ठेवण्यात यावे. अशी विनंती राज्यमंत्री अ‍ॅड. आशिष जयस्वाल यांनी केली. ही विनंती गुरुदेव व आर्ट ऑफ लिव्हिंगनी मान्य केली. त्यामुळे नेहरु मैदानात उद्या दिनांक १२ सप्टेंबर ला सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत उपल्ब्ध राहणार आहे. नागरिकांना लाडू प्रसाद व रुद्राक्ष देखील उपलब्ध करून देणार आहे.

या दुर्लभ ज्योतिर्लिंग चुंबकीय कशी आहे? शास्त्रज्ञांना समजून सांगता येत नाही. व हे शिवलिंग माती, पृथ्वीतील कुठलेही खडक किंवा उल्का पासून तयार नाही. असे भूगर्भ शास्त्रज्ञ, खनिज अन्वेषण विभाग यांनी प्रमाणित केलेले आहे. रामटेक नगरी व परिसरातील नागरिकांना या शिवलिंगच्या दर्शनाचा योग प्राप्त झालेला आहे.

## तरुणाला चाकूसह अटक

■ नागपूर, दि. १० :

कळमना पोलिसांनी गस्तीदरम्यान शस्त्राचा धाक दाखवून परिसरात हैदास घालत असलेल्या एका तरुणाला अटक केली. अरमान कैसर अली शेख (२२) असे आरोपीचे नाव आहे.

कळमना पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान गुलशननगर बोगद्याजवळ आरोपी तरुण शस्त्राचा धाक दाखवून हैदोस घालत असल्याची माहिती पथकाला मिळाली.

त्या आधारे पोलिस परिसरात पोहोचले असता अरमानने तेथून पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. चाकू जप्त करून त्याला ठाण्यात आणले. तो गुन्हा करण्याच्या तयारीने हैदोस घालत असल्याचा संशय पोलिसांना आहे. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

## बेसाचा शौनक राष्ट्रीय अंडर-१३ बुद्धिबळ विजेता

■ महासागर प्रतिनिधी वाडी, दि. १० :

गोवा येथे नुकत्याच संपन्न झालेल्या ३८व्या राष्ट्रीय अंडर-१३ ओपन बुद्धिबळ स्पर्धेत बेसा येथील शौनक धनराज बडोले याने अजिंक्य ठरून विजेतेपद पटकावले.






### जागतिक व आशियाई युवक स्पर्धेसाठी पात्रता

११ फेऱ्यांच्या या स्पर्धेत शौनकने १० गुण मिळवत स्पष्ट आघाडी घेतली. त्याने दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या कर्नाटकच्या उच्च रेटिंगधारक सिद्धांत पूंजा (२२१५) याला एक गुणाने मागे टाकले.

अखेरच्या ११व्या फेरीत शौनकने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना केरळच्या ए. अरूषचा पराभव केला. या विजेतेपदामुळे शौनकला जागतिक व आशियाई युवक बुद्धिबळ स्पर्धेत खेळण्याची संधी मिळाली. एकूण आठ खेळाडूंनी ८.५ गुणांसह स्पर्धा पूर्ण केली.

स्पर्धेच्या प्रवासात शौनकने दहाव्या फेरीत हरियाणाच्या व्योम मल्होत्राला पराभूत केले. त्याआधी त्याने पश्चिम बंगालचा निलाद्री बॅनर्जी, ओडिशाचा आर्यन बेहेरा, केरळचा डॅनियल अजीश, तामिळनाडूचा एम. धार्श, पश्चिम बंगालचा आरोहन डे, राजस्थानचा काव्यांश जैन व गुजरातचा हेरिन रेनिषकुमार पटेल यांच्यावर मात केली.

सहाव्या व सातव्या फेरीत त्याने मध्यप्रदेशचा माधवेंद्र प्रताप शर्मा आणि दिल्लीचा शौर्य चौधरी यांच्याविरुद्ध सामना अनिर्णित राखला.

शौनकच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे नागपूरमधील बेसाचे नाव बुद्धिबळ विश्वात अधिक उज्ज्वल झाले आहे.

शौनकने आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक मुबीत सर, वडील धनराज बडोले, आई किर्ती बडोले, आजोबा व आजी यांना दिले असून, त्याच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## व्यसन पूर्ण करण्यासाठी करायचे चोरी : २ अट्टल चोर जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

तो पूर्णतः व्यसनाच्या आहारी गेला आहे. घरची परिस्थिती जेमतेम आहे. अशात व्यसन पूर्ण करण्यासाठी त्याने चोरीचा मार्ग निवडला. त्याने आपल्यासोबत आणखी एकाला सामील करून घेतले. तो सुद्धा व्यसनाधिन आहे.

दोघेही चोरी करून मिळालेल्या पैशांतून आपले व्यसन पूर्ण करण्यासोबतच मौजमज्जा करीत होते. मात्र गस्तीवर असलेल्या अंबाझरी पोलिसांनी त्यांना विनानंबरच्या वाहनाने फिरताना पकडले. चौकशीत त्यांच्याकडून घरफोडी आणि वाहन चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमालही जप्त केला आहे. सुमित उर्फ भांजा महाविर सुमन (१८) रा. जटाशंकर मंदिरजवळ, सदर असे आरोपीचे नाव आहे. मुख्य आरोपी हा अल्पवयीन असल्याने त्याला सूचनापत्र देऊन सोडण्यात आले.

फिर्यादी सुंदरलाल संकठाप्रसाद तिवारी (४५) यांची दुचाकी अज्ञात आरोपीने चोरून नेली. तक्रारीवरून अंबाझरी पोलिसांनी गुन्हा नोंदविला होता. दरम्यान मंगळवारी दुपारी पोउपनि सतीश मेश्राम हे सहकाऱ्यांसह ठाण्यांतर्गत तेलंगखेडी उद्यान परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान अल्पवयीन आणि भांजा विनानंबरच्या मोटारसायकलने फिरताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबवून वाहनाची कागदपत्रे मागितली असता ती त्यांच्याकडे नव्हती. चौकशी केली असता त्यांनी ते वाहन सुदामनगरीतून चोरी केल्याची माहिती दिली.

दोघांनाही ठाण्यात आणून सखोल चौकशी केली असता त्यांनी वाडी व गिट्टीखदान हद्दित घरफोडी केल्याचीही कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून चोरीच्या वाहनासह एकूण ३९,१८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## संजय गांधी निराधार योजनेची सभा तरोडीला

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. १० :

कामठी तहसील कार्यालयात होणारी संजय गांधी निराधार योजनेची सभा प्रथमच ग्राम पंचायत स्तरावर ग्राम पंचायत तरोडी (बु) येथे आज ११ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजतापासून ५ वाजेपर्यंत होणार आहे. समितीच्या नवनिर्वाचित अध्यक्षा प्रांजळ वाघ यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा घेण्यात येणार आहे.

याकरिता पात्र व्यक्तींनी आवश्यक कागद पत्रांसहित ग्राम पंचायत कार्यालय तरोडी (बु .) येथे उपस्थीत रहावे असे आवाहन कामठीचे तहसिलदार गणेश जगदाळे यांनी संबंधितांना जाहिरपणे आवाहन केले आहे. या करिता १० सप्टेंबरला प्रसिध्दी पत्रक कादले आहे. सभेच्या आदल्या दिवशीच प्रसिद्धी पत्रक काढल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## ७० ग्रॅम सोन्याचे दागिने घरातून चोरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

चोरट्याने दिवसाढवळ्या घरात घुसून कपाटातील ७० ग्रॅम सोन्याचे दागिने चोरी केले. सदर पोलिसांनी प्रिती सतीश मसराम (४७) यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे. दागिन्यांची किंमत २ लाख ८० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

## वानाडोंगरीच्या सर्व प्रभागातील घरांना पट्टे वितरित करा

### तहसीलदार व मुख्याधिकाऱ्यांना काँग्रेसचे निवेदन



■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १० :

वानाडोंगरी नगर परिषद क्षेत्रातील सर्व प्रभागात अतिक्रमण धारकांना पट्टे वितरित करण्याची प्रक्रिया बंद पडल्याने अजूनही शेकडो लाभार्थी वंचित आहेत. शासनाने तात्काळ पुन्हा सर्वांना पट्टे वाटप सुरू करावे अशा आशयाचे निवेदन काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार सचिन कुमावत व वानाडोंगरीचे मुख्याधिकारी राहुल परिहार यांना दिले.

वानाडोंगरी नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र.१ ते १२ मधील काही अतिक्रमण धारकांना २०२४ ला पट्टे वाटप करण्यात आले.मात्र उर्वरीत लोकांना अद्याप त्यांचे मालकी हक्काचे पट्टे मिळाले नाही. या सर्वांना पट्टे वाटपाची प्रक्रिया सुरू करावी अशी मागणी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली असून ही प्रक्रिया तात्काळ सुरु न झाल्यास काँग्रेस कमिटी वानाडोंगरी शहर तर्फे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

शिष्टमंडळात काँग्रेसचे शहराध्यक्ष नितेश भारती, उपाध्यक्ष नवसू गवते, युकाँचे अध्यक्ष ताराचंद डाखळे, उपाध्यक्ष संजय हुरपाटे, महासचिव सुनील जोध, दौलत डांगरे, अनिल भुते, महिला काँग्रेसच्या भावना कुकडे, रामकला धामडे, गिरजा भांगे, प्रियंका ओटी, रीना झाडे, वंदना कुकडे, चांदेकर, कोल्हे, शिंदे, मोटघरे, शेख, रायपुरे, मिश्रा यांचा समावेश होता.

## नवनियुक्त प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांसाठी कार्यपरिचय प्रशिक्षण कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

नागपूर महानगरपालिका व अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संयुक्त विद्यमाने नागपूर महानगरपालिकेत नवनियुक्त झालेल्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांची कार्यपरिचय प्रशिक्षण कार्यशाळा बुधवारपासून सुरू झाली.

मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृह येथे आयोजित कार्यशाळेचे बुधवारी उद्घाटन मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी.,अतिरिक्त आयुक्त श्रीमती विजया बनकर, मुख्य अभियंता मनोज तालेवार, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे विभागीय संचालक जयंत पाठक, मार्गदर्शक डॉ. अविनाश मोहगावकर, अतुल निमदेवकर, मनपाचे विधी अधिकारी प्रकाश बर्डे, सहायक विधी अधिकारी सुरज परोचे प्रामुख्याने उपस्थित होते.




कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी सांगितले की, प्रशिक्षणार्थी असताना ह्याप्रोव्हिजन काळ हा अत्यंत महत्त्वाचा असतो, याच काळात प्रशासकीय बारकावे शिकण्याची उत्तम संधी मिळते. पुढे चालून आपण उत्तरदायी असणार आहोत, याची काळजी घ्यावी, सर्वांनी कामाचा आनंद घेत अभ्यासावर अधिक भर द्या, आवाहन श्रीमती पंत यांनी यावेळी केले. अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांनी कार्यालयातील प्रत्येक व्यक्ती कडून काहीतरी शिकायला मिळते, त्यामुळे सर्वांशी सौहार्दपूर्ण वागणूक ठेवत अधिकाधिक ज्ञान आत्मसात करावे असे आवाहन केले.

अतिरिक्त आयुक्त श्रीमती विजया बनकर यांनी मनपाद्वारे घेण्यात आलेल्या भरती प्रक्रियेची माहिती देत, प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी कामादरम्यान येणाऱ्या अनुभवाचा आणि विवेकपूर्ण ज्ञानाचा उपयोग स्वतःच्या अधिक सक्षम अधिकारी बनण्यासाठी करावा असे आवाहन केले. मुख्य अभियंता मनोज तालेवार यांनी, जन्मपासून ते मृत्यू पर्यंत मनपाचा थेट नागरिकांशी संबंध येत असल्याचे सांगत, आपण ज्या ठिकाणी काम करत आहोत, त्याठिकाणी समर्पण वृत्तीने कार्य करण्याचा सल्ला प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनपाचे जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी केले.

मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षात मनपाच्या सेवेत रुजू झालेल्या कनिष्ठ अभियंता, विद्युत, वृक्ष अधिकारी, कनिष्ठ अभियंता, अभि. सहायक (स्थापत्य) या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांसाठी आयोजित कार्यपरिचय प्रशिक्षण कार्यशाळेत विविध मार्गदर्शकांनी प्रशिक्षणार्थी यांनी प्रोव्हिजन काळात अधिकाऱ्यांनी कसे वागावे, त्यांची कर्तव्ये काय असावे, प्रशासकीय कामकाज प्रभावीपणे कसे हाताळावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# आदिवासीबहुल क्षेत्रातील बेलदा ग्रामपंचायतीला 'तालुका सुंदर गाव' पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. १० :

आर. आर. आबा पाटील सुंदरगाव योजने अंतर्गत २०२४-२५ मधील 'तालुका सुंदर गाव पुरस्कार' सोहळा सोमवारी नागपूर येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात पार पडला.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत घेण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्याला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशीष जयस्वाल, आमदार डॉ. आशीष देशमुख, जिल्हा परिषदेचे विशेष



कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी आमदार टेकचंद सावरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

सदर पुरस्कारासाठी रामटेक तालुक्यातून गट ग्रामपंचायत बेलदाची निवड करण्यात आली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते सरपंच स्नेहा उमेश भांडारकर, सचिव निवृत्ती नेवारे यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

आदिवासीबहुल क्षेत्रातील बेलदा ग्रामपंचायतीचे संपूर्ण नागपूर जिल्ह्यात नाव समोर आले आहे. यावेळी सरपंच स्नेहा भांडारकर यांचे पती तथा कृषी उत्पन्न बाजार समिती रामटेकचे संचालक उमेश भांडारकर यांच्यासह बेलदा गावकरी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# सातगाव ग्रामपंचायत हिंगणा तालुक्यातून अव्वल

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १० :

महाराष्ट्र शासनाच्या सुंदर गाव स्पर्धेमध्ये हिंगणा तालुक्यातून सातगाव वेना ग्रामपंचायत सर्वाधिक गुण मिळवून अव्वल स्थानी आलेली आहे. आर आर (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार स्पर्धेमध्ये सातगाव वेना ग्रामपंचायतला हिंगणा तालुक्यातून सर्वाधिक गुण मिळाल्यामुळे ती अव्वल स्थानी येऊन प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरलेली आहे.

कवी सुरेश भट सभागृह नागपूर येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेमध्ये हा पुरस्कार सातगाव वेना ग्रामपंचायतचे सरपंच योगेश सातपुते व ग्राम



अधिकारी वसंत गोठे यांना प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रामुख्याने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले .... गावाचा सर्वांगीण विकास करणे हेच प्रथम ध्येय समोर ठेवून कामाला सुरुवात केल्यास त्यामध्ये सर्वच शासकीय यंत्रणा व ग्रामस्थ मदत करत असते. आणि याच प्रामाणिक उद्देशाने आम्ही गावाचा विकास आराखडा तयार करून कामे करणे सुरुवात केलेली आहे.

योगेश सातपुते. सरपंच सातगाव(वेना) ग्रामपंचायत.

## टीईटी परिक्षेबाबत सर्वोच्च निकालाच्या विश्लेषणावर चर्चासत्र संपन्न

**नागपूर:** सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ ला, कार्यरत शिक्षकांना टीईटी परिक्षा पास करणे बंधनकारक करण्यात आल्याच्या निर्णयावर महाराष्ट्र माध्य. शिक्षक महासंघाच्या वतीने आज विजुक्ता प्रांतिय महासचिव डॉ.अशोक गव्हाणकर यांचे अध्यक्षतेखाली महिला महाविद्यालय नंदनवन, नागपूर येथे चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात संघटनेचे मार्गदर्शक पुरुषोत्तम पंचभाई यांनी बालकाच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम कायद्यातील केंद्र व राज्य शासनाच्या तरतुदी, टीईटी परिक्षेबाबत सर्वोच्च न्यायालाच्य निकालातील प्रमुख बाबींवर उपस्थितांना अवगत केले.

# जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १० :

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालयात क्षेत्रीय प्रकल्प, समुदाय प्रतिबद्धता प्रकल्प, आणि प्रशिक्षण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयीन वाणिज्य विभागाच्या द्वारे करण्यात आले आणि वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यशाळेचे व वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हिस्लॉप महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. हरिओम पुनियानी यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. नभा कांबळे यांनी केले. कार्यक्रम संयोजक डॉ. नभा कांबळे, सह-संयोजक प्रा. राहुल डोईफोडे, प्रा. सुमित जुनगरी, प्रा. भाग्यश्री चौधरी यांनी या उपक्रमाचे नेतृत्व केले. कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून हिस्लॉप महाविद्यालयाचे वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. हरिओम पुनियानी यांनी क्षेत्रीय प्रकल्प, समुदाय प्रतिबद्धता प्रकल्प, आणि प्रशिक्षण या विषयावर सखोल मार्गदर्शन केले व विविध क्षेत्रामध्ये जाऊन तिथली समस्या ओळखून त्यावर रीतसर अभ्यास कसा करावा, माहिती कशी मिळवावी, आणि त्यावर उपाय काय सुचवायचे आणि सारांश कसा लिहावा याबद्दल सविस्तर माहिती दिली आणि अहवाल कश्या पद्धतीने लिहावा, याचे प्रात्यक्षिक सुद्धा करून दाखविले. त्याच प्रमाणे अनेक औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रामध्ये प्रशिक्षण कश्या पद्धतीने घ्यावे आणि त्याची तयारी कशी करावी याबद्दल सुद्धा सरांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये सिद्धांत आणि व्यवहार यांच्यातील दुवा साधणे, सामाजिक न्याय आणि सर्वांगीण सहभाग मिळवणे, सामाजिक समता आणि सर्वांना सामावून घेणे, नोकरीसाठी विशिष्ट कौशल्ये विकसित करणे, कामगिरी आणि उत्पादकता सुधारणे, सतत शिकण्यास प्रोत्साहन देणे, यांचा समावेश होता. कार्यशाळेला महाविद्यालयातील डॉ. मनीषा भातकुलकर, डॉ. अर्चना देशमुख, डॉ. प्रेमलता कुन्हेकर, डॉ. काशिनाथ मानमोडे, प्रा. राहुल डोईफोडे, प्रा. सुमित जुनगरी, प्रा. भाग्यश्री चौधरी, डॉ. मयुरी देशमुख, डॉ. रेश्मा हिवसे, आकांक्षा बांगर, प्रा. धनराज राठोड, प्रा. वैभव मेंघरे, प्रा. श्रीकांत कैथल आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मयूर विठ्ठल उगेमुगे यांनी पीबीपार्टनर्सच्या सहाय्याने उत्पन्नात केली १.५ पट वाढ

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १० :

पीबीपार्टनर्स हा पॉलिसीबझारचा नवोन्मेषकारी पीओएसपी प्लॅटफॉर्म भारतभरातील समुदायांपर्यंत विमा पोहोचवण्याच्या पद्धतीला नवीन आकार देत आहे. तंत्रज्ञान, प्रशिक्षण व स्थानिक स्तरावरील विश्वास यांची सांगड घालून हा प्लॅटफॉर्म, विमा क्षेत्रात चांगले उत्पन्न मिळवून देणारे करिअर घडवण्याची क्षमता व्यावसायिकांना देतो. नागपूर येथे वाहन विमा सल्लागार म्हणून काम करणारे मयूर विठ्ठल उगेमुगे यांनी पीबीपार्टनर्स प्लॅटफॉर्मवर आले आणि केवळ एका वर्षात त्यांच्या करिअरचा कायापालट झाला. या भागातील अनेकांसाठी ते प्रेरणादायी उदाहरण ठरले.

मयूर केवळ एक वर्षापासून पीबीपार्टनसशी जोडलेले आहेत. तरीही त्यांचा हा प्रवास खऱ्या अर्थाने खूप काही देणारा ठरला आहे. प्लॅटफॉर्मची डिजिटल साधने आणि समर्पित सहाय्य यांमुळे ग्राहकांना सेवा देणे आणि स्थिरपणे व्यवसाय वाढवणे किती सोपे होते याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला आहे.

त्यांच्या मते पीबीपार्टनर्ससोबत टाकलेल्या प्रत्येक पावलाने त्यांना मूल्यवर्धन करून दिले आहे, हे मूल्यवर्धन केवळ उत्पन्नाच्या स्वरूपातील आहे असे नाही, तर आत्मविश्वास तसेच आपल्या समुदायातील लोकांना योग्य विमा उत्पादने घेण्यासाठी मार्गदर्शन करण्याची क्षमता लाभल्याचे समाधान यांच्या स्वरूपातही मिळाल्याचे ते सांगतात. पीबीपार्टनर्सशी जोडले गेल्यानंतर केवळ एका वर्षात मयूर यांच्या उत्पन्नामध्ये मोठी वाढ झाली. या



अनुभवाबद्दल ते सांगतात, ङ्पीबीपार्टनर्स प्लॅटफॉर्मवर आल्यापासून माझे उत्पन्न १.५ पट वाढले आहे आणि ही केवळ सुरुवात आहे. करिअरमध्ये ही प्रगती झाल्यामुळे मला आत्मविश्वास मिळाला आहे, आता मी विमा क्षेत्राकडे दीर्घकालीन, शाश्वत करिअर पर्याय म्हणून बघू लागलो आहे. एका नवीन क्षेत्रात सहज टाकलेले एक पाऊल खूपच लवकर स्थिर झाले आणि त्यातून पैसे मिळवून देणारे करिअर आखले गेले, यातून त्यांची आर्थिक प्रगतीही झाली आणि भविष्यासाठी अधिक मोठे नियोजन करण्याचा आत्मविश्वासही त्यांना प्राप्त झाला.

मयूर त्यांच्या करिअरमधील यशाचे श्रेय प्रामुख्याने त्यांना मिळत असलेल्या मदतीला देतात. ते सांगतात, माझ्या रिलेशनशिप मॅनेजरनी खूप चांगले काम केले आहे.

मला जेव्हा मदतीची गरज भासते, तेव्हा ते ती त्वरित पुरवतात. याबाबत मला एकदाही अडचण आलेली नाही. त्यांच्या मते, खात्रीशीर मार्गदर्शनामुळे त्यांचा प्रवास तणावमुक्त झाला आणि ग्राहकांना सेवा देण्यावर तसेच व्यवसाय वाढवण्यावर त्यांना लक्ष केंद्रित करता आले.

पीबीपार्टनर्स देऊ करत असलेल्या अनेक सुविधांमध्ये सेवेचा वेग आणि लाभदायक एलएमसी कॉइन्स प्रोग्राम या दोन सुविधा मयूर यांच्यासाठी सर्वोत्तम ठरल्या. ते सांगतात, प्लॅटफॉर्म वेगवान व कार्यक्षम आहे आणि एलएमसी कॉइन्स सुविधेमुळे माझ्या व्यवसायात खऱ्या अर्थाने मूल्यवर्धन झाले. या सुविधांमुळे त्यांचे कामकाज तर सुलभ झालेच, शिवाय त्यांना पुढे जाण्यासाठी सातत्याने प्रेरणा मिळत राहिली.

पारंपरिक उद्योगांमध्ये काम करणारे व्यावसायिक विश्वास, तंत्रज्ञान आणि वक्तशीर लाभ यांची सांगड घालून आधुनिक विमा वितरणामध्ये यशस्वीरित्या स्थित्यंतर कसे करू शकतात आणि दमदार करिअर कसे उभे करू शकतात हे मयूर यांच्या कथेतून स्पष्ट होते.

## संस्कृत बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी १५ व १६ सप्टें. रोजी

**नागपूर:** कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक (विस्तार सेवा मंडल) व बालरंगभूमी परिषद, नागपूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संस्कृत बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी १५ व १६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते सायं. ६ वा. दरम?यान कविवर्य सुरेश भट सभागृह येथे घेण?यात येणार आहे. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा १६ तारखेला सायं. ६.३० वा. याच ठिकाणी होईल. यात स्पर्धेतील विजयी चमूंना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. तसेच, बालक व बालिका यांना उत्कृष्ट अभिनयासाठी पारितोषिक व अभिनयाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. याशिवाय दिग्दर्शन, संगीत, प्रकाशयोजना, नेपथ्य, रंगभूषा व वेशभूषा यासाठी स्वतंत्र पारितोषिक देण्यात येईल.

## माणुसकी सुरक्षा रक्षक सेंनेतर्फे नवनियुक्त सचिव ऊत्कर्षे मोरनकर यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

माणुसकी सुरक्षा रक्षक सेंना तर्फे नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे नवनियुक्त सचिव ऊत्कर्षे मोरनकर यांचा सत्कार करण्यात आला व सुरक्षा रक्षकांच्या प्रलंबित असलेल्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. यावर सचिवानी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा केली. यावेळी संघटनेचे सल्लागार नंदकिशर चरडे ,कार्याध्यक्ष सिद्धार्थ अडकने , सरचिटणीस गणेश भुसे, कोषाध्यक्ष नितीन चुटे ,कार्यकारीणी सचिव भाग्यश्री इंगळे , प्रभारी संजय पुराम , दिपक जाधव त्यावेळी उपस्थित होते.

## मेट्रोभवन येथे आर्थिक कर साक्षरता कार्यक्रम संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १० :

आयसीएआय नागपूर शाखा (डब्ल्यूआयआरसी) आणि महा मेट्रोने महा मेट्रोच्या कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी मेट्रो भवन येथे आर्थिक आणि कर साक्षरता कार्यक्रम आयोजित केला होता.




२०२५ च्या वितियाज्ञान मेळा सप्ताहात आयसीएआयच्या वित्तीय आणि कर साक्षरता (एफटीएल) संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

महामेट्रोच्या १५० हून अधिक कर्मचाऱ्यांना या कार्यक्रमाचा लाभ घेतला सीए.आयसीएआय नागपूर शाखेचे अध्यक्ष दिनेश राठी यांनी स्वागत भाषणात सांगितले की १७५+ शाखांद्वारे संपूर्ण भारतात असेच कार्यक्रम आयोजित करत आहे. एफटीएल संचालनालयाचे उद्दिष्ट सामान्य लोकांमध्ये आर्थिक शिक्षण पसरवणे हा आहे, या सत्राचे वक्ते सीए. जितेंद्र सगलानी, माजी अध्यक्ष आणि प्रादेशिक परिषद सदस्य. आपल्या भाषणात त्यांनी दैनंदिन जीवनात आर्थिक शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. महामेट्रोचे संचालक अनिलकुमार कोकाटे आणि सीए हरेंद्र पांडे यांनीही सहभागींसोबत त्यांचे मौल्यवान अनुभव शेअर केले .

या कार्यक्रमाचे समन्वयक सीए. दीपक जेठवानी, सचिव, आयसीएआय नागपूर शाखा सीए. स्वरूपा वाझलवार, उपाध्यक्ष, सीए. तृप्ती भट्टड, खजिनदार, सीए. प्रणवकुमार लिमजा, सीए. प्रतीक पालन आणि सी.ए. आशिष अग्रवाल उपस्थित होते.

# पावडदौना ग्रामपंचायतीस आर. आर. आबा पाटील स्मार्ट ग्राम पुरस्कार म्हणून १० लाख प्राप्त

■ महासागर प्रतिनिधी,
मौदा, दि. १० :

सरपंच झाल्यावर आपल्या गावाचा विकास कसा करावा जनतेनी दिलेला कौल आपल्याला पाच वर्ष मान्य राहील हेच बिद्र डोळ्यासमोर ठेवत गावकऱ्यांच्या सहकार्याने गावाच्या सर्वांगीण विकासामध्ये ग्रामपंचायत ही महत्त्वाची कडी आहे. शासनाच्या विविध योजनांच्या प्रभावी व योग्य वापर करून गावाला आदर्श गाव बनविता येतो.

असा आदर्श तालुक्यातील पावडदौना या ग्रामपंचायतीने निर्माण केला आहे. याची दखल घेत जिल्हा परिषदेतर्फे आयोजित 'आर.आर.आबा पाटील सुंदर गाव' पुरस्कार वितरण सोहळ्यात पावडदौना ग्रामपंचायतीला तालुका सुंदर ग्रामपंचायत तालुकास्तरीय प्रथम पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कारात दहा लाख रुपयांच्या धनादेश प्रधान करण्यात आला. मौदा तालुक्यातील पावडदौना ग्रामपंचायतला राज्य शासनाचा आर. आर. आबा पाटील सुंदर गाव तालुका स्तरीय पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. नागपूरच्या रेशीम बाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात हा भव्य सोहळा पार पडला. ह्या

### सुंदर गाव पुरस्कार देऊन सरपंच शिला नितेश वांगे ग्रामसेवक अंकिता चकोले यांचा सत्कार



कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे , तर कार्यक्रमाचे, उद्घाटक राज्यमंत्री वित्त व नियोजन, आमदार ॲड. आशिष जयस्वाल , आमदार डॉ.आशिष देशमुख, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विनायक महामुनी, माजी आमदार टेकचंद सावरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विपुल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कपिलनाथ कलोडे, शिवसेना मौदा तालुकाप्रमुख नितेश वांगे आदी मान्यवर उपस्थित होते. केंद्र व राज्य पुरस्कृत अनेक योजनांचा शेवटच्या घटकापर्यंत लाभ देण्याचा १००% प्रयत्न असतो.

ग्रा प कर आकारणी व विविध अभिलेख, संगणकीय दाखले याबद्दल विशेष काळजी घेतली जाते. दरवर्षी लेखापरीक्षण होते, स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना सामाजिक दायित्व म्हणून पुस्तकांची उपलब्धता, प्रोत्साहन व आर्थिक पाठबळ यासाठी सदस्य प्रयत्न करतात.

आमदार व खासदार निधीतील कामे दर्जेदार करून घेण्याचा प्रयत्न असतो. यासाठी सर्व ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ यांचेही सहकार्य वेळोवेळी लाभते. म्हणून अशा पुरस्कारापर्यंत पोहोचता येते. सदर पुरस्कारासाठी तालुक्यातील पावडदौना या ग्रामपंचायती निवड झाल्याबद्दल ग्रा प पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धेसाठी प्रबोधनकार ठाकरे शाळेच्या विद्यार्थ्यांची निवड



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १० :

येथील दत्तवाडीतील प्रबोधनकार ठाकरे स्मृती माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी आट्यापाट्या खेळात उज्ज्वल यश संपादन केले आहे. १७ वर्षाखालील गटात झालेल्या निवड प्रक्रियेत मुलींच्या गटातून अदिती फुंडे, श्रुष्टी इंगळे व शिल्पा सरकार तर मुलांच्या गटातून सुजल गोपे, रोहन देवगडे, अनुप बच्छेरे व आदित्य बांगरे यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

ही स्पर्धा १२ ते १४ सप्टेंबरदरम्यान संभाजीनगर येथे पार पडणार असून शाळेच्या खेळाडूंनी कठोर परिश्रम व उत्कृष्ट खेळातून हे यश मिळिवले आहे.

विद्यार्थ्यांना प्रशिक्षक आलोक खोकले यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शिवशक्ती शैक्षणिक संस्थेच्या संचालिका मीनाक्षी घोडखांदे , अध्यक्षा लक्ष्मीताई घोडखांदे , माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना डायगव्हाणे, गुरुप्रसाद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका प्रज्ञा चौधरी व दोन्ही शाळांचे शिक्षकवृंद , शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

पुढील स्पर्धेत उज्ज्वल यश संपादन करण्यासाठी सर्वांनीच खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# फेडरल बँकेच्या अंतर्गत शास.तंत्रनिकेतन महाविद्यालयात थंड पाण्याची सुविधा आणि आरोग्य शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

फेडरल बँकेच्या सदर शाखा फेडरल बँक गव्हर्मेंट बिझनेस डिपार्टमेंट ने हॉरमिस मेमोरियल फाउंडेशनच्या माध्यमातून, आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात चार पाण्याचे थंडगार कुलर बसवण्यात आले. या उपक्रमामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांना स्वच्छ व थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली . या उपक्रमाचे आयोजन शिक्षक दिनाच्या दिवशी करण्यात आले. या निमित्ताने फेडरल बँकेच्या वतीने महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ७० पेक्षा जास्त




अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची चाचणी करून घेतली.

शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या कार्याची दखल घेत, त्यांना आरोग्यविषयक सुविधा पुरविण्याचा हा प्रयत्न होता.

कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर डॉ.मनोज डायगव्हाणे (सह संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, नागपूर), डॉ.राजेंद्र मोगरे प्राचार्य, शास. तंत्रनिके.), डॉ.विजय मानकर उपप्राचार्य, शास. तंत्रनिके, नागपूर), जोबिन जोसेफ (सहायक उपाध्यक्ष व क्षेत्र प्रमुख, फेडरल बँक), नेहा पंडित (शाखा प्रमुख, फेडरल बँक, सदर शाखा नागपूर), राकेश गौळकर (सर्कल प्रमुख, शासकीय व्यवसाय विभाग, फेडरल बँक नागपूर) तसेच फेडरल बँकेच्या संपूर्ण टीमचा समावेश होता. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या महाविद्यालय प्रशासनाने फेडरल बँकेच्या या सामाजिक उपक्रमाबद्दल मन:पूर्वक आभार व्यक्त केले.

# इंदिराबाई भोसले महाविद्यालयात शिक्षक दिन



**कुही :** राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली.

प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन मांडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यासोबतच शिक्षक दिनानिमित्त प्राचार्य स्थान भूषविणारी श्रुती तलवारे हिने तिच्या मनोगतातुन विद्यार्थ्यांनी प्रत्येक कार्यक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवावा अशी अपेक्षा दर्शवली. शिक्षक दिनाचे औचित्य साधून दिपाली भोयर ने भाषणाच्या व संजना मेश्राम हिने गीताच्या माध्यमातून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षक दिनानिमित्त उत्कृष्टपणे शिक्षकांची भूमिका निभावणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. कटमुसरे सर, डॉ. लामखडे, डॉ.केणे, डॉ. चव्हाण, घाटोळ, डॉ कुकडे मॅडम, डॉ. झाडे मॅडम, डॉ. करंभे सर, सोमकुवर , मनकवडे व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# नागपुरात चित्रित रायबा इमानदार १२ सप्टें. रोजी प्रेक्षकांच्या भेटीला

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
प्रामाणिकपणा, नीतिमत्ता आणि सामाजिक संदेश यांची सांगड घालणारा श्री श्री फिल्म्सची निर्मिती असलेला ङ्गरायबा इमानदारङ्क हा मराठी चित्रपट येत्या १२ सप्टेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. नागपुरात चित्रित करण्यात आल्याने या चित्रपटाला विदर्भीयांच्या दृष्टीने वेगळे महत्व प्राप्त झाले आहे.



राजकारणातील संघर्ष, नैतिक अधःपतन आणि त्यावरील उपाय यांचा वेध घेणारी ही कथा एका सामान्य व्यक्तीच्या सत्य आणि न्यायासाठीच्या लढ्याची आहे. हा चित्रपट लवकरच महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार असून, ङ्गरायबा इमानदारङ्क प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान मिळवेल असा विश्वास संपूर्ण टीमने व्यक्त केला आहे.
या चित्रपटाची निर्मिती श्री श्री फिल्म्स यांनी केली असून, सचिनजी घोडे निर्मति व लेखक आहेत.
दिग्दर्शनाची जबाबदारी सईद अख्तर यांनी सांभाळली आहे. याशिवाय चित्रपटाची कथा सचिन घोडे, पटकथा आणि संवाद सईद अख्तर,
संगीत भूपेश सवाई, सिनेमॅटोग्राफी व संपादन पवन पिपरोदे , कला दिग्दर्शन आदित्य मेकरटवार, प्रॉडक्शण मॅनेजर प्रीती (कोमल) तागडे आणि मेकअप नकुल श्रीवास यांचा आहे.
कलाकार मंडळी पैकी संजय खापरे, दीपक शिर्के, प्रणाली राऊत, बाळू इंगळे, नरेश गडेकर यांची प्रमुख भूमिका असून विनोद राऊत, विजय गुमगावकर, नितीन पात्रीकर, मास्टर तहूर, सचिन घोडे, केशव गजभिये (कीर्तीनंद), सईद अख्तर आदींच्या दमदार भूमिका प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहेत.
याशिवाय, सुप्रसिद्ध गायिका वैशाली सावंत यांच्या आवाजातील ङ्गचहा पाण्याला' ही लावणीङ्क आधीच लोकप्रिय झाली असून, चित्रपटाच्या ट्रेलरलाही प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.
अशी माहिती पत्रकार परिषदेत निर्माता / लेखक सचिन घोडे, यांनी दिली. दिग्दर्शक सईद अख्तर, गीतकार केशव गजभिये, अभिनेता संजय खापरे, विनोद राऊत, विजय गुमगांवकर, अभिनेत्री प्रणाली राऊत, सिनेमाटोग्राफर पवन पिपरोदे, प्रोडक्शन मॅनेजर प्रीती (कोमल ) तागडे उपस्थित होते.

# द्रुगधामना हायस्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा




**वाडी, १० सप्टेंबर:** द्रुगधामना हायस्कूल , आदर्श कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय आणि एच .एच.सी. व्होकेशनल महाविद्यालय यांच्या संयुक्त सहकार्याने प्राचार्या ज्योती अढाऊ यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. स्वयंशासन उपक्रमातंर्गत विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भुमीका पार पाडली. यावेळी प्राचार्याची जबाबदारी परी मिश्रा हीने सांभाळली.
यावेळी प्राचार्या ज्योती अढावू, प्रा.अविनाश चौधरी , प्रा.बाबूलाल मोरे , प्रा. नंदकिशोर भोयर,प्रा. गजानन काकड, प्रा. अविनाश बारब्दे, प्रा. प्रगती पाचपोहर , प्रा. जयश्री किरणापूरे, प्रा. आरती भोरे,वंदना मुसळे,सुनीता चव्हाण , वैशाली लोही, प्रकाश मस्के,विलास चौधरी,विलास मुसळे ,लक्ष्मण शिंदे, शुभम अढागळे भाग्यशाली मेश्राम ,शारदा कोरे, राजू शेळके,शंकर राऊत , पंढरी धार्मीक उपस्थित होते.

# ब्रम्हाकुमारीज विश्वशांती सरोवरचा सातवा वर्धापन दिन १२ सप्टेंबरला

## सर संघचालक डॉ. मोहन भागवत यांची प्रमुख उपस्थिती

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
ब्रम्हाकुमारीज विश्व शांती सरोवरचा सातवा वर्धापन दिन शुक्रवार, १२ सप्टेंबरला सकाळी १०.३० वा. जामठा येथे आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत अध्यक्षस्थानी राहणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या माऊंट आबू आंतरराष्ट्रीय मुख्यालयाचे अतिरिक्त महासचिव मृत्युंजय, संस्थेच्या मुख्य प्रशासिका राजयोगिनी बीके संतोष दीदी, जीवन प्रबंधक विशेषज्ञ राजयोगिनी उषा दीदी, महिला विंगच्या राष्ट्रीय संयोजक राजयोगिनी बीके शारदा दीदी, शांतीवन आवासचे प्रभारी बीके देव भाई, मधुबन न्यूजचे प्रमुख आणि जनसंपर्क अधिकारी कोमल भाई



प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. उद्देश कार्यक्रमाचा समाजामध्ये शांती, सद्भाव, आध्यात्मिक जागृती आणि नैतिक मूल्यांचा प्रसार करणे हा आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात आत्मिक शांती आणि सकारात्मक विचारांचा स्वीकार करून वसुधैव कुटुंबकमच्या भावनेला साकार करावे, यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. याप्रसंगी विदर्भातून समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. नागपूर विभागाच्या संचालिका राजयोगिनी बीके रजनी दीदी आणि सहसंचालिका मनीषा दीदी यांच्या निर्देशानुसार हा कार्यक्रम होत आहे.

# दहेगाव गोवारी कोळसा ब्लॉक भूमिगत खाण प्रकल्पाची पर्यावरणीय जनसुनावणी

**महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :**
नागपूर जिल्ह्यातील वलाणी परिसरातील प्रस्तावित दहेगाव गोवारी कोळसा ब्लॉक भूमिगत खाणकाम प्रकल्पासाठी पर्यावरणीय जनसुनावणी यशस्वीरित्या संपन्न झाली. नागपूर जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री अनुप खांडे; महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूरचे प्रादेशिक अधिकारी श्रीमती हेमा देशपांडे; महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूरचे उपप्रादेशिक अधिकारी श्रीमती धनश्री पाटील यांच्या उपस्थितीत ही जनसुनावणी पार पडली.




एकूण १,५६२ हेक्टर क्षेत्रफळांपैकी केवळ २४.०५ हेक्टर क्षेत्रफळ खाणकाम आणि हरित पट्टा विकासासाठी वापरला जाईल. खाणकाम भूमिगत असल्याने, पुनर्वसनाची आवश्यकता राहणार नाही किंवा पृष्ठभागावर कोणत्याही प्रकारचा भूस्खलन होणार नाही. धनबाद येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ मायनिंग अँड फ्युएल रिसर्चच्या अभ्यासानुसार, या प्रकल्पाचा पर्यावरणीय परिणाम कमीत कमी असेल.
या प्रकल्पामुळे स्थानिक अर्थव्यवस्थाही बळकट होईल. अंदाजे ७०० प्रत्यक्ष आणि १,६०० अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, ज्यामुळे स्थानिक लोकांना उपजीविकेच्या संधी उपलब्ध होतील. बांधकाम कालावधीत ट्रॅक्टर, उत्खनन यंत्र आणि इतर वाहतूक सेवांद्वारे देखील रोजगार निर्माण होईल.प्रकल्पाची उत्पादन क्षमता दरवर्षी १.० दशलक्ष टन निश्चित करण्यात आली आहे. खाण क्षेत्रात एकूण १८९.७४ दशलक्ष टन भूगर्भीय साठा आहे, ज्यापैकी ७९.५३७ दशलक्ष टन खाणकाम करण्यायोग्य आहे आणि ४६.१९ दशलक्ष टन काढता येण्याजोगे आहे. खाणकामाची किमान खोली १०० मीटर आणि कमाल खोली ५९० मीटर निश्चित करण्यात आली आहे. प्रकल्पाचे आयुष्य बांधकाम कालावधीसह ५० वर्षे असेल.
२४ सप्टेंबर २०२४ रोजी खाणकाम आराखडा मंजूर करण्यात आला, ११ एप्रिल २०२५ रोजी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने टीओआर पत्र जारी केले

**स्थानिक समुदाय या प्रकल्पाला उघडपणे पाठिंबा देतो.**

**भूमिगत खाणकामामुळे रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील**

**कंपनी सामुदायिक विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी वचनबद्ध आहे**

आणि १६ मे २०२५ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेला पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अहवाल सादर करण्यात आला. पर्यावरण संरक्षणाअंतर्गत, ५,००० रोपे लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कदंब, निंब, शिशम, करंजा, डुमेर, ताम्हण (जारूल), मौलसरी, जांभूळ आणि टेकोमा यासारख्या स्थानिक प्रजातींना प्राधान्य दिले जाईल. भूगर्भातील खाणकामात पाण्याचा पुनर्वापर केला जाईल आणि उर्वरित पाणी नैसर्गिक जलाशयांमध्ये सोडण्यापूर्वी स्वच्छ केले जाईल, जेणेकरून आसपासचे ग्रामस्थ शेतीसाठी त्याचा वापर करू शकतील. ध्वनी आणि धूळ नियंत्रण, हरित पट्टा विकास आणि पावसाचे पाणी साठवण यासारखे पर्यावरणीय उपाय राबविले जातील. सीएसआर उपक्रमांमुळे शिक्षण, आरोग्य, ग्रामीण पायाभूत सुविधा, कौशल्य विकास आणि महिला स्वयंरोजगाराला प्रोत्साहन मिळेल. या प्रकल्पांतर्गत स्थानिक शाळा आणि अंगणवाडी केंद्रांसाठी पायाभूत सुविधांचा विकास, विशेष शिक्षण साधने, फिरते वैद्यकीय युनिट आणि आरोग्य शिबिरे चालवणे, ग्रामीण रस्त्यांवर सौर पथदिवे, जलाशयांचा आणि सामुदायिक सुविधांचा विकास केला जाईल. दहेगाव गोवारी भूमिगत खाण प्रकल्पामुळे केवळ रोजगार आणि स्थानिक विकासाच्या संधी वाढणार नाहीत तर कर आणि रॉयल्टीद्वारे राज्याला आर्थिक लाभ देखील मिळेल. यासोबतच, आजूबाजूच्या ग्रामीण भागात राहणीमान आणि सामाजिक कल्याणात सुधारणा सुनिश्चित केली जाईल.



**नागपूर:** कराले परिवारातर्फे बाप्पाना निरोप देताना उपस्थित रुचा कराले ,अनिल संध्या कराले, मयूर सांगणे विनीत सांगणे आणि परिवार निरोप देताना

# रचना विश्व अपार्टमेंटमध्ये बाप्पांना निरोप



**नागपूर:** गणपती बाप्पा मोरिया, पुढच्या वर्षी तुम्ही लवकर या... या जयघोषाने रचना विश्व अपार्टमेंट, केटी नगर, नागपूर येथील गणेश उत्सव आनंदात संपन्न झाला. रचना विश्व अपार्टमेंटच्या बाप्पाचे पर्यावरणपूरक गणेश विसर्जन आनंदात करण्यात आले होते.
सोसायटीच्या सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले होते. दररोज दहा दिवस बाप्पाच्या पूजेसोबतच नारीशक्तीवरील नाटक, शालेय मुलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा, रांगोळी इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम सोसा. महिला सदस्यांनी आयोजिण्यात केला होता हे उल्लेखनीय आहे. हवन पूजन आणि महाप्रसाद वाटप केल्यानंतर गणेशजींच्या भव्य मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. या समारंभात महिला, तरुण आणि मुले बाप्पाच्या भजनांवर नाचत गाजत चालत होते. सर्वांनी भक्तीभावाने बाप्पाचे विसर्जन केले.

# ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्ट नरखेड तालुका स्तरीय व्हॉलिबॉल विजयी



**महासागर प्रतिनिधी, नरखेड, दि. १० :** ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्ट नरखेड आणि अरविंद इंडो पब्लिक स्कूल नरखेड यांच्या मध्ये व्हॉलिबॉल खेळाची स्पर्धा झाली त्यात ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्ट नरखेड. तालुका प्रथम आल्या बद्दल शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले व त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमामध्ये उपस्थित शाळेचे मुख्याधापक श्री.अविनाश गजभिये सर आणि भारती झाम्रे मॅडम, तसेच शाळेतील शिक्षक प्रशांत ढोके सर, वीरेंद्र भाजीखाये सर, चित्रा चरडे मॅडम उपस्थित होते.

# गणेशोत्सव निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमात श्री गुरुदेव सत्संग मंडळ आलेसूर प्रथम



**महासागर प्रतिनिधी, भिवापूर, दि. १० :**
सांस्कृतिक कार्य विभाग मुंबई महाराष्ट्र शासन व तहसील कार्यालय भिवापूर यांच्या सयुक्त विद्यमाने गणेशोत्सव निमित्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन नवयुवक गणेश मंडळ, भिमादेवी रोड येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत चार भजन मंडळांनी सहभाग घेतला होता.
प्रथम क्रमांकाचे मानकरी श्री गुरुदेव संत्ससंग मंडळ आलेसुर हे मंडळ ठरले. सदर कार्यक्रमाला नायब तहसिलदार प्रविण राठोड, तलाठी नाकाडे, परीक्षक सुरेश राठोड, वसंत प्रभाकर काळे उपस्थित होते. या स्पर्धेत उपस्थित भजन मंडळांनी भजनाचे सादरीकरण केले. सदर स्पर्धेच परीक्षण कलाशिक्षक सुरेश राठोड, वसंत काळे यांनी केले. यात प्रथम क्रमांक श्री गुरुदेव सत्संग मंडळ, आलेसुर, द्वितीय माऊली भजन मंडळ धामणगाव विद्या मंदिर , तृतीय नवनित भजन मंडळ भिवापूर यांना प्रदान करण्यात आले तर प्रोत्साहनपर बक्षिस न्यु प्रबोधन कला मंच पांढरवाणी यांना देण्यात आले.

# जि.प.उच्च प्राथमिक शाळा बोरडा येथे शिक्षक देण्याची मागणी

**महासागर प्रतिनिधी रामटेक, दि. १० :**
मनसर केंद्रातील सर्वात जास्त पटसंख्या असणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा बोरडा येथील शाळेत एकूण ८ वर्ग असून विद्यार्थ्यांची संख्या १७३ अशी आहे. मात्र इतके विद्यार्थी असूनही शिक्षक कमी असल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शालेय नुकसान होत असल्याचे चित्र यावेळी दिसून येत आहे.




जि. प. उच्च प्राथमिक शाळा बोरडा येथे एकूण ८ शिक्षक आपली सेवा देत होते. मात्र मे-जून महिन्याच्या कालावधीत त्यातील दोन शिक्षक सेवानिवृत्त झाले. त्यामुळे त्यांची जागा शिल्लक आहे. गावात एकूण ८ वर्ग असून आता शिल्लक असलेले फक्त ६ शिक्षक प्रत्येक वर्गावर वेळ देऊ शकत नसल्याने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नुकसान होतं आहे. याच गोष्टीची जाणीव घेत गावातील नागरिक व उपसरपंच पंकज चौधरी यांच्या नेतृत्वात शाळेला २ शिक्षक देण्याची मागणी गट विकास अधिकारी,पंचायत समिती रामटेक व गटशिक्षणाधिकारी रामटेक यांना निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी गावचे उपसरपंच पंकज चौधरी, समाजसेवक प्रीतम वासनिक,अभिजित रामटेके, कुशाल राऊत, वैभव शेंडे,अजय लांजेवार उपस्थित होते.

# नागपूरमध्ये पहिले 'सोलर एक्स्पिरियन्स सेंटर' सुरू

**नागपूर:** भारतातील आघाडीची रुफटॉप सोलर कंपनी सोलरस्क्वेअर ने आज नागपूरमध्ये पहिले सोलर एक्स्पिरियन्स सेंटर सुरू केल्याची घोषणा केली. नागपूरमध्ये घरगुती सौरऊर्जेचा वापर वेगाने वाढत असून आतापर्यंत ७१,००० पेक्षा जास्त घरे सौरऊर्जेशी जोडली गेली आहेत आणि दर महिन्याला ३,००० हून अधिक नवीन कुटुंबे या चळवळीत सहभागी होत आहेत. सोलरस्क्वेअर च्या अत्याधुनिक तंत्रज्ञानासह प्रत्यक्ष सौर इंस्टॉलेशन येथे दाखवले आहे. विशेष स्टॉर्म सिम्युलेटर च्या माध्यमातून प्रबळ वाऱ्यांमध्ये या तंत्रज्ञानाची क्षमता दाखवली जाते. तसेच, गेमिफाईड डेमोजद्वारे चुकीच्या देखभालीमुळे होणारे नुकसान, दर्जेदार तपासण्यांचे महत्त्व आणि दीर्घकालीन विश्वासार्हता याबाबत प्रत्यक्ष समज दिली जाते.सो्लरस्क्वेअर चे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रेया मिश्रा म्हणाल्या.

# दुर्लक्षित ग्रामाला 'स्वर्ग' बनविणारे हात

**महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. २५ :**
नागपूर वर्धा महामार्गावर असलेले एकेकाळचे दुर्लक्षित ग्राम 'जामठा '! याच ग्रामाला एका परीस स्पर्शाने अक्षरश: ' स्वर्ग ' स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते. हा परीस स्पर्श करणारे हात आहेत तेथील जामठा ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. योगेश टेकाम व सचिव श्री. चन्द्रशेखर मुंगले यांचे. जेव्हापासून या दोघांच्या हाती या ग्रामपंचायतीचा कारभार आला, तेव्हा पासूनच त्यांना आपल्या परिसराच्या सौंदर्यीकरण, विकास व स्वच्छतेचा ध्यास लागला. त्यांनी या कार्यांच्या पूर्ततेसाठी झोकून देऊन काम सुरू केले. जामठ्यालाच क्रिकेटचे आंतरराष्ट्रीय स्टेडीयम आहे. सरपंच श्री. योगेश टेकाम व सचिव श्री. चन्द्रशेखर मुंगले यांनी त्यांच्या संकल्पने प्रमाणे ग्रामपंचायतीला एक अत्यंत आकर्षक स्वरूप प्रदान केले आहे. अश्या स्वरूपाची विकसित , स्वच्छ आणि सौंदर्य पूर्ण ग्रामपंचयात आपणास संपूर्ण देशात



कोठेही बघावयास मिळणार नाही. केवळ सहा हजार लोकसंख्या असलेल्या या ग्रामपंचायतीच्याक्षेत्रात आठ जणांची बॉडी काम करते . या ग्रामपंचायतीच्या आवारात प्रवेश करताच, आपले स्वागत एक भव्य उद्यान करते.
या उद्यानात विविध फळे , फुले यांची झाडे, वृक्ष , आणि त्याच बरोबर महापुरुषांच्या आकर्षक प्रतिमा प्रतिष्ठित केल्या आहेत . ज्यामुळे संपूर्ण परिसरात एक आगळीच प्रसन्नता अनुभवायस मिळते. या परिसरात आलेल्या व्यक्तीस आल्याबरोबर जलपान देऊन तृप्त करण्याची किमया केलेली आहे. सरपंच श्री. योगेश टेकाम व सचिव श्री. चन्द्रशेखर मुंगले यांच्या सोबत खंदयास खांदा लाऊन सौंदर्यीकरण, विकास व स्वच्छतेचे स्वप्न साकार करर्णायात उपसरपंच कौशल्याताई रोकडे, आणि सर्व पदाधिकारी यांचा मोलाचा वाटा आहे.
या सर्वांमुळेच जामठा ग्रामपंचयात ही एक आदर्श ग्रामपंचयात म्हणून उदयास येत आहे. या ग्रामपंचायतीच्या अंतर्गत आशिया खंडातील प्रसिद्ध कॅन्सर रुग्णालय , नवनवे लेयाउट्स, ढाबे, बहुमंजीला ईमारती , येतात . सरपंच श्री. योगेश टेकाम व सचिव चन्द्रशेखर मुंगले यांनी या परिसराचा नव्या प्रकारे विकास प्रस्ताव बनविणे सुरू केले आहे. त्यांच्या सोबत सदस्य धनराज ढगे ,इंदूताई भोपरे, नम्रता आडमते, मंजूषा ठाकरे ,प्रीती वानखेडे आणि गावातील ग्रामस्थांनी आपली सौंदर्यीकरण, विकास व स्वच्छतेच्या दिशेने होत असलेल्या प्रगतीत योगदान देण्याचा निश्चय बोलून दाखविला. यंदा सर्वात जास्त वृक्षारोपण करून विक्रम करावायचा आहे. आणि सौंदरयीकरण गावांत देखील करावायचे आहे.




# संपूर्ण भारतातील कॉम्पिटिशन फेस्टिवल -२०२५

## चार दिवसीय महोत्सवाचे आयोजन ११ ते १४ सप्टें. दरम्यान

**महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १० :**
श्रीकृष्ण कल्चरल फाउंडेशन नागपूर च्यावतीने गुरुनानक भवन सभागृहासमोर अंबाझरी फुटाळा चौक नागपूर येथे श्रीकृष्ण नृत्यलयम मध्य भारतातील सर्वात मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ११ ते १४ सप्टेंबर दरम्यान चार दिवसीय महोत्सवात भारतातील प्रतिभावान कलाकारांचा सहभाग असलेल्या शास्त्रीय नृत्य संगीताचा विविध सादरीकरणाचा समावेश आहे. यावर्षी या कार्यक्रमाचे आठवे वर्ष असून या महोत्सवात आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, तामिळनाडू, छत्तीसगड, या राज्यातून सहभागी होतील. कार्यक्रम सकाळी ९ ते सांय. ७ पर्यंत स्पर्धा चालणार आहे.
अशी माहीती पत्रकार परिषदेत संस्थापिका उन्नीकृष्णन यांनी पत्रकारांना सांगितले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गणेश थोरात यांच्या शुभहस्ते महोत्सवाची सुरुवात होईल.
कला व संस्कृतचा भव्य उत्सवाच्या आयोजनासाठी प्रमिला उन्नीकृष्णन डॉ. हनी उन्नीकृष्णन, हरी उन्नीकृष्णन, सागर चोपडे, पियुष बोपाटे, भावेश चौधरी, संकेत रायकवार हे अथक परिश्रम घेत आहे.

# वाडी न. प. तर्फे पर्यावरण रक्षक प्रशस्ती पत्र देऊन गौरव

**महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १० :**
वाडी नगर परिषद क्षेत्रात गेल्या दहा दिवसांपासून सार्वजनिक गणेशोत्सवासह घरगुती बाप्पांच्या उत्साहात भाविकांच्या मनामध्ये भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळाले. विसर्जनाच्या दिवशी वाडी नगर परिषदेने भाविकांच्या सोयीसाठी तसेच पर्यावरण संरक्षण व जलप्रदूषण टाळण्यासाठी विशेष तयारी केली होती. त्याकरिता वाडी परिसरात अमरावती रोड वेल ट्रीट हॉस्पिटलजवळ १, आदर्शनगर पाण्याच्या टाकीजवळ १, शाहू ले-आऊट झेंडाजवळ १, वसंत विहार दुर्गा मंदिरजवळ १, इंदिरानगर काली मंदिर जवळ १, मंगलधाम सोसायटी पुण्याई सभागृहसमोर १,कर्मचारी यांची देखरेख करण्याकरिता ड्यूटी लावण्यात आलेली होती. अंदाजे वाडी



शहरात जवळपास १५०० ते १७०० श्री गणेश मूर्तीचे विसर्जन कृत्रिम टाक्यात करण्यात आले. विशेष म्हणजे, पर्यावरणपूरक (मातीच्या) श्रीगणेश मूर्तीचीस्थापना करणाऱ्या भाविकांची नोंद घेऊन त्यांना वाडी नगर परिषदेतर्फे पर्यावरण रक्षक म्हणून प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी गौरव गाडगे, कार्यालय अधिकारी दिनेश बुधे व स्वच्छता विभाग प्रमुख सुषमा भालेकर,नोडल अधिकारी धनंजय गोतमारे , स्वच्छता निरिक्षक मुकेश महातो, विजय मेथिया, शहर समन्वयक आशिष गुंडूकवार यांनी विसर्जनाची सर्व व्यवस्था सांभाळली.
सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक विसर्जन स्थळी पोलिस निरीक्षक राजेश तटकरे यांच्या नेतृत्वाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# विधानभवन विस्तारासाठी एन. कुमार यांची इमारत खरेदीचा आग्रह

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
विधानभवनाच्या विस्तारीकरणासाठी रस्त्यांच्या पलीकडे असलेली, विनावापर पडून असलेली आणि सरकारने ठरवलेली किंमत मालकाने अमान्य केल्यानंतरही पूनम टॉवर्स ही इमारत खरेदी करण्याचा घाट का रचला जात आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राज्य विधिमंडळाच्या इमारतीचा विस्तार प्रस्तावित असून विधानभवनाच्या समोरील बांधकाम व्यावसायिक एन. कुमार यांच्या मालकीचे पूनम टॉवर्स अधिग्रहित करण्यात येणार आहे. विधानभवन आणि पूनम टॉवर्स या दोन इमारतींच्या मधोमध आरबीआय चौक ते आकाशवाणी चौक असा मोठा रस्ता आहे.

विधानभवनसमोर अलाहाबाद बँक आणि इतर खासगी इमारती देखील आहेत. मात्र, केवळ एन. कुमार यांची इमारत खरेदी करण्याचा आग्रह धरला जात आहे. रस्त्यांच्या पलीकडे असलेल्या इमारतीचा विधानभवन विस्तारात उपयोग काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे, पूनम टॉवर्स काहीच उपयोग नाही. ती इमारत पाडावी लागेल. ती विधानभवनाच्या प्रशासकीय वापरासाठी उपयुक्त नाही, असा अहवाल विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेने (व्हीएनआयटी) सादर केला आहे. तरी देखील केवळ ही इमारत खरेदी करण्यात रुची दाखवण्यात येत आहे हे अनाकलनीय आहे.

एन.कुमार यांनी २५ वर्षांपूर्वी नऊ मजली इमारत उभारली. यात दोन बेसमेंट आहे. ही इमारत सुमारे २८ हजार चौरस फूट जागेत आहे. विधानभवनाच्या समोर असल्याने ही बहुमजली इमारत सुरक्षा संभावित धोका घेऊन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यास आणि वापरण्यास मनाई करण्यात आली.

त्यानंतर या इमारतीचे अधिग्रहण करण्याचा निर्णय घेतला आला. तेव्हापासून येथे केवळ तळमजल्यावर एक शोरूम सुरू आहे. इमारतीचा उर्वरित भाग विनावापर पडून आहे. शिवाय रस्त्याच्या पलीकडे आहे आणि या इमारतीचा आणि विधानभवन इमारतीमध्ये बरेच अंतर आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याने पहिल्यांदा या इमारतीचे मूल्य ६०.९१ कोटी रुपये निश्चित केले. त्यावर एन. कुमार यांनी आक्षेप घेतला आणित पुनर्मूल्यांकनाची मागणी केली. दुसऱ्यांदा मूल्यांकन करण्यात आले आणि ६९.२३ कोटी रुपये एवढे मूल्य निश्चित करण्यात आले.

ही किंमत देखील इमारत मालकाला मान्य नाही. त्यामुळे आता त्रयस्थ कंपनीकडून मूल्यांकन करण्यात येत आहे, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी सांगतात.

**शासकीय मुद्रणालयाची जागा**

विधानभवनाच्या पश्चिम दिशेला एलआयसीची वसाहत आहे. शहर पोलिसांचे वाहतूक कार्यालय आहे. दक्षिणेला वन विभागाचे कार्यालय, शासकीय मुद्रणालय आणि भवन्स विद्यालय आहे.

शासकीय मुद्रणालयाची ९ हजार ६७० चौरस मीटर जागा घेतली जाणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. मोजणी झाल्यानंतर या जागेचा प्रत्यक्ष ताबा विधिमंडळ सचिवालयाकडे दिला जाणार आहे, अशी माहिती आहे.

एन. कुमार या इमारतीचे १५० कोटी रुपये मागत असल्याची माहिती आहे. त्यांना तेवढी रक्कम देण्यापेक्षा पुढील १०० वर्षांचा विचार करून प्रस्तावित नवीन नागपूरमध्ये नवीन विधानभवन बांधणे योग्य राहील. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या देखील सुटू शकेल, असे मत सनदी लेखापाल विजयकुमार शिंदे यांनी व्यक्त केले. हा वाद अद्यापही कायम असल्याचे दिसून येते.



**काहीतरी गडबड आहे... वडेट्टीवार**

या सुमारे २५ वर्षे जुन्या इमारतीची उपयोगिता, मूल्य अवाजवी आहे. तसेच इमारत उपयोगी नसल्याचे व्हीएनआयटीने म्हटले आहे. अशा स्थितीत कोणाची इच्छापूर्ती करण्यासाठी ही इमारत खरेदीचा घाट घातला जात आहे. याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. एलआयसीच्या वसाहतीची जागेवर विधानभवनाचा विस्तार करता येणे शक्य असताना या जागेचा आग्रह होत असेल तर दाल मे कुछ काला है हे स्पष्ट आहे, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

## बाजारात बनावट नोटा?



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केल्यानंतर चलनामध्ये नवीन नोटा आलेल्या आहेत. मात्र यावरही ठगबाजांनी उपाय शोधला आहे. हल्ली बाजारात अनेक बनावट नोटा आले असून नागरिक त्याला बळी पडत असल्याचे प्रकरण समोर आलेला आहे. त्यामुळे आपण रोख व्यवहार करताना सावधान राहणे आवश्यक आहे.

सणासुदीच्या तोंडावर उपराजधानीतील चलनात बनावट नोटा आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. मागील १५ दिवसांत तीन वेगवेगळ्या प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे तीनही गुन्हे हे बँक किंवा एटीएमच्या माध्यमातून बनावट नोटा चलनात मिळण्याचे प्रयत्न झाले. त्यातून महत्त्वाची बाब म्हणजे यातील एका प्रकरणाचा खुलासा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएममधून झाला, तर दोन गुन्हे थेट रिझर्व्ह बँक ऑफ इंडियात आढळलेल्या बनावट नोटांच्या आधारे दाखल झाले. जर या मोठ्या बँकांमध्येच बनावट नोटा आढळल्या आहेत, तर शहरात इतर चलनात या नोटा किती प्रमाणात फिरविण्यात आल्या आहेत, हा प्रश्न यंत्रणांसमोर उपस्थित झाला आहे.

दरम्यान, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुख्य कार्यालयातील बॉक्समध्येदेखील बनावट नोटा आढळल्याचा प्रकार समोर आला. संबंधित नोटा फेब्रुवारी व मे महिन्यात बॉक्समध्ये टाकण्यात आल्या होत्या. संबंधित टीएलआर बॉक्समध्ये जुन्या व फाटक्या नोटा बदलून मिळतात. त्यासाठी ग्राहकांना त्यांचे आधार कार्ड, बँकेचे तपशील द्यावे लागतात.

या बॉक्समध्ये फेब्रुवारी महिन्यात १०० रुपयांच्या ११ बनावट नोटा आढळल्या. त्या प्रकरणात सहायक व्यवस्थापिका भैरवी खरतड यांच्या तक्रारीवरून भूषण दिलीप पाटील (वय ३५, चितोड मार्ग, धुळे) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर मे महिन्यात पाच बनावट नोटा आढळल्या. त्या नोटा निहारिका नावाच्या तरुणीने बॉक्समध्ये टाकल्या होत्या. तिला बँकेत बोलविण्यात आले. मात्र, तिच्याकडून काहीच प्रतिसाद न आल्याने खरतड यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. बनावट नोटा आढळल्यावर प्राथमिक तपासणीनंतरच बँकाकडून तक्रार करण्यात येते. हे दोन्ही गुन्हे याच आठवड्यात दाखल झाले आहेत.

## हॉटेलमधील देहविक्रीच्या अड्ड्यावर धाड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
गुन्हे शाखा सामाजिक सुरक्षा विभागाने हॉटेलमधील कुंटणखान्यावर धाड घालून एका दाम्पत्याला अटक करून एका पीडित तरुणीची सुटका केली.

मनिषपाल सुदर्शन राजपूत (४९), सीमारानी मनिषपाल राजपूत (५०) रा. अग्रसेननगर, भिलगाव अशी अटक करण्यात आलेल्या दाम्पत्याची नावे आहेत. कामठी मार्गावरील भिलगाव येथे राजपूत दाम्पत्याचे एम. आर. हॉटेल ओयो हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये ते कुंटणखाना चालवितात अशी माहिती सामाजिक सुरक्षा पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी धाडीची योजना आखली.

पोलिसांनी आपल्या एका पंटरला या हॉटेलमध्ये पाठविले. दीड हजारात सौदा झाल्यानंतर पंटरला एका खोलीत पाठविण्यात आले. तेथे आधीपासूनच एक तरुणी बसली होती. पंटरने इशारा करताच दबा धरून बसलेल्या पोलिसांनी हॉटेलवर धाड घातली. या धाडीत राजपूत दाम्पत्य पोलिसांच्या हाती लागले. पोलिसांनी विचारपूस केली असता फरार आरोपी सोनू उर्फ सय्यद अली हा कुंटणखाना चालवित असल्याचे त्याने सांगितले.

पोलिसांनी या कुंटणखान्यातून पंटरने दिलेले १५०० रुपये, ४ मोबाईल, डीव्हीआर आणि इतर साहित्य असा १ लाख ५१ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी राजपूत दाम्पत्याला अटक करून एका विधी संघर्षग्रस्त मुलाला ताब्यात घेतले आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

## ट्रांसफॉर्मरचे फ्यूज काढून रकमेची चोरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
चोरी करण्यासाठी एका चोरट्याने शक्कल लढवली. ट्रांसफॉर्मरचे फ्यूज काढून परिसरात अंधार केला. त्यानंतर एका कंपनीत घुसून ड्रॉव्हरमध्ये ठेवलेली रोकड चोरून नेली. ही घटना लघु औद्योगिक परिसरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी अशोक प्रभाकर रिनके (४५) रा. झिंगाबाई टाकळीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

लघु औद्योगिक परिसरात नवलकिशोर अग्रवाल यांची फ्यूल कोल इंडिया लिमिटेड कंपनी आहे. अशोक त्यांच्या कंपनीत लेखापाल पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त तेथे १० नोकरही काम करतात. रविवारी रात्री अज्ञात आरोपीने कंपनीच्या ट्रांसफॉर्मरचे फ्यूज काढले.

चावीच्या माध्यमातून दाराचे कुलूप उघडले. कार्यालयाच्या ड्राव्हरमध्ये ठेवलेली ९६ हजारांची रोकड चोरी करून पसार झाला. सोमवारी अशोक कार्यालयात आले असता चोरी झाल्याचे समजले. कंपनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता ट्रांसफॉर्मरचा फ्यूज काढण्यात आल्याचे समोर आले. कंपनीत काम करणाऱ्याच कोणीतरी ही चोरी केल्याचा संशय आहे. महिनाभरापूर्वी काम सोडून गेलेल्या तरुणावर संशय आहे. पोलिसांनी घटनेचा तपास करीत आहेत.

### बदली झालेल्या सातशेहून अधिक शिक्षकांना
## कार्यमुक्ती आदेशाची प्रतिक्षा

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १० :
सन २०२५ - २६ च्या शिक्षक सर्वसाधारण जिल्हांतर्गत बदली प्रक्रीयेत नागपूर जि.प. अंतर्गत बदली झालेल्या सातशेहून अधिक शिक्षक बदली झालेल्या ठिकाणाहून कार्यमुक्त करण्याबाबतचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाचे प्रतिक्षेत आहेत. या सर्व शिक्षकांना कार्यमुक्त करावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती चे जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे व सरचिटणीस निळकंठ लोहकरे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

मागील सहा महिन्यापुर्वीपासून सुरु झालेली बदली प्रक्रिया अनेक अडथळे पार करत अंतीम टप्प्यात पोहचली आहे. बदली झालेल्या शिक्षकांचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संकेत स्थळावर उपलब्ध झाले आहे, संबंधीत शिक्षकांनाही बदली आदेश प्राप्त झाले आहे, परंतू सध्याचे पदस्थापने च्या शाळेतून संबंधीत शिक्षकांना कार्यमुक्त करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून अद्याप आदेश प्राप्त न झाल्यामुळे शिक्षक संभ्रमात आहेत. आगामी काळात लागू होणारी निवडणूक आचारसंहीता अथवा राष्ट्रीय जनगणना कार्य सुरु झाल्यास या शिक्षकांच्या कार्यमुक्ती करीता अडचणी निर्माण होवू शकतात.

राज्यातील ठाणे, वर्धा, अमरावती, अहिल्यानगर, धुळे, वाशीम, यवतमाळ, अकोला, धाराशीव, परभणी, लातूर या जिल्ह्यातील बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात आले आहे त्यामुळे बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करावे मागणी महाराष्ट्र राज्य प्राथामिक शिक्षक समिती च्या वतीने जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे व सरचिटणीस निळकंठ लोहकरे यांचेसह अनिल नासरे, राजू बोकडे, सुरेश श्रीखंडे, प्रकाश सव्वालाखे, दिगांबर ठाकरे, प्रदीप काजणे यांनी केली आहे.

## चाकूसह एकाला अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
नवीन कामठी पोलिसांच्या पथकाने गस्तीदरम्यान एका तरुणाला चाकू घेऊन फिरताना अटक केली. अशोक महेश कुरील (२१) रा. रविदासनगर, कामठी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

मध्यरात्री पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत रविदासनगरात गस्त घालत होते. या दरम्यान नवीन पुलावर वरील आरोपी पोलिसांना पाहून पळताना दिसला. संशय आल्याने पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याजवळ चाकू मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून त्याला अटक केली.

## राजू राऊत यांचा कार्यकर्त्यासह राकाँपात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. १० :
नागपूर जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात नागपूर जिल्ह्याचे निरीक्षक माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या पुढाकारातून नागपूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश सरचिटणीस राजूभाऊ राऊत यांनी समर्थकासह मोठ्या संख्येने पक्षप्रवेश केला.

यावेळी नवीन सदस्याचे पक्षात स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पक्ष वाढीसाठी व संघटनेच्या बळकटीसाठी जिल्ह्यात प्रत्येकाने कामाला लागून नवीन लोकांना पक्षासोबत जोडून घेत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपंचायत, मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत यश मिळवण्याकरता सर्वांनी प्रयत्न करावे, पक्ष सदैव आपल्या सोबत राहील असा विश्वास खासदार प्रफुल पटेल यांनी दिला.

यावेळी माजी मंत्री नानाभाऊ पंचबुधे, नागपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अनिल अहिरकर, शहर कार्याध्यक्ष श्रीकांत शिवरकर, भंडारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सुनीलभाऊ फुंडे, प्रदेश उपाध्यक्ष राजाभाऊ टाकसाळे, रमेश फुले उपस्थित होते.



देखरेख संघाचे माजी अध्यक्ष माजी सरपंच प्रभाकर पाटील माळवे, जिल्ह्याचे युवकाचे कार्याध्यक्ष संतोषजी महाजन, भिवापूर तालुका माजी अध्यक्ष माजी सरपंच अशोक गोगल, जिल्हा ग्राहक सेलचे अध्यक्ष पद्माकर बावणे, भिवापूर शहरचे माजी अध्यक्ष नाजीम बेग, जिल्हा उपाध्यक्ष महेश पांचाळ, गौरव गायगवळी, प्रकाश गावंडे, नारायण चौधरी, उमरेड शहरचे माजी अध्यक्ष संजय वाघमारे, मधुकर कारेमोरे, माजी सरपंच विजय कारेमोरे, राहुल टाले, सागर पाटील माळवे, महिला तालुकाध्यक्ष सुषमाताई ठवकर, गोडबोरीचे उपसरपंच विजय रोहनकर, लीलाधर गजभिये, राजेंद्र चव्हाण, अमृत माळवे, जयवंत मोहोळ, सोपान चट्टे, ज्ञानेश्वर पाटील शहाणे, शुभम शेलोरे ,उमेश कारेमोरे आशिष डहाके, संजय भोयर, डोमा चौधरी, देविदास ठोंबरे, अभिषेक मेश्राम, राकेश टाळे, शंकर कामिडी, वासुदेव मेश्राम, पृथ्वी शेंडे, सुनीता भोयर, महेश हजारे, अमित वलके, अमित भोयर यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश घेतला. कार्यक्रमाला राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## हत्यार बाळगणाऱ्या युवकास अटक

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. १० :
पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत टेकाडी ग्रामपंचायत जवळ अवैध हत्यार बाळगुन परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या युवकास पोलिसांनी अटक केली.

एक युवक टेकाडी ग्रामपंचायत जवळ चाकू घेऊन फिरत असल्याची माहिती कन्हान पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी टेकाडी ग्रामपंचायत जवळ पोहचून पाहणी केली असता एक युवक हातात चाकु घेतलेल्या स्थितीत आढळून आला. मनोहर व्यकंट संतापे (३५ वर्ष) रा. टेकाडी याला पोलिसांनी ताब्यात घेऊन अंगझडती घेतली असता त्याचा जवळ मोठा चाकू मिळुन आला. युवकास हत्यार बाळगण्याचा परवाना बाबत विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले.

पोलिसांनी युवकास अटक करुन त्याचा जवळून घातक शस्त्र जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहेत.

## इंदोरा येथे खड्ड्यामुळे अपघाताचा धोका



**महासागर प्रभाग वार्ता**

■ प्रमोद जांभुळकर, नागपूर, दि. १० :
इंदोरा प्रभाग ७ अंतर्गत इंदोरा येथील नागोराव पाटणकर मार्गावरील घडसे चौक ते जरीपटका रोडदरम्यान सध्या रस्त्याच्या मध्यभागी मोठा खड्डा पडला असून त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. येथे सकाळी व सायंकाळी कार्यालयीन वेळेत मोठी वर्दळ असते. याशिवाय, या मार्गावरून अनेक शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी नियमित ये-जा करतात.

रस्त्यावर पडलेला खड्डा अडथळा ठरत असून, त्यात भर म्हणजे खड्ड्यात रेती साचल्याने वाहनचालक घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे.सदर ठिकाणी तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी स्थानिक नागरिक आणि तरुणांनी केली आहे.यामध्ये अंकित वासनिक, रोहित पाटील, अनुप पाटील, अंकित गौर, प्रशांत मेश्राम, मंगेश कोटांगळे, मनोज गजभिये, राजन वासनिक, अखिलेश रामटेके या नागरिकांनी एकत्र येत स्थानिक प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

जर त्वरित उपाययोजना केली नाही, तर एखादा गंभीर अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही असे स्थानिकांनी स्पष्ट केले आहे. महानगरपालिकाप्रशासनाने या तक्रारीची गंभीर दखल घेऊन तातडीने रस्ता दुरुस्त करावा, अशी जोरदार मागणी आता स्थानिक पातळीवरून होत आहे.

## जनहिताच्या प्रश्नांवर पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे हल्लाबोल आंदोलन






■ महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. १० :
जनतेचे हक्क हिरावले जाणार नाहीत, अन्याय सहन केला जाणार नाही या निर्धाराने बुधवारी नागपूरच्या संविधान चौकातून पीपल्स रिपब्लिकन पार्टी, राष्ट्रीय मजदूर सेना आणि दलित मुक्ती सेनेच्या बॅनरखाली भव्य हल्लाबोल आंदोलन उभारण्यात आले.

शासनाकडून वारंवार होत असलेल्या जनहिताच्या प्रश्नांकडे दुर्लक्षाचा तीव्र निषेध करत या आंदोलनातून जनतेच्या मूलभूत मागण्या सरकारपुढे मांडण्यात आल्या. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष कैलाश बांबोले यांनी केले. जिल्हाध्यक्ष विजय पाटील यांची विशेष उपस्थिती होती. आंदोलनाला लॉंग मार्चचे प्रणेते व पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे, लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीपभाई कवाडे यांचे मार्गदर्शन लाभले.
संविधान चौकातून सुरू झालेला मोर्चा घोषणाबाजी करीत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

स्मार्ट मीटर जबरदस्ती लावणे थांबवणे, पटवर्धन मैदान येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी स्मारकाचे काम सुरू करणे, दीक्षाभूमी परिसराचे सौंदर्यीकरण तातडीने पूर्ण करणे, नागपूर शहरात २४ तास पाणीपुरवठा योजना राबविणे, लष्करी बाग व लक्ष्मीनगर झोनमधील रहिवाशांना मालकी पट्टे देणे, इंदौरा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत वसतिगृह व वर्कशॉपची सुविधा निर्माण करणे, नागपूर मेट्रोमुळे निर्माण झालेल्या जीवघेण्या गुह्यांची दुरुस्ती करणे, मनपा व जिल्हा परिषदेतील शाळा बंद न करणे, महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा रद्द करणे, कोराडी प्रकल्पातील कंत्राटी कामगारांना कामावर घेणे, आरोग्य विभाग व मनपातील कंत्राटी कामगारांना स्थायी करणे, ठेकेदारी पद्धती रद्द करणे, नागपूर बससेवेतील चालकांवरील गुन्हे मागे घेणे, ताजबाग रहिवाशांना मालकी पट्टे देणे, उमरेड - कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्पातील ९९ प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकरी देणे तसेच शासकीय दूध व्यवसाय विकास योजना येथील १७ स्थायी कामगारांचे थकीत वेतन व एरिअर्स तत्काळ देणे अशा अनेक मागण्यांचा निवेदनात समावेश होता.

या आंदोलनात नागपूर जिल्हा अध्यक्ष नरेंद्र डोंगरे, विदर्भ प्रदेश संघटक अंकित धुपे, नागपूर जिल्हा युवा आघाडी अध्यक्ष पलाश ठवरे, शहर महिला आघाडी अध्यक्षा प्रतिभा मानवटकर, शहर युवा आघाडी अध्यक्ष सोहेल खान, पूर्व विदर्भ सचिव डेनी सोमकुवर, महिला आघाडी अध्यक्षा सूचिता कोटांगले, ग्रामीण महिला आघाडी अध्यक्ष सुनीता शेंडे, उत्तर नागपूर अध्यक्ष कुंदन उके, तसेच अजय चव्हाण, दिलीप पाटील, सोपान मानवटकर, शितल बोरकर, संजय खांडेकर यांच्यासह शेकडो पदाधिकारी, महिला व युवक कार्यकर्ते उत्साहाने सहभागी झाले. जनतेच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा पीपल्स रिपब्लिकन पार्टी तर्फे देण्यात आला.